म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५५०.



REFBK-0004347

[illegible]

[illegible]

[illegible]

२३८६०

[illegible]

इंदूर महाराष्ट्र-साहित्य-सभेनें बक्षिस दिलेलें पुस्तक

# सुखाचे संसार

[ सुप्रजाजननशास्त्र ]

लेखक

प्रो० नारायण सीताराम फडके, एम्. ए.

REFBK-0004347

[ प्रथमावृत्तीचे हक्क प्रकाशकांचे स्वाधीन ]

१९३१

१-४-०

प्रकाशक

अनंत सखाराम गोखले,

५५२ नारायण, पुणें, नं. २

ॐ ॐ ॐ

प्रो० फडकेकृत

# संततिनियमन

[ द्वितीयावृत्ति ]

किंमत १ रु. ट. खर्च निराळा.

ॐ ॐ ॐ

मुद्रक

अनंत सखाराम गोखले,

'विजय' प्रेस, ५७०, शनवार, पुणें नं. २.

सुप्रजाजननशास्त्रावरील सर्वोत्कृष्ट निबंध म्हणून प्रो० ना. सी. फडके, एम्. ए. यांच्या निबंधास १९२५ सालीं इंदोरच्या 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळा'कडून रु. १००चें बक्षीस मिळालें. तोच निबंध मंडळानें कृपावंत होऊन परवानगी दिल्या-वरून आज आम्ही पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहोंत.

—प्रकाशक.

# प्रो० फडकेकृत पुस्तकें

## चरित्रें

१. दादाभाई नौरोजी
२. टेरेन्स मॅक्स्विनी
३. डी व्हॅलेरा

## कादंबऱ्या

१. अल्ला हो अकबर
२. कुलाब्याची दांडी
३. जादूगार
४. दौलत
५. अटकेपार
६. प्रवासी

## प्रबंध

१. मानसोपचार
२. मानसोन्नति
३. संततिनियमन
४. आजचे तरुण स्त्री-पुरुष
व त्यांजपुढील प्रश्न
५. सुखाचे संसार
६. प्रतिभा-साधन
७ गुजगोष्टी

## नाटक

१ युगान्तर

## इंग्रजी

1. Sex Problem in India
2. Psychology
3. Elements of Ethics
4. Manual of Logic

# सुखाचे संसार

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८३४८

एकूण क्र. २३५०
मा. नि. २११

# सुखाचे संसार

## प्रकरण पहिलें

सँढर्स्ट रोडवरील नाक्याच्या ठिकाणीं असलेल्या एका भव्य व सुंदर इमारतीवर विद्युद्दीपांची रोषणाई आणि लहानमोठ्या पताकांची शोभा केलेली पाहून प्रत्येकजण क्षणभर तेथें थबकत होता. आंत कसली तरी गर्दी दिसत होती. आंतील रोषणाई बाहेरच्या इतकीच भडक असल्याचें दिसत होतें. बड्या श्रीमंत लोकांच्या मोटारी मधून मधून येऊन इमारतीच्या मुख्य दरवाजापुढें उभ्या रहात होत्या. उंची वस्त्राभरणांचा शृंगार केलेले स्त्री-पुरुष आंतबाहेर जात येत होते. स्वयंसेवक दक्षतेनें व्यवस्था ठेवण्यांत गुंतले होते. इतक्यांत लांबच्या नाक्यावरून पोलिस शिपायाची शिटी फुंकल्याचा आवाज झाला व त्या शिट्यांचें लोण या इमारतीपर्यंत येऊन धडकलें. त्याबरोबर पोलिसांनीं लोकांची गर्दी फूटपाथवर मागें लोटली. लोक एकमेकांला ढकलून माना काढून वांकून पाहूं लागले. गव्हर्नरसाहेबांची बादशाही मोटार डौलानें रुळत येऊन थडकली, व स्मितवदनानें गव्हर्नरसाहेब खालीं उतरून आंत शिरले. तात्पुरत्या मागें सरलेल्या लोकांच्या गर्दीची लाट आतां उलट होऊन जवळ जवळ दरवाजापर्यंत जाऊन धडकली. कांहीं वेळानें टाळ्यांचा कडकडाट आंतून ऐकूं आला. आंत जिकडे तिकडे स्तब्ध झालें. बाहेर उभ्या राहाणाऱ्या माणसांना आंत चालू असलेल्या गव्हर्नरसाहेबांच्या भाषणांतील एखादाच शब्द ऐकूं येई व आंतील विजेच्या पंख्याच्या पात्यांच्या फिरत्या सांवल्याच काय त्या दिसत. गर्दीतील एका माणसानें दुसऱ्याला विचारलें, " काय आहे हो आंत? "

" शिशुसप्ताह."

" म्हणजे काय ? "

त्या दुसऱ्या गृहस्थाला नीटसें उत्तर सुचलें नाहीं व आपलें अज्ञान कबूल करण्याऐवजीं तो चिडक्या स्वरानें म्हणाला, "गप्प बसा हो! ऐकूं द्या तरी आंतलं भाषण!"

ॐ ॐ ॐ

त्या गृहस्थाला ज्या प्रश्नाचें उत्तर देतां आलें नाहीं तो शिशुसप्ताह भरविणाऱ्या एखाद्या जबाबदार माणसाला केला तर त्याचें घोकलेलें उत्तर येतें तें असें:—

"आपल्या हिंदुस्थानांत अर्भकांची मृत्युसंख्या फार भयंकर आहे. इतकी मोठी मृत्युसंख्या दुसऱ्या कोणत्याही देशांत दिसून येत नाहीं. लहान मुलांच्या मृत्यूचें हें भयंकर प्रमाण असेंच चालू राहिल्यास आपल्या देशाची प्रजा वाढण्याचा संभव उरणार नाहीं. आजचीं मुलें हींच भावी पिढीचीं घटक आहेत, व तींच जर अपाय्यानें मृत्युमुखीं पडलीं तर देशाला दुःस्थिति आल्यावांचून राहणार नाहीं आज बालमृत्यूचें जें मोठें प्रमाण दिसतें त्याचें कारण आपल्या लोकांचें आरोग्यशास्त्राचें अज्ञान होय. आपल्या लोकांना स्वच्छतेची राहणी माहीत नाहीं; हवा, पाणी व प्रकाश यांचें महत्त्व त्यांना कळत नाहीं; गरोदर स्त्रीनें कसें वागावें, गर्भाशयांत असलेल्या बालकाच्या संरक्षणासाठीं तिनें कोणते विधिनिषेध पाळावेत, प्रसूतीची व्यवस्था कशी ठेवावी व प्रसूतीनंतर बालकाच्या संगोपनासाठीं कोणती तजवीज करावी या गोष्टी आमच्या लोकांना समजत नाहींत; आणि या कारणानेंच बालकें पटापट मृत्युमुखीं पडतात. लोकांना बालसंगोपनाशीं संबंध असलेल्या सर्व गोष्टींची माहिती करून देऊन सध्यांची स्थिति सुधारण्यासाठीं शिशुसप्ताहाची चळवळ काढलेली आहे, व या चळवळीनें लोकजागृति झाली म्हणजे मातापितरें आरोग्यशास्त्रानुसार आपली राहणी ठेवतील, मुलांचें उत्तम संगोपन करतील, सध्यांचें बालमृत्यूचें प्रमाण कमी होईल, ज्या त्या घरांत गुटगुटीत व बाळसेंदार मुलें दिसूं लागतील, व सर्वांचे संसार सुखाचे होतील."

या म्हणण्यावरून पाहतां ज्या उद्देशांमुळें शिशुसप्ताहाची चळवळ आज हिंदुस्थानांत जिकडे तिकडे चालली आहे ते अत्यंत अभिनंदनीय व उदात्त आहेत यांत संशय नाहीं. कोणत्याही संसारांतील सुखाची खरी उगमाची जागा बालकेंच होत. घर श्रीमंताचें असो वा गरीबाचें असो, तेथील आनंदाचे खरे झरे म्हणजे तेथें इतस्ततः बागडणारीं व गोड बोबड्या शब्दांचें कूजन करणारीं लहान मुलेंच होत. ज्या घरांत मुलेंच नाहींत, किंवा ज्या घरांत रोगग्रस्त, कुजकीं, रडकीं मुलें आहेत तेथें इतर प्रकारचें वैभव उतूं जात असलें तरी सहृदय माणसास तें घर उदास

अरण्याप्रमाणेंच वाटेल. उलट निरोगी, धष्टपुष्ट बालकांच्या खिदळण्यानें भिकाऱ्याच्या चुलीवरील मृत्तिकापात्रांतही अमृताची पाकसिद्धि झाल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां राष्ट्रांतील स्त्री-पुरुषांचे संसार सुखाचे व्हावयाचे असल्यास त्यांच्या पोटीं उत्कृष्ट प्रजा आली पाहिजे याबद्दल मतभेद असणें शक्य नाहीं.

एकंदर राष्ट्राच्या अभ्युदयाच्या दृष्टीनें पाहिलें तरी सुविचारी लोकांचें लक्ष बाल-संगोपनाच्या प्रश्नाकडे जितकें जाईल तितकें इष्टच आहे. आज जगांतील जीं राष्ट्रें पहिल्या प्रतींचीं म्हणून गणलीं जात आहेत त्या राष्ट्रांत बालसंवर्धन व बालशिक्षण या प्रश्नांचा अत्यंत कळकळीनें व शोधक बुद्धीनें विचार करणाऱ्या पंडितांची व शास्त्र-ज्ञांची परंपरा लागल्याचें आपल्याला आढळून येतें. मानसशास्त्र, अर्थशास्त्र व वैद्यक-शास्त्र या शास्त्रांतील नव्या नव्या शोधांचा उपयोग राष्ट्रांतील लहान मुलांचें शारी-रिक, बौद्धिक व नैतिक सामर्थ्य वाढविण्याकडे करण्याचा त्या राष्ट्रांतील विचारवंत पुढाऱ्यांचा अव्याहत उद्योग चाललेला असतो. इतर राजकीय, औद्योगिक, आर्थिक व पारमार्थिक चळवळींइतकेंच शिशुसंगोपनाच्या व शिशुशिक्षणाच्या प्रश्नास महत्त्व दिलें पाहिजे असें त्या राष्ट्रांतील नेत्या पुरुषांना वाटत असतें. शिशुसंवर्धनाच्या कामीं राष्ट्राचा पुष्कळसा पैसा खर्च झाला तर तें योग्यच होय, अशी त्यांची खात्री असते. कांहीं राष्ट्रांत तरआरमार, महसूल, न्याय अशा खात्यांप्रमाणेंच शिशुस्वास्थ्य ( Child welfare ) हें एक कारभाराचें स्वतंत्र खातें मानलें जातें, व कोणा तरी निष्णात व अनुभवी विद्वानाच्या हातीं त्या खात्याची वहिवाट दिलेली असते.

या गोष्टी लक्षांत घेतां आपल्या देशांत शिशुस्वास्थ्यासंबंधींच्या विचाराला चालन मिळालें ही फार समाधानाची गोष्ट मानली पाहिजे. परंतु जे उद्देश साध्य करण्यासाठीं शिशुसप्ताहाची चळवळ निघाली आहे ते उद्देश तिनें खरोखरच साध्य होतील काय? राष्ट्रांतील प्रजा उत्तरोत्तर सर्वगुणसंपन्न व्हावी हा हेतु अत्यंतउदात्त आहे यांत संशय नाहीं; परंतु शिशुसप्ताहाच्या चळवळीनें त्या उद्देशाची सफलता खरोखरच होईल काय? तो उद्देश सिद्धीस जावा म्हणून कांहीं करावयाचें असल्यास शिशु-सप्ताहाचा कार्यक्रम हेंच योग्य व एकच एक साधन ठरेल काय?

हे प्रश्न सोडवूं लागल्यास असेंच म्हणणें प्राप्त आहे कीं, शिशुसप्ताहाच्या कार्य-क्रमांत स्पृहणीय अशा पुष्कळ गोष्टी असल्या तरी आपल्या देशांत सुखाचे संसार दिसावेत या ध्येयाचें तें खरें साधन नव्हे. इतकेंच नव्हे तर त्या कार्यक्रमामुळें खऱ्या साधनाकडे लोकांचें दुर्लक्ष होण्याचा अतिशय संभव असल्यामुळें त्या कार्यक्रमांत

योग्य ती सुधारणा झाल्यावांचून त्याचा अंगिकार लोकांनीं करूं नये असेंही म्हणणें भाग आहे. लोकांचे संसार सुखाचे व्हावेत हें कोणाला मान्य नसेल ? सध्यांचें बालमृत्यूचें प्रमाण कमी व्हावें असें कोणाला वाटणार नाहीं ? बालकांचें संगोपन उत्तम तऱ्हेनें होऊन देशांत उत्तरोत्तर सुप्रजा निर्माण व्हावी याबद्दल कोण वाद करील ! पण या सर्व गोष्टी घडवून आणावयाच्या झाल्यास गुटगुटीत मुलांना बक्षिसें देणें आणि मुलांचा आहारविहार शास्त्रोक्त ठवण्याबद्दल आईबापांच्यामनांत कळकळ उत्पन्न करणें हाच खरा मार्ग आहे काय ?

या प्रश्नाचें उत्तर नकारार्थीच द्यावें लागेल. कारण शिशु सप्ताहाच्या मुळाशीं असलेली समजूतच शास्त्रशुद्ध नाहीं. प्रजा **उत्पन्न झाल्यानंतर** ती सुप्रजा होण्यासाठीं काय काय योजना केल्या पाहिजेत याचा विचार करण्यापेक्षां **प्रजा उत्पन्न होईल तीच सुप्रजा असेल** यासाठीं काय केलें पाहिजे तें ठरविणेंच अधिक अगत्याचें आहे. सुखाच्या संसारांचा खरा पाया **उत्पन्न झालेल्या** प्रजेची सुधारणा नसून **उत्पन्न होणाऱ्या** प्रजेची काळजी घेणें हाच होय.

निर्माण **झालेली** प्रजा सुधारण्याचे प्रयत्न कितीही श्लाघ्य असले तरी त्यापेक्षां निर्माण **होतांनाच** प्रजा गुणसंपन्न असेल अशाविषयींचे प्रयत्नच अधिक अगत्याचे व फलदायी होतील. जीवनप्रवाहाचा मूळ उगमच शुद्ध व जोमदार राखण्याचा प्रयत्नच मूलभूत होय. या दृष्टीनें प्रजा ज्यांच्यामुळें उत्पन्न होते त्या मातापितरां-पासूनच आपल्या विचाराला प्रारंभ केला पाहिजे वंशसंस्काराच्या ( Heredity ) सिद्धान्तापासून जो बोध घेतां येण्यासारखा आहे त्यावरूनही असा प्रारंभ करणेंच श्रेयस्कर ठरेल. प्रजेचें जनन ज्यांच्याकडून होतें त्यांनाच सुप्रजाजननाच्या विचारांत सर्वांत महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे हें उघड आहे. चांगल्या किंवा वाईट प्रजेचा खरा उगम कोठून होतो असा प्रश्न विचारल्यास विवाहित स्त्री-पुरुषांकडेच बोट दाखवावें लागेल. बरें, वाईट पीक निष्पन्न होणें हें जमीन व बीं यांच्यावर बहुतांशीं अवलंबून आहे हें जसें अडाणी शेतकरीसुद्धां सांगू शकेल तद्वतच प्रजेची निकृष्टो-त्कृष्टता मातापितरांच्या गुणावगुणांवर अवलंबून आहे हें कोणाही सुबुद्ध मनुष्यास कळण्यासारखें आहे. प्राचीन काळीं आपल्या आर्य पूर्वजांनीं सुप्रजाजननाच्या हेतूनें कोणकोणते उपाय योजिले होते हें आपण पाहूं लागलों तर इतर सर्व गोष्टींपेक्षां विवाहो-न्मुख वधुवरें उत्तम प्रकारचीं असावींत याविषयींच त्यांनीं सर्वांत अधिक कटाक्ष ठेविला होता, असें दिसून येतें. इतर प्रमुख राष्ट्रांच्या प्राचीन संस्कृतीचें या दृष्टीनें

अवलोकन केलें तरी तेथेंही गुणसंपन्न वधूवरांच्या विवाहासच अधिक उत्तेजन मिळत असे अशाविषयीं पुरावा मिळतो. सारांश, वधूवरांच्या ठायीं मानसिक व शारीरिक सद्गुण असल्याखेरीज भावी प्रजा सद्गुणसंपन्न होणार नाहीं, आणि मातापितरांच्या अंगचे दुर्गुण त्यांच्या संततींत प्रगट झाल्यावांचून राहणार नाहींत. ह्या दोन्हीही कल्पना प्राचीन लोकांना पटल्या होत्या. वंशसंस्काराचीं तत्त्वें ज्या परिणत स्वरूपांत आज जगापुढें आलीं आहेत त्या स्वरूपांत आपल्या पूर्वजांनाही तीं ज्ञात होतीं असें म्हणणें केव्हांही धाडसाचेंच होईल. असें प्रतिपादणें म्हणजे पूर्वजाभिमानापुढें तारतम्य विसरण्यासारखेंच आहे. परंतु येवढें खचित कीं सुप्रजाजननाची प्राचीनतम कल्पना जरी पाहिली तरी तिच्या मुळाशीं वंशसंस्काराची कल्पनाच आढळून येते. असें जर आहे तर आधुनिक दृष्टीनें 'सुखाच्या संसारां'ची उभारणी वंशसंस्काराच्या सिद्धान्तांवरच झाली पाहिजे यांत संशय कसला ! म्हणूनच, लोकांचे संसार सुखाचे व्हावेत एतदर्थ विधायक कार्य कशा प्रकारचें असावें याचा सविस्तर उहापोह करण्यापूर्वी, वंशसंस्कारवादांत आजपर्यंत केला कोणकोणत्या सिद्धान्तांचा अंतर्भाव होतो त्याचें प्रथम शक्य तितक्या सोप्या भाषेत येथें विवेचन करणें आम्हांस अगत्याचें वाटतें. वंशसंस्कारवादांतील महत्त्वाच्या कल्पना एकदां वाचकांच्या लक्षांत आल्या म्हणजे पुढील विवेचनांत सुप्रजाजननासाठीं ज्या गोष्टींचा पुरस्कार आम्ही करूं त्यांचें औचित्य त्यांस पटण्यास विलंब लागणार नाहीं.

'वंशसंस्कारवाद' या मोठ्या नांवानें ज्या शास्त्रीय तत्त्वांचा बोध होतो तीं तत्त्वें सामान्य लोकांना अगदींच माहीत नाहींत असें नव्हे. बहुतेक शास्त्रीय सिद्धान्तांसंबंधीं असें म्हणतां येण्यासारखें आहे कीं, ते सिद्धान्त तात्त्विक स्वरूपांत लोकांना माहीत नसले तरी त्या सिद्धान्तांच्या अनुरोधानेंच सामान्य स्त्री-पुरुष आपलें आचरण ठेवितात. पदार्थविज्ञानशास्त्रांतील सिद्धान्त कधीं जन्मांत देखील न वाचतां किंवा ऐकतां सामान्य स्त्रियांना पाण्याला उकळी केव्हां येते व ती आल्यावर त्या पाण्याचे गुणधर्म काय असतात हें समजतें व त्याप्रमाणें त्या वागतात. अनुवंशसंस्कारवादांतील सिद्धान्तांचीही हीच गोष्ट आहे. अलीकडे पाश्चात्त्य शास्त्रज्ञांनीं अनेक प्रयोग करून पाहून आणि अनेक गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन करून अनुवंशसंस्कारासंबंधीं ज्या कल्पना बसविल्या आहेत त्यांची माहिती सर्वसामान्य लोकांना असणें संभवनीयच नाहीं. तथापि, वंशसंस्काराच्या सिद्धान्तांचें स्थूल स्वरूप मात्र सर्व लोकांना माहीत असतें. अनुवंशसंस्कारतत्त्वाचें हें स्थूल ज्ञान इतकें

सार्वत्रिक आहे कीं, त्याची साक्ष देणारे वाक्प्रचार आपल्या भाषेंतही आढळतात. "खाण तशी माती" ही म्हण सर्वांच्या परिचयाची आहे, आणि या म्हणीचा उच्चार अनेक प्रसंगीं होतो. एखाद्या व्यसनी मनुष्याचा मुलगा त्याच्याइतकाच किंबहुना कांकणभर अधिकच व्यसनी निघाला तर त्या मुलाविषयीं बोलतांना लोक म्हणतात, "अहो, हा व्यसनी निघाला तर त्यांत नवल तें काय? याचा बाप काय मोठा साधुसंत लागून गेला होता तर हा सदाचारी निपजावा! खाण तशी माती हा न्यायच आहे!" उलट, "भांगेंत तुळस" ही म्हणही सर्वपरिचित आहे व तिचाही दाखला अनेक वेळां देण्यांत येतो. खरें पाहतां "खाण तशी माती" आणि "भांगेंत तुळस" या दोन वाक्प्रचारांत सबंद अनुवंशसंस्कारवादाचें सार भरलेलें आहे असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. फरक येवढाच कीं, सामान्य व्यवहारांत या दोन प्रचारांचा आपण उच्चार करतों त्या वेळीं कार्यकारणमीमांसा करण्याची आपली प्रवृत्ति नसते, आणि शास्त्रीय शोधक हे केवळ या म्हणी उच्चारून स्वस्थ न बसतां कार्यकारणमीमांसा करून त्या म्हणी अन्वर्थक आहेत किंवा नाहींत याचा प्रत्यय स्वतः घेतात व लोकांना देतात. साधा खेडवळ शेतकरीदेखील त्याच्या गोठ्यांतील गाय संगोत्सुक होऊन ओरडूं लागली म्हणजे तिच्यासाठीं सरकारी फार्मवरील उत्तम जातीचा बैल पाहतो, यावरून "खाण तशी माती" हें तत्त्व त्याला चांगलें समजतें हें उघड आहे. परंतु खाण तशी माती कां? हा प्रश्न तो आपल्या मनाला कधींच विचारीत नाहीं. उलट, शास्त्रज्ञ या प्रश्नाची सोडवणूक करण्यांत आयुष्यच्या आयुष्य घालवितात. एका पिढीचे गुण व अवगुण पुढील पिढींत उतरण्याच्या प्रकाराला **गुणसंक्रमण** (Transmission) असें नांव देतां येईल. "खाण तशी माती" या म्हणींत या प्रकाराचाच उल्लेख होतो. उलट, मातापितरांत नसलेले असेही गुण किंवा अवगुण संततीच्या ठायीं अनेक वेळां दृष्टोत्पत्तीस येतात. या प्रकारास **नूतनगुणाविष्करण** (Variation) असें नांव देतां येईल. "भांगेंत तुळस" या वाक्प्रचारांत हाच प्रकार निर्दिष्ट होतो. गुणसंक्रमण व नूतनगुणाविष्करण हे दोन प्रकार कां घडतात या प्रश्नांचीं उत्तरें म्हणजेच वंशसंस्कारशास्त्र होय. हीं उत्तरें निरनिराळ्या शास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या प्रकारांनीं दिलीं आहेत. त्या सर्व मतभेदांचा उहापोह येथें करणें शक्य नाहीं व अगत्याचेंही नाहीं. गुणसंक्रमण व नूतनगुणाविष्करण या दोन गोष्टींसंबंधीं चार प्रमुख शास्त्रवेत्त्यांच्या मतांचें सार आपण समजून घेतलें म्हणजे संस्कारवादाचें स्वरूप एकोणिसाव्या शतकापासून


कसकसें पालटत गेलें आणि आज तें कोणत्या प्रकारचें आहे हें आपणास कळावयास हरकत नाहीं. संस्कारशास्त्राचा अभ्यास करणारे शोधक आपल्या मनांत मुख्यतः एक प्रश्न विचारतात तो हा कीं, आईबाप व त्यांची संतति यांच्यांत साम्य असतें तें कां ? किंवा, अधिक शास्त्रशुद्ध भाषेंत बोलावयाचें झाल्यास, मातापितरांच्या बीजपेशींतून त्यांचीच पुनरुत्पत्ति कां होते ? या प्रश्नाचा विचार स्पेन्सर, डार्विन, गाल्टन व विझमां (Wizemann) या चार शास्त्रज्ञांनीं कसा केला तें आतां आपण क्रमशः पाहूं.

स्पेन्सरचीं संस्कारशास्त्रविषयक मतें १८६४ सालीं लोकांच्या परिचयाचीं झालीं. स्पेन्सरनें असें प्रतिपादन केलें कीं, मानवी देह असंख्य देहखंडांचा (Physiological units) बनलेला आहे, आणि यांपैकीं प्रत्येक देहखंडांत असा एक विशेष गुण आहे कीं, तो देहापासून वेगळा केला गेल्यास मूळ देहासारखा स्वतंत्र देह त्यापासून निर्माण होतो. आपलें बोट कापलें तर जखम भरून निवून बोट पुन्हा पहिल्यासारखें सबंध होतें. हा प्रकार, आणि मातापितरांपासून त्यांच्यासारखीच प्रजा उत्पन्न होते हा प्रकार स्पेन्सरच्या मतें एकाच जातीचा होय. मातापितरांच्या देहांतील कांहीं देहखंड मूळ देहापासून वेगळे होऊन संयुक्त होतात त्यामुळें अशा संयोगापासून उद्भवणारी संतति मूळ माता-पितरांच्या देहासारखीच असते. कारण मूळ देहापासून विभक्त झालेल्या देहखंडांत मूळ देहाची प्रतिमा उठविण्याची शक्ति असते.


स्पेन्सरचा हा देहखंडवाद म्हणजे एक कल्पनेची भरारी होती. त्यामुळें स्पेन्सरचीं मतें दीर्घकाल टिकलीं नाहींत. १८६८ सालीं, म्हणजे स्पेन्सरचीं मतें लोकांपुढें आल्यानंतर चारच वर्षांनीं डार्विन यानें संस्कारवाद निराळ्याच स्वरूपांत लोकांच्या पुढें मांडला. त्याचें म्हणणें असें कीं, मानवी देह अनंत पेशींचा ( Cells ) बनलेला आहे. प्रत्येक पेशीचें सारखें संवर्धन होत आहे, व अर्थातूच या संवर्धनांत प्रत्येक पेशी निरनिराळ्या अवस्थांतून जात आहे. अशाप्रकारें एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत जात असतांना प्रत्येक पेशी सूक्ष्म रजांचा बाहेर क्षेप करीत असते. सर्व पेशींच्या अशा प्रक्षिप्त पेशी रजांचा ( Gemmules ) विचार केला तर देहाच्या प्रत्येक अवस्थेंतील गुणावगुणांचा अंश त्यांच्या ठिकाणीं उतरलेला असणार हें उघडच आहे. या पेशीरजांचा विशेषेंकरून जननेंद्रियाच्या ठायीं संचय होतो. त्यामुळें स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियसंयोगापासून उत्पन्न होणाऱ्या संततींत त्या दोघांच्याही गुणावगुणांचा पुनरुद्भव होतो.

स्पेन्सरपेक्षां डार्विनची विचारसरणी फारशी निराळी होती असें नाहीं. त्या दोघांच्या प्रतिपादनांत कांहीं महत्त्वाचा फरक असला तर तो येवढाच होता कीं, स्पेन्सरनें देहखंडांची ( Physiological units ) कल्पना मनाशीं बसविली होती तर तीच कल्पना पेशीरज ( Gemmules ) या निराळ्या नांवाखालीं व जरा निराळ्या रीतीनें डार्विननें पुढें मांडली. दोघांच्याही मतांत बाकी साम्यच होतें. मानवी देहाचा प्रत्येक मूलांश ( Unit ) उत्पत्तिकार्य करण्यास समर्थ आहे ही कल्पना दोघांनाही संमत होती. दोघांचेंही प्रतिपादन या समान कल्पनेवरच उभारलेलें होतें, आणि हीच कल्पना पुढें गाल्टन यानें खोटी ठरविल्यामुळें स्पेन्सर व डार्विन यांच्या प्रतिपादनांत फारसा भेद मानण्याचें आपणांस कारण नाहीं.


गाल्टननें आपल्या सिद्धान्तांचा उघड पुरस्कार १८७५ सालीं केला. त्याच्या सिद्धान्तांतील सर्वांत महत्त्वाची, व पूर्वींच्या संस्कारशास्त्रवेत्त्यांचे सिद्धान्त पार उलथून टाकणारी कल्पना समजून घेतली म्हणजे त्या सिद्धान्तांचें स्वरूप चट्कन् ध्यानांत येईल. स्त्रीच्या सूक्ष्मांडांत ( Ovum ) पुरुषाच्या शुक्रांतील एखादा सूक्ष्म बीजानें ( Spermatozoon ) प्रवेश केला व त्या अंडकाशीं तो समरस झाला म्हणजे गर्भधारणा होते, हें आजच्याप्रमाणेंच त्या वेळींही सर्वांना मान्य होतें. पण अशा-प्रकारें बीजप्रेरित ( Fertilized ) झालेल्या सूक्ष्मांडाचें स्वरूप कसें असतें याविषयीं कोणीं विशेष विचार केला नव्हता, व तो करण्यांतच गाल्टनच्या सिद्धान्तांचें महत्त्व आणि नावीन्य होतें. गाल्टननें असें प्रतिपादन केलें, कीं कोणतेंही नवबीजप्रेरित सूक्ष्मांड घेतलें तर त्यांत असणाऱ्या एकंदर बीजांचे दोन प्रकार असतात. एका प्रकारच्या बीजांपासून नवीन जीवाचा देह तयार होतो, व तो जीव गर्भांतून बाहेर पडून वाढावयास लागला म्हणजे त्याच्या देहसंवर्धनाचें कार्यही या बीजांकडेच असतें. या बीजांस त्यानें "व्यवसायी बीज" ( Dominant germs ) असें नांव दिलें. या व्यवसायी बीजांखेरीज अवशिष्ट असें दुसऱ्या प्रकारचे बीज असतात. या बीजांपासून त्या नव्या जीवाच्या लिंग-पेशी तयार होतात, आणि पुढील संतति निर्माण करण्याचें कार्य या बीजांकडूनच होतें. संततिकार्यासाठीं राखून ठेवलेले—असें या बीजांचें वर्णन करावयास हरकत नाहीं. गाल्टननें या प्रकारच्या बीजांना 'अवशिष्ट बीज' ( Residual germs ) अशी संज्ञा दिली. गाल्टनची ही कल्पना पुरी ध्यानांत येण्यासाठीं आपण असें समजूं कीं—




गर्भधारणेपूर्वी स्त्रीचें सूक्ष्मांड आणि पुरुषाचा एक सूक्ष्मबीज यांची स्थिति वर दर्शविल्याप्रमाणें असते. पुढें 'ब'नें 'अ'मध्यें प्रवेश केला व त्याच्याशीं तो समरस झाला म्हणजे गर्भ राहतो व नव्या जीवाची धारणा होते. या नव्या जीवांत अर्थात्‌च असंख्य बीज असणार. या बीजांच्या ज्या दोन जाति गाल्टननें कल्पिल्या त्या दर्शविण्यासाठीं आपण--अशी आकृति--




काढली असतां चालेल. फुल्यांनीं दर्शावलल्या ( व्य ) बीजांकडून देहसंवर्धनाचें कार्य होतें. व टिंबांनीं दर्शविलेल्या (अ) बीजांकडून पुढील संततीच्या उत्पादनाची तरतूद होते अर्थात्‌ या दुसऱ्या बीजांकडून जी संतति निर्माण होईल तिच्या द्वारें पुढील संतति निर्माण होतांनाही बीजांचे असे दोन प्रकार दृष्टीस पडतील, व हा क्रम सारखा चालू राहील. हा अनंत क्रम आकृतीनें दर्शवावयाचा झाल्यास खालील आकृतीनें तो दर्शवितां येईल. मुख्य गोष्ट ही कीं, मानवी देहाच्या सर्व पेशी उत्पत्तिकार्याच्या बाबतींत सारख्याच कार्यक्षम आहेत ही स्पेन्सर व डार्विनची कल्पना गाल्टननें खोटी ठरविली. मानवी देहांतील एकंदर पेशींचे देहपेशी (Body-cells) व बीजपेशी (Germ-cells) असे दोन प्रकार असतात, ही अत्यंत महत्त्वाची कल्पना त्यानें प्रथम प्रसृत केली, आणि या कल्पनेच्या साहाय्यानें वंशसंस्कारांविषयीं त्यानें जगाची खात्री पटविली. एका पिढीपासून पुढची पिढी, तिच्यापासून तिच्यापुढची पिढी असा क्रम कसा चालतो, आईबाप व त्यांची संतति यांच्यांत तेच गुणावगुण कां आढळून येतात, व सर्व पिढ्या एकमेकींशीं किती निकट आणि दृढबंधनांनीं बांधल्या गेलेल्या असतात या सर्व गोष्टींवर गाल्टनच्या सिद्धान्तामुळें लख्ख प्रकाश पडला.




गाल्टननंतर विझमां (Wizemann) याचेंच नांव, संस्कारशास्त्राच्या इतिहासांत घेतलें जातें. १८९३मध्यें विझमांनें आपले सिद्धान्त ग्रंथरूपानें प्रसिद्ध केले. आपल्या प्रस्तुत विषयापुरतें बोलावयाचें झाल्यास गाल्टन व विझमां यांच्या प्रतिपादनांतील सूक्ष्म भेदांकडे पहावयाचें आपणांस कारण नाहीं. नवबीजप्रेरित सूक्ष्मांडामधील बीजांचे दोन विभाग असतात व त्यांपैकीं एका विभागाचा देहसंवर्धनाकडे व्यय होतो आणि दुसरा विभाग प्रजोत्पत्तीच्या कार्यासाठीं राखलेला असतो, ही गाल्टनची कल्पना विझमांनेंही मान्य केली, व तिचा अधिक विस्तृत विचार करण्याची कामगिरीच मुख्यतः त्यानें केली. विझमांनें स्वतः अनेक प्रयोग करून पाहिले असल्यामुळें, आणि कोणत्याही कल्पनेच्या उत्पादकापेक्षां तिच्या प्रचारकाच्या अंगीं आग्रहाचा अभिनिवेश अधिक असतो असा सामान्य नियमच असल्यामुळें, विझमांचें प्रतिपादन अधिक आग्रही व कटाक्षाचें आहे. नवीन जीवाची घटना झाली व त्याच्या पेशींची देहपेशी व बीजपेशी अशी एकदां विभागणी झाली म्हणजे मग या दोन प्रकारच्या पेशी आपापल्या नियत कार्याखेरीज दुसरें कार्य कधींही करीत नाहींत, याविषयीं किमपिही संदेह नसल्याचें विझमा आग्रहानें सांगतो. उत्पत्तिकार्याच्या बाबतींत देहपेशी सर्वस्वीं असमर्थ असतात आणि बीजपेशींकडूनच हें कार्य होत असतें, ही गोष्टही अतिशय कटाक्षानें तो प्रतिपादतो. विझमांच्या या

प्रतिपादनामुळें एक मोठा फायदा झाला तो हा कीं, मातापितरांच्या देहापासून संततीचा उद्भव होतो, तो कसा होतो तें सांगतां येत नाहीं पण तो होतो खरा— अशी जी ढोंबळ व अस्पष्ट कल्पना पूर्वीं प्रचलित होती ती नाहींशी झाली, आणि जनकांपासून अपत्य कसें निर्माण होतें याची अगदीं रेखीव आणि स्पष्ट कल्पना लोकांना आली. प्रत्येक मानवी जीव ज्या एका विशिष्ट आदिद्रव्याचा( Protoplasm ) बनलेला असतो त्याचेंच 'देहसंवर्धक द्रव्य' ( Morphoplasm ) आणि 'उत्पत्ति-कारक द्रव्य (Idioplasm) असे दोन विभाग असतात, आणि या उत्पत्तिकारक द्रव्यापासूनच एका पिढींतून दुसरी पिढी व तिच्यांतून तिसरी पिढी उत्पन्न होण्याचा क्रम चालू राहतो. हा विझमांचा सिद्धान्त लोकांना पूर्णपणें पटला आणि अनेक पिढ्यांतून एकच बीजद्रव्यपरंपरेचा ( Continuity of Germ-plasm ) प्रवाह अखंडपणें वहात राहतो याविषयीं कोणाला शंका उरली नाहीं.

वंशसंस्कारवादांतील सिद्धान्त कसकसे बदलत गेले, व आज विझमांचें प्रतिपादन कशा प्रकारचें आहे हें येथवर संक्षेपतः सांगितलें. आतां या ठिकाणीं एक गोष्ट मात्र वाचकांस सुचवून ठेविली पाहिजे ती ही कीं, संस्कारशास्त्राचे हे सारे सिद्धान्त पूर्णपणें मान्य होण्याच्या मार्गांत एक कायमची मोठी अडचण आहे, व ती समाधानकारक रीतीनें दूर केल्याखेरीज संस्कारशास्त्र पूर्णस्थितीस पोंचलें असें म्हणतां येणार नाहीं. ती अडचण अशी कीं, जनक व अपत्य समानगुणी असतात असा सामान्यपणें अनुभव येतो, हें खरें असलें तरी जनक व अपत्य हीं भिन्नगुणी असल्याचाही अनुभव क्वचित् येतो. जे गुण किंवा अवगुण जनकाच्या ठिकाणीं नव्हते ते अपत्याच्या ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतात. या नूतनगुणाविष्करणाची मीमांसा संस्कारवादाच्या सिद्धान्तानुसार करणें कठीण आहे. विझमांच्या म्हणण्याप्रमाणें बीजद्रव्यपरंपरेचा नियम अबाधित असल्यास जनकाच्या अंगीं असलेल्या गुणाव-गुणाखेरीज दुसरे कोणतेही गुणावगुण अपत्याच्या ठिकाणीं प्रगट होतां कामा नये. परंतु प्रत्यक्ष अनुभव पहावा तर तो कधीं कधीं विरुद्ध प्रकारचा येतो. तेव्हां संस्कार-वादाच्या सिद्धान्ताला बाध न येतां नूतनगुणाविष्करणाचा (Variation) उलगडा कसा करावयाचा हा प्रश्न साहजिकपणेंच उभा राहतो.

स्पेन्सरपासून विझमांपर्यंत सर्व संस्कारवाद्यांनीं या प्रश्नाची सोडवणूक आपापल्या परीनें केली आहे. संक्रमित ( Transmitted ) गुणांप्रमाणेंच एखाद्या व्यक्तीच्या ठायीं 'संपादित गुण'ही ( Acquired characters ) कसे दिसून येतात,

त्यांचा उद्भव कसा होतो, व अशा प्रकारचे संपादित गुण पुढील पिढीच्या अंगीं वंशसंस्कारानें जातात किंवा नाहीं वगैरे प्रश्नांचा उहापोह बहुतेक सर्व वंशसंस्कार-शास्त्रज्ञांनीं यथामति केला आहे. त्या उहापोहाशीं वाचकांचा परिचय करून द्यावयाचा झाल्यास विषयाचा विस्तार प्रमाणाबाहेर होईल. म्हणून या ठिकाणीं थोडक्यांत येवढेंच सुचवितों कीं, या प्रश्नांचें सर्वमान्य उत्तर असें अजून ठरलेलें नाहीं. परिस्थितिभेदामुळें किंवा असवर्ण स्त्री-पुरुषांच्या संयोगामुळें संततीच्या ठायीं नूतन गुणांचें आविष्करण होतें या स्थूल कल्पनेपलीकडे खुलाशाची मजल अजून गेलेली नाहीं. बीजद्रव्यपरंपरेचा ओघ इकडे तिकडे चाळविण्याचें सामर्थ्य कधीं कधीं परिस्थितींत (Environment) येतें; येवढें सुचविण्यापेक्षां शास्त्रज्ञ या प्रश्नाचा उलगडा अधिक करीत नाहींत. बीजद्रव्यपरंपरेच्या ओघावर परि-स्थितीचा परिणाम नक्की कशा प्रकारें होतो, किंवा अमुक एका परिस्थितीमुळें कोणते नवीन गुण संततीच्या ठायीं आविष्कृत होतील, हें सांगतां येण्याइतकी वंशसंस्कारशास्त्राची आज तयारी नाहीं. अज्ञानाच्या अथांग अंधकारांतच हे प्रश्न अजून पडले आहेत. त्यांच्यावर जेव्हां पूर्ण प्रकाश पडेल तेव्हां वंश-संस्कारशास्त्र सर्वस्वीं सिद्ध झालें असें म्हणतां येईल.

परंतु ही एक अनिश्चित गोष्ट सोडून दिली तर वंशसंस्काराचे बाकीचे सिद्धान्त इतके सिद्ध झाले आहेत कीं ते आपणांस मान्य केलेच पाहिजेत. नूतनगुणा-विष्करणाचा एक अपवाद सोडून दिला तर बीजद्रव्यपरंपरेचें तत्त्व ग्राह्यच समजलें पाहिजे. गाल्टन व विझमां यांची तर या परंपरेबद्दल पुरी खात्री होती. या परंपरेच्या नियमाला बाध आणण्यासारखे गैरसमज लोकांच्या मनांतून काढून टाकण्याची गाल्टननें पुष्कळ खटपट केली. असाधारण बुद्धिमान लोकांचीं मुलें बहुतेक तशीं असाधारण नसतात असा लोकांचा अनुभव आहे, व तेवढ्यावरून वंशसंस्कारतत्त्व खोटें म्हणावयासही कांहीं लोक तयार होतात. पण गाल्टननें हा गैरसमज दूर केला. त्यानें पुष्कळशा लोकोत्तर माणसांच्या घराण्यांचे इतिहास मिळविले व त्यावरून त्यानें असें दाखविलें कीं, वास्तविक पहातां मोठ्या लोकांचे गुण त्यांच्या संततींत उतरतात; पण त्या गुणांचें संक्रमण दोन कारणांमुळें आपल्या ध्यानांत येत नाहीं. एक तर एखाद्या व्यक्तीच्या अंगीं असाधारण बुद्धिमत्ता किंवा कर्तृत्वशक्ति येणें ही गोष्ट अनेक गोष्टींच्या सन्निपातामुळें घडून येत असते, व असा सन्निपात पुन्हा त्या व्यक्तीच्या मुलांच्या बाबतींतही घडून येईल हें विशेष

संभवनीय नाहीं. शिवाय, लोकोत्तर पुरुष स्वतः कितीही अप्रतिम बुद्धीचे असले तरी त्यांचे विवाहही असाधारण गुणांच्या स्त्रियांशींच झाले तर त्यांची संतति त्यांच्या इतकीच गुणसंपन्न निपजेल; परंतु, असा योग क्वचितच जुळून येतो. किंबहुना याच्या उलटच प्रकार बहुशः पाहण्यांत येतो. त्यामुळें बुद्धिमान पित्याचे मुलगे त्याच्याइतके बुद्धिमान असत नाहींत. पण इतकें मात्र खचित, कीं ज्या स्त्रियांची या बुद्धिमान पुरुषांशीं जन्मगांठ पडली त्यांचीं लग्नें जर मामुली पुरुषांशीं लागलीं असतीं तर त्यांच्या पोटचीं मुलें इतकीं देखील हुषार निपजलीं नसतीं. सारांश, सगळ्याच लोकोत्तर आईबापांच्या पोटीं लोकोत्तर संतति निर्माण झालेली आढळत नाहीं हें जरी खरें, तरी साधारण मातापितरांपेक्षां त्या लोकोत्तर पुरुषांच्या पोटीं गुणसंपन्न अपत्यें येण्याचा संभव खात्रीनें अधिक आहे; आणि लोकोत्तर पुरुषांच्या पोटच्या साधारण मुलांकडे बोट दाखवून गुणसंक्रमणाचा नियम खोटा ठरविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास तो सफल होणार नाहीं.

गाल्टननें तर गुणसंक्रमणाचा एक रेखीव नियम देखील बनविला होता. त्याच्या मताप्रमाणें प्रत्येक अपत्यांत त्याच्या मातापितरांचेच नव्हे तर आजाआजी, पणजापणजी इत्यादिकांचेही गुणावगुण उतरतात, व कोणाचे गुण किती अंशानें संक्रमित होतात हें दर्शविणारें गणितही त्यानें तयार केलें होतें. "अपत्याच्या गुणावगुणांपैकीं अर्धा भाग माता व पिता मिळून दोघांकडून आलेला असतो. म्हणजे प्रत्येक गुणावगुणाचा $\frac{1}{4}$ भाग मातेकडून व $\frac{1}{4}$ भाग पित्याकडून आलेला असतो. नंतर आजापासून $\frac{1}{16}$ व आजीपासून $\frac{1}{16}$ अशा प्रकारें त्या उभयतांचा मिळून $\frac{1}{8}$ अंश अपत्याच्या प्रत्येक गुणावगुणांत आढळतो. असाच क्रम याहीपलीकडे चालतो व अपत्याच्या एका गुणाचा किंवा अवगुणाचा १ या संख्येनें निर्देश केला तर $1=\frac{1}{2}+\frac{1}{4}+\frac{1}{8}+\frac{1}{16}$ असें हें समीकरण नेहमीं मांडतां येईल."

गाल्टनचें हें समीकरण सर्वांच्या विवेचकशक्तीला सारखेंच पटेल असें नाहीं. पण या समीकरणांतील अतिशयोक्ति व वैचित्र्य वजा केल्यावर खालीं सत्याचा अंश बराच उरेल हें खास. गाल्टनच्या समीकरणाचा व आंकडेमोडीचा निर्विवाद अर्थ हाच होतो कीं, अपत्यांचे गुणावगुण पितरांच्या गुणावगुणांवरच बहुतांशीं अवलंबून असतात. वंशसंस्कारवादाचें येथपर्यंत जें विवेचन आम्हीं केलें त्यावरून वाचकांची इतकी खात्री पटावयास हरकत नाहीं कीं, या वादांतील सर्वच सिद्धान्त सारखे मान्य झालेले नसले, किंवा त्या सिद्धांतांच्या सांखळींतील एखाद दुसरा दुवा

अजून थोडा फार ढिला असला तरी, वंशसंस्काराच्या सामान्य नियमाविषयीं सर्व शास्त्रज्ञांचें एकमत आहे. आमच्या प्राचीन आर्यांनीं वंशसंस्काराच्या ज्या कल्पनांवर विवाहसंस्थेची उभारणी केली त्या कल्पना प्रस्तुत प्रकरणांत दिग्दर्शित केलेल्या आधुनिक सिद्धान्ताशीं किती जुळतात हें पाहणें, बोधप्रद, मनोरंजक आणि पूर्वजाभिमानोद्दीपक होईल. परंतु तें करण्याचें हें स्थळ नव्हे. तें पुढें यथाक्रम करूं. वंशसंस्कारवादाचें आजचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे तें वाचकांस सांगण्याचाच या ठिकाणीं आमचा मुख्य हेतु होता. आतांपर्यंतच्या विवेचनाचें मर्म म्हणून येथें समारोपादाखल असें म्हणतां येईल कीं, आईबाप व मुलें हीं समानगुणी असतात याचें कारण शास्त्रज्ञांनीं असें ठरविलें आहे कीं, प्रजोत्पत्तीच्या बाबतींत बीजपरंपरेचा (Germinal continuity) नियम नेहमीं लागू असतो. गाल्टन व विझमां यांच्या मताप्रमाणें कोणत्याही व्यक्तीचा देह नवबीजप्रेरित सूक्ष्मांडांतून उद्भवून वाढीस लागला, कीं एकंदर पेशींपैकीं कांहीं पेशी अगदीं अलग अशा राखल्या जातात व पुढील प्रजेच्या उत्पादनाचें कार्य या पेशींकडूनच होतें. चमत्कृतिजनक भाषेंत बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, अपत्य त्याच्या जनकाइतकेंच वृद्ध असतें. कारण राखीव पेशींच्या रूपानें अपत्य जनकाबरोबरच जन्मास येऊन वाढत असतें. किंवा, आपण असें म्हणूं कीं, जनक अपत्याला जन्म देतो ही कल्पना शास्त्रशुद्ध नसून अपत्यरूपानें पुढें जन्म पावणाऱ्या बीजद्रव्याचा तो संरक्षक असतो असें समजणेंच अधिक शास्त्रसंमत होईल. जनक आणि जन्य, हीं दोनही एकाच जीवप्रवाहाचे तुषार आहेत. सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता बर्ग्सां (Bergson) म्हणतो त्याप्रमाणें "जीवित हें एखाद्या जलप्रवाहाप्रमाणें आहे. या बीजापासून त्या बीजापर्यंत व तेथून पुढच्या बीजापर्यंत असें तें वहात आहे. जीविताची परंपरा अखंडित चालू आहे, आणि प्रत्येक व्यक्तिमात्र जणुं या परंपरेवर किंचित् काळ आरूढ होतो व त्याची ठरीव आयुर्मर्यादा संपली कीं खालीं पडतो."

---

# प्रकरण दुसरें

वंशसंस्कारवादाचें जें विवेचन यापूर्वी केलें त्यावरून सुप्रजाजननासंबंधीं आपणांस बोध घेतां येण्यासारखा असेल तर तो हाच कीं, सुप्रजा निर्माण व्हावी अशी एखाद्या समाजाची इच्छा असल्यास त्यानें प्रथम विवाहबद्ध तरुण स्त्री-पुरुष गुण-संपन्न असतील अशी खबरदारी घेतली पाहिजे. रोगपरिहारापेक्षां रोगप्रतिबंध करणें अधिक श्रेयस्कर होय, असा वैद्यकशास्त्रांतील एक सिद्धान्त आहे. त्याचा अर्थ असा आहे कीं, रोग व्हावयास संधि ठेवून मग तो झाल्यावर त्याचा परिहार करीत बसण्यापेक्षां तो होण्याचा संभवच मुळांत नाहींसा करणें अधिक सुज्ञपणाचें होय. याच न्यायानें असें म्हणतां येईल कीं, कुप्रजा निर्माण झाल्यावर सुपरिस्थिती-च्या औषधानें तिची सुधारणा करीत बसण्यापेक्षां कुप्रजा निर्माण होण्याचा संभवच शक्य तितका कमी करणें आणि सुप्रजा निर्माण होण्याचा संभव होईल तितका वाढविणें हेंच अधिक फलदायी आहे जनक व जन्य यांचे संबंध किती निकट आहेत हें आपणांस वंशसंस्कारवादावरून स्पष्ट दिसून आलेंच आहे. तेव्हां लोकांचे संसार सुखाचे व्हावेत यासाठीं जनकपदाची जबाबदारी ज्यांच्या शिरावर नुक्तीच पडली आहे किंवा लवकरच पडणार आहे अशा स्त्री-पुरुषांकडे लक्ष पुरविणें हेंच पहिलें काम होय. समाजांतील आईबाप सुदृढ, सद्गुणी आणि बुद्धिमान् असतील तर त्या समाजांत सुप्रजाजननासाठीं वेगळी खटपट क्वचितच करावी लागेल. आणि आई व बाप या दोघांचेही गुणावगुण संततींत उतरतात हें जरी खरें, तरी एका दृष्टीनें बापापेक्षांही आईच्या गुणांचें महत्त्व अधिक आहे असें आम्हांस म्हणावेंसें वाटतें. आम्ही असें म्हणतों याचें एक कारण असें कीं, प्रजाजननाच्या बाबतींत पुरुष व स्त्री यांचें सहकारित्व सारखेंच असतें असें जरी नेहमीं मानण्यांत येतें, तरी अपत्य गर्भरूपानें राहतें तें स्त्रीच्या गर्भाशयांत राहतें, नऊ महिने-पर्यंत त्याची वाढ स्त्रीच्या गर्भाशयांतच होते आणि पुढेंही कांहीं काल त्याचें पोषण स्त्रीच्या दुग्धावरच होतें या गोष्टी विसरतां कामा नयेत. या गोष्टींकडे लक्ष दिल्यास कोणीही असेंच म्हणेल कीं, सुप्रजाजननाच्या दृष्टीनें मातेचें महत्त्व पित्या-पेक्षांही कांकणभर अधिकच आहे; तेव्हां सुदृढ, सद्गुणी आणि बुद्धिमती स्त्रिया समाजांत असतील असा प्रयत्न करणें हीच सर्वांत अगत्याची गोष्ट समजणें प्राप्त आहे. सूर्य ज्याप्रमाणें सर्व प्रकाशाचें आदिकारण होय, त्याप्रमाणें कोणत्याही समाजा-

च्या सुस्थितीचें किंवा दुःस्थितीचें मूलकारण 'माता' हीच होय. आपल्या देशांतील भयप्रद अर्भकमृत्युसंख्येचें मूलकारणही खरें पाहिलें असतां तरुण मातांची मृत्युसंख्याच आहे. हिंदुस्थानांत अर्भकांची मृत्युसंख्या किती मोठी आहे याची कल्पना सुधारलेल्या पाश्चात्य देशांतील लोकांना क्वचितच असते व ती कल्पना कांहीं निमित्तानें त्यांस समजली म्हणजे ते आश्चर्यानें इतके थक्क होतात कीं, ती खरी नसेल असाही त्यांना क्षणभर संशय येतो. सुमारें तीन वर्षांपूर्वी एकदां इंग्लिश पार्लमेंटमध्यें मजूरपक्षीय सभासद टी. जॉन्स्टन् यांनीं मुंबई शहरांतील अर्भकमृत्युसंख्येविषयीं स्टेट सेक्रेटरीस कांहीं प्रश्न विचारतांना 'मुंबई शहरांत दर हजार मुलांमागें ६६६ मुलें मृत्युमुखीं पडतात' असें विधान केल्यामुळें बरीच खळबळ उडाली व मुंबई शहरांतील खरी अर्भकमृत्युसंख्या तरी काय आहे हें समजून घेण्याची उत्सुकता कांहीं लोकांत उत्पन्न झाली. टी. जॉन्स्टन यांनीं सन १९२१ या विशिष्ट रोगग्रस्त सालांतील आंकडा सांगितल्यामुळें तो विशेष भयप्रद वाटला, हें खरें. तथापि ज्या सालीं मुंबई शहरांत अर्भकमृत्यूंची संख्या अगदीं कमी होती, त्या १९१७ सालाचें प्रमाण घेतलें तरी तेंदेखील दर हजारीं ४१० असल्याचें दिसून येतें. आणि हें प्रमाण कांहीं भयंकर कमी नाहीं. जन्मास येणाऱ्या मुलांपैकीं दोनपंचमांश मुलें एक वर्षाच्या आंत मरावींत ही समाधानाची गोष्ट थोडीच आहे ? पुणें शहराची १९२५ मधील बालमृत्युसंख्या हजारीं ६११ होती ! पण आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें या प्रकारचा थोडासा सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्यास तरुण मातांचे मृत्यु आणि त्यांची शारीरिक दुःस्थिति याच गोष्टी त्याच्या मुळाशीं असल्याचें आपणांस आढळून येईल.

आपल्या देशांतील व विशेषतः मुंबईसारख्या शहरांत ज्यांचें आयुष्य जातें अशा मध्यम व गरीब स्थितींतील स्त्रियांच्यासंबंधीं वाचकांनीं कधीं विचार केला आहे काय ? अशा स्त्रियांचें चरित्र अगदीं थोडक्यांत लिहितां येण्यासारखें असतें. या दुःखपूर्ण मर्त्यभूमीवर त्या बिचाऱ्या दीर्घकालपर्यंत रहातच नाहींत, व राहतात तेवढ्या अवधींतही पतीबरोबर संसाराचें आणि प्रजोत्पादनाचें ओझें वाहून स्वतःच्या हातांनीं नकळत त्या आपल्या अकाली मृत्यूची तयारी करण्याखेरीज दुसरें कांहींच करीत नाहींत. साधारणपणें आपल्या समाजांतील मुली तेराव्या चवदाव्या वर्षी विवाहबद्ध होतात, नंतर अल्पावधींतच त्या ऋतुमती होतात, नंतर पतीबरोबर संसार करूं लागून लवकरच त्या गर्भवती होतात आणि अर्ध्या

अधिक तरण्याताळ्या बायका पहिल्या बाळंतपणांत मृत्युमुखीं तरी पडतात किंवा क्षयासारख्या कोणत्या तरी रोगाला बळी पडून इहलोक सोडण्याच्या मार्गाला लागतात. आपल्या समाजांतील स्त्रियांचा सामान्य क्रम हा आहे. पहिल्या बाळंतपणांतून मुलगी बाहेर पडली आणि तिच्या प्रकृतीविषयीं कांहीं तक्रार सुरू झाली नाहीं असें क्वचितच घडतें. तुमची पहिली बायको कशानें वारली असा प्रश्न शंभर बिजवरांना विचाराल तर त्यांपैकीं नव्वद पहिल्या बायकोच्या बाळंतपणाचीच कांहीं तरी दुःखप्रद हकीगत सांगूं लागतात. समाजांतील चार घरचे प्रकार पाहून आम्ही अनुमानधबक्यानें कांहीं तरी विधानें करीत आहोंत असें कोणीं समजूं नये. आमच्या या विधानांची सत्यता पटविण्यासाठीं रोखठोक आंकड्यांचाही पुरावा आम्हांस सहज देतां येण्यासारखा आहे.

गर्भारपण व बाळंतपण यांत जडणाऱ्या रोगांमुळे शेंकडा किती स्त्रिया मृत्युवश होतात त्याचा नक्की हिशेब सांगतां येणें शक्य नाहीं. कारण याबद्दलची माहिती इस्पितळांत जमा करावयाची म्हटली तरी फक्त ज्या स्त्रिया इस्पितळांत उपचारासाठीं अगर प्रसूतीसाठीं येतील त्यांचाच काय तो त्या माहितींत समावेश होईल. घरोघरीं राहणाऱ्या स्त्रियांची मोजदाद त्यामुळे होणार नाहीं. तथापि इस्पितळांतील नोंदणीवरून जमविलेल्या आंकड्यांवरून देशांतील स्त्रियांच्या दुःस्थितीचा थोडासा अंदाज बांधतां येईल. डॉ॰ मार्गरेट बाल्फोर या बाईनें मुंबईच्या इस्पितळांत केलेल्या शोधांत असें दिसून आलें कीं, बाळंतपणानंतर अल्पकाळांत कालवश होणाऱ्या स्त्रियांपैकीं शेंकडा ६१ स्त्रियांच्या मृत्यूचें कारण "ॲनिमिआ" हा रोग असतो. हा रोग बहुतेक गर्भारपणाच्या उत्तरार्धांत स्त्रीला जडतो आणि तो एकदां जडला म्हणजे बहुधा प्रसूतीच्या वेळींच ती दगावते किंवा प्रसूतींतून ती पार पडली तरी ती फारच थोडे दिवस जगते. मुंबईसरकारच्या आरोग्यखात्याकडून १९२१ सालीं जो वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला त्यांत "प्रसूतीमुळें मृत्यु" या सदराखालीं ४५०१ अशी नोंद आहे; पण याहीपेक्षां अधिक खात्री पटविणारे आंकडे त्या रिपोर्टांत दुसऱ्या एका जागीं सांपडतात. सबंध वर्षांतील मृत्यूचा आढावा काढून अमुक वयाच्या मर्यादेंत दरहजारीं किती पुरुष मेले व किती बायका मेल्या त्याचें एक कोष्टक या रिपोर्टांत दिलें आहे तें पुढीलप्रमाणें आहे:—

# वयोमर्यादेप्रमाणें मांडलेलें मृत्यूंचें कोष्टक

| १ वर्षाच्या आंतलि | | १ ते ५ वर्षें | | ५ ते १० | | १० ते १५ | | १५ ते २० | | २० ते ३० | | ३० ते ४० | | ४० ते ५० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| २०९.७६ | १८०.२९ | ४८.५६ | ४५.५२ | ८.७५ | ९.३० | ६.४३ | ७.४६ | १०.२६ | १२.५५ | १३.२५ | १४.३९ | १५.२७ | १५.६५ | २२.४८ | १६.९३ |

वरील कोष्टकांतील ज्या भागाभोंवतीं एक जाड काळी रेघ ओढली आहे त्याकडे वाचकांनीं मुद्दाम लक्ष द्यावें. त्या भागांतील तिन्ही रकान्यांत पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या मृत्यूचें प्रमाण अधिक असल्याचें उघड दिसून येतें. एकंदर कोष्टकाकडे नजर फेंकली तर वाचकांस असें आढळून येईल कीं, पांचव्या वर्षापर्यंत आणि तिसाव्या वर्षापासून पुढें कोणत्याही वयाच्या स्थितींत बायकांपेक्षां पुरुषच अधिक प्रमाणांत मृत्युमुखीं पडत असून १५ व ३० या दोन वयोमर्यादांच्या दरम्यान मात्र पुरुषांपेक्षां स्त्रिया अधिक प्रमाणांत मृत्युवश होतात. याचें कारण शोधून काढणें फारसें कठिण नाहीं. १५ व ३० हें वय म्हणजेच स्त्रियांचें अपत्यप्रसवितेचें वय होय, आणि प्रसूतीमुळें स्त्रियांस मृत्यु येण्याचा संभव अलीकडे फारच वाढत चालल्यामुळें या वयाच्या कालमर्यादेंत त्यांच्या मृत्यूचें प्रमाण पुरुषांपेक्षां **स्पष्टपणें अधिक** दिसून येतें.

असले आंकडे अधिक देत बसण्याचें कारण नाहीं. आमचा मुख्य मुद्दा वाचकांच्या लक्षांत आला म्हणजे झालें. आपल्या समाजांतील मातांची अत्यंत निकृष्ट अवस्था हेंच बहुतांशीं आपल्या देशांतील विलक्षण अर्भकमृत्युसंख्येचें कारण होय हें सांगण्याचा आमचा मुख्य हेतु आहे. अशक्त, रोगी अशा स्त्रियांकडून प्रजोत्पत्तीचें कार्य होत असल्यावर सुप्रजा निर्माण होईल अशी आशा करणें व्यर्थ होय. पाया कच्चा असतांनाही इमारत बळकट होईल अशी अपेक्षा करणें कांहीं अधिक मूर्खपणाचें होणार नाहीं. यासाठीं सुप्रजाजननकार्याच्या दृष्टीनें आपल्या समाजानें आपल्या तरुण स्त्रियांची स्थिति सुधारली पाहिजे. पाळण्याची दोरी जिच्या हातीं आहे तिच्या हातींच साऱ्या देशाचें नशीब असतें ही म्हण थोड्या वेगळ्या अर्थानें येथेंही लागू पडते. तरुण स्त्रिया हेंच सुप्रजाजननाचें खरें आरंभस्थान होय.

मात्र तरुण मातांची सुधारणा करावयाचें मनाशीं योजिलें, कीं आणखी एक पायरी मागें जाऊन सुधारणेला प्रारंभ करणें अवश्य असल्याचें दिसून येतें. कारण मातृपदाला पात्र कोणत्या स्त्रिया होतात ? इतर पाश्चात्त्य देशांत या प्रश्नाचें उत्तर कसें दिलें जाईल तें सांगणें कठीण आहे; परंतु आपल्या देशांतील कांहीं थोडे अपवादात्मक प्रकार सोडून दिले, आणि सामान्यतः गोष्टी ज्या प्रकारें घडतात त्याकडेच लक्ष देऊन बोलावयाचें झालें तर आपल्याला असें म्हटलें पाहिजे कीं, विवाहित व पतिसंलग्न अवस्थेंतील स्त्रियांनाच मातृपदाची प्राप्ति होते. पति-

संलग्न स्त्रियांप्रमाणेंच कुमारिका आणि विधवा यांनाही गर्भधारणेची आणि अपत्य-जननाची उघड व पूर्ण मोकळीक समाजानें व कायद्यानें ठेविली पाहिजे, असें मतही कांहीं लोक प्रतिपादन करूं लागले आहेत. परंतु या मतांतील औचित्य आमच्या आकलनशक्तीच्या बाहेर असल्यामुळें असल्या मतवाद्यांची गणना मूर्खांत करणेंच आम्हांस प्राप्त आहे. कुमारिका व विधवा यांनाही संभोगाचीच नव्हे तर प्रजोत्पत्तीचीही सरसकट परवानगी कायदेशीर रीतीनें देण्यांत आली तर आपल्या विवाहसंस्थेला केवढा जबर धक्का बसेल, अनीति उजळ माथ्यानें कशी नांदूं लागेल आणि समाजाचे एकंदर व्यवहार किती विस्कळित होतील या गोष्टींचा या मत-वाद्यांनीं आपापल्या मनाशीं विचार केला तर स्वतःच्या मतांचें मूर्खत्व त्यांचें त्यांसच पटेल. इतका विचार करण्याइतकी कल्पनाशक्ति विधात्यानें त्यांस दिली नसली, किंवा दिली असून ती वापरण्याची इच्छा त्यांस होत नसली तर त्यांचें दुर्दैव ! इतकें म्हणण्यापलीकडे त्यांच्या विलक्षण मताची चर्चा या ठिकाणीं करण्याचें प्रयोजन नाहीं. आमचा मुख्य मुद्दा एवढाच होता कीं, ज्या अर्थी पतिसंलग्न विवाहित स्त्रियाच मातृपदारूढ होतात त्या अर्थी समाजांतील माता सुप्रजाजननक्षम करावयाच्या झाल्यास त्यांचे विवाहच योग्य रीतीनें आणि योग्य पुरुषाशीं होतील, अशी खबरदारी प्रथम घेतली पाहिजे. आपल्या देशांत कुप्रजा निर्माण होत आहे याचें कारण मातापितरांची अपात्रता होय. आणि स्त्री-पुरुष मातृपितृपदांकित होतात याचें कारण तीं विवाहबद्ध होतात हें होय. अर्थात् सुप्रजाजननकार्याचा भक्कम पाया जर घालावयाचा असेल तर तो या ठिकाणींच घातला पाहिजे. विचारवंत लोकांना ही विचरसरणी पटत जाणार यांत संशय नाहीं. थोड्याच दिवसांपूर्वीं शिशुसंवर्धनावरील एका व्याख्यानाच्या प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं असे उद्गार काढले कीं, "वास्तविक पाहतां शिशुसंवर्धनाच्या कार्याची खरी पहिली पायरी जन्मास आलेल्या बालकांचें संगोपन करणें ही नसून ज्यांच्या पोटीं बालकें यावया-चीं त्यांना जनकपदाची प्राप्ति होण्यापूर्वींच त्यांच्या आरोग्याची उत्तम काळजी घेणें हीच होय ! आणि ही काळजी घ्यावयाची म्हणजे विवाहसंस्थेची सुधारणा प्राप्त आहे. विवाह हेंच प्रजेचें मूळ उगमस्थान आहे. तें ज्याप्रमाणें शुद्ध आणि सर्व प्रकारें इष्ट असें असेल त्या मानानेंच सुप्रजा निर्माण होईल. तेव्हां आपल्या देशांतील लोकांचे संसार सुखाचे व्हावेत, यासाठीं काय केलें पाहिजे अशी ज्यास

तळमळ लागली असेल अशा सर्व विचारवंत लोकांनीं आपल्या समाजांत रूढ असलेली विवाहसंस्था दोषयुक्त आहे किंवा काय, आणि तिच्यांत कांहीं दोष असतील तर पूर्वपरंपरेला शक्य तितका कमी धक्का देऊन ते कसे काढून टाकतां येतील, या गोष्टींचीच चर्चा प्रथम केली पाहिजे." आपल्या समाजांत शक्य तितकी निर्दोष आणि पुढें सुप्रजेच्या जननाला पोषक होईल अशा प्रकारची विवाहपद्धति अंमलांत आणणें ही सुप्रजाजननाच्या कार्यक्रमांतील सर्वांत महत्त्वाची व मूलभूत कामगिरी आहे. अशा प्रकारची सुप्रजाजननास सहज मदत करणारी विवाहपद्धति कोणती तें निश्चित करावयाचें म्हटल्यास आपल्या समाजांत सध्यां जो विवाहप्रकार रूढ आहे, त्याच्या गुणदोषांची चर्चा करणें प्राप्तच आहे. व ती आपण यथावकाश करूंच; पण तत्पूर्वी, पुढील विवेचनाचें मर्म वाचकांच्या ध्यानांत सहज यावें म्हणून, एकंदर मानवी समाजांतच विवाहाची संस्था केव्हां व कां अस्तित्वांत येते याचा थोडक्यांत विचार करणें अगत्याचें आहे.

विवाह या नांवानें आपण ज्या प्रकाराचा निर्देश करतों तो वास्तविक कोणता? विवाह कशाला म्हणावें? विवाहाची व्याख्या तरी काय? हे प्रश्न जर आपण आपल्या मनाला विचारले तर थोड्या विचाराअंतीं आपणांस असें कबूल करावें लागेल, कीं केवळ स्त्री-पुरुषांच्या समागमाला कांहीं विवाह ही संज्ञा देतां येणार नाहीं. स्त्री-पुरुषांचा संभोग म्हणजे कांहीं विवाह नव्हे. केवळ संभोगालाच विवाह हें नांव द्यावयाचें झाल्यास पशुपक्ष्यांचे देखील विवाह होतात असें म्हणावें लागेल, आणि असें म्हणणें किती मूर्खपणाचें होईल हें कांहीं कोणी कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. दोन पक्षी किंवा पशु संभोगक्रियेपुरते एकत्र होतात, व ती क्रिया संपली कीं एकमेकांस सोडून जाऊन पुन्हा दुसऱ्याशीं संभोगरत होतात. उलट ज्यांना आपण विवाहबद्ध असें म्हणतों ते स्त्री-पुरुष एकमेकांपासून संभोगसुखाचा उपभोग घेतात येवढेंच नव्हे, तर स्वतःच्या संभोगलालसेवर अव्यभिचाराचें बंधन घालून एकमेकांच्या समागमांत आयुष्य घालवितात. यावरून दोन गोष्टी उघड होतात त्या ह्या कीं—

**१. विवाह म्हणजे संभोग नव्हे तर संभोगावर घातलेला निर्बंध**

आणि

२. हा निर्बंध किंवा ही **विवाहसंस्था निसर्गप्राप्त नसून कांहीं कारणांमुळें मनुष्यानेंच उत्पन्न केलेली आहे.**

मनुष्य जेव्हां रानटी स्थितींत होता तेव्हां विवाहाची चाल नव्हती, व मानवी सुधारणेचें पाऊल जसजसें पुढें पडत गेलें तसतशी ती चाल अस्तित्वांत येऊन तिचें स्वरूप निरनिराळ्या प्रकारांनीं पालटत गेलें. हा सिद्धान्त आतां सर्व पंडितांना मान्य झालेला आहे. वाटेल त्या स्त्री-पुरुषांनीं संभोगक्रियेपुरतें एकत्र यावें व ती क्रिया संपतच स्वेच्छाचारी वृत्तीनें वाटेल तिकडे जावें अशा पशुतुल्य स्थितींत मनुष्य प्राचीनकाळीं केव्हांतरी एकदां होता यांत संशय नाहीं. स्पेन्सरसारख्या पंडितांचें असेंच मत आहे, कीं मनुष्याच्या मूळच्या स्थितींत ज्याप्रमाणें कोणत्याही प्रकारची राज्यव्यवस्था नसते, ज्याचा तो धनी असतो, त्याप्रमाणेंच त्या अवस्थेंत विवाहसंस्थाही नसते आणि संभोग हा केवळ स्वेच्छाचाराचाच प्रकार असतो. आपल्या या आर्यावर्तांतही अति प्राचीनकाळीं एक वेळ अशी होती कीं तेव्हां विवाहाचें बंधन कोणाला माहीत नव्हतें व संभोग स्वेच्छाचारानेंच होत असत. याविषयीं श्री० चिंतामणराव वैद्य म्हणतातः "भारतांत आदिपर्वांत कुंती पंडु संवादांत पूर्वी मनुष्यांत विवाहाची चाल नव्हती असें स्पष्ट वर्णिलें आहे. इतकेंच नव्हे, पण्डूच्या वेळीं उत्तर कुरूच्या लोकांत अनियमित व्यवहार सुरू होते."

विवाह म्हणजे संभोगक्रियेवर मुद्दाम घातलेला एक निर्बंध हें जर खरें, आणि विवाह हा मूळ मानवी नैसर्गिक स्वभावाचा एक भाग नसून कालांतरानें तो मनुष्याकडून रूढ झाला असें जर असेल, तर विवाहसंस्था अस्तित्वांत आली ती कां आली हा प्रश्न साहजिकपणेंच उभा राहतो.

समाजशास्त्रवेत्त्यांनीं विवाहसंस्थेच्या उद्भवाचीं जीं अनेक कारणें दिलेलीं आहेत त्यांपैकीं दोन प्रमुख कारणांचाच येथें थोडक्यांत निर्देश करणें उचित होईल. पहिली गोष्ट ही कीं मानवी सुधारणेचा इतिहास पाहिला असतां असें दिसून येतें कीं, अगदीं निखालस रानटी स्थितींतून जरा वर आल्यावर मनुष्यें एकटीं एकटीं न राहतां लहान लहान संघ करून राहूं लागतात. अशा काळीं या अनेक संघांत परस्पर प्रेमभाव नसून परस्परांविषयीं द्वेषच असतो व निरनिराळ्या संघांत नेहमीं मारामाऱ्या व लढाया चालू असतात. मानवी उन्नतीच्या या काळाला युद्धप्रधान काळ असें म्हणतां येईल. या युद्धप्रधान काळांत जो संघ अंतर्गत एकी आणि संख्याबल यांनीं श्रेष्ठ असेल तोच इतर संघांना पादाक्रान्त करून विजयी होतो आणि सुखांचा उपभोग्य वस्तूंचा आणि सुखांचा उपभोग घेऊं शकतो. हें समाजाची अंतर्गत एकी आणि संख्या वाढण्यास विवाहसंस्थेची अतिशय मदत हो

असें मनुष्याच्या लक्षांत या युद्धप्रधान काळांत आल्यामुळेंच मूळ अनिर्बंध व्यवहाराची चाल टाकून देऊन विवाहसंस्थेची रूढि पाडण्यास मनुष्य तयार होतो. ज्या समाजांत विवाहप्रचार नाहीं त्या समाजांत कुटुंबव्यवस्था असणेंही शक्य नाहीं व जेथें कुटुंबव्यवस्था अस्तित्वांत नाहीं तेथें सहजगत्या जात्य-भिमानही नसतो. या कारणानें ज्या समाजाला इतर समाजांशीं नेहमीं युद्ध करीत राहून स्वतःची सुस्थिति व महती कायम ठेवणें भाग असतें, त्या समाजाला विवाहाचें महत्त्व लवकरच पटूं लागतें. समाजाचा सुसंघटितपणा व एकोपा वाढवून समाजाचें सामर्थ्य इतर समाजांस भयप्रद वाटेल असें करण्याचें एक अमोघ साधन या दृष्टीनें विवाहसंस्था मनुष्याला हवीशी वाटूं लागते; आणि त्याचप्रमाणें स्वेच्छाचारी स्त्री-पुरुषांपेक्षां विवाहबद्ध स्त्री-पुरुषांच्या पोटीं अधिक संतति निर्माण होते असाही अनुभव आल्यामुळें आणि एखादा समाज इतर समाजांहून संख्येनें जितका अधिक मोठा तितका तितका तो अधिक बलाढ्य असें समीकरण प्राचीन युद्धप्रधान काळांत साहजिकपणेंच असल्यामुळें मनुष्य विवाहसंस्थेचा आनंदानें पुरस्कार करतो.

मि० वेस्टरमार्क यांनीं आपल्या 'हिस्टरी ऑफ ह्यूमन मॅरेज' या पुस्तकांत असें प्रतिपादिलें आहे कीं, मनुष्याच्या ठिकाणीं निसर्गतः ज्या अनेक प्रवृत्ति व आसक्ति आहेत त्यांत सहचरलालसा ही फार प्रबळ आहे, व ही लालसाच विवाहाचें आदिकारण होय. केवळ संभोगापुरतें स्त्री-पुरुषांनीं एकत्र यावयाचें व त्यानंतर विभक्त व्हावयाचें हा पाशवी प्रकार मनुष्याच्या मनाला फार दिवस पटण्यासारखा नव्हता व त्यामुळें संभोगोत्तर साहचर्य कायम ठेवण्याचा क्रम त्यानें सुरू केला असला पाहिजे. हीच विवाहाची पहिली कल्पना होय, व या कल्पनेंत सहचरलालसेखेरीज कसलाच विचार नसतो. परंतु एकेका कुटुंबानें आपापल्या-पुरतें मिळवावें व खावें ही अवस्था हळुहळू नाहींशी होऊन माणसें समूहानें राहूं लागलीं कीं, वैयक्तिक किंवा कौटुंबिक हिताहितापेक्षां सामुदायिक निर्वाहाचा प्रश्न अधिक अगत्याचा ठरूं लागतो, आणि व्यक्तीच्या सर्व आचारविचारांचें नियंत्रण सामुदायिक कल्याणाच्या धोरणानें व्हावयास लागतें. मग इतर गोष्टीं-बरोबर व्यक्तींच्या विवाहाची गोष्टही तिच्या आधीन न राहतां समुदायाचे अधि-पति जीं बंधनें घालून देतील त्याप्रमाणें घडूं लागते. अर्थात् व्यक्तीच्या उपजत सहचरलालसेवर अनेक प्रकारचे निर्बंध पडतात. आपल्याला जी स्त्री हवीशी

वाटेल तिच्याशीं युक्त होण्याची व तिच्यापासून प्रजोत्पत्ति करण्याची मोकळीक पुरुषांना राहात नाहीं. इतकेंच नव्हे, तर समुदायाच्या हितासाठीं कांहीं पुरुषांना स्त्रीसंभोगापासून व प्रजोत्पादनापासून सर्वस्वीं अलिप्त ठेवणें अवश्य वाटूं लागून तशीं निर्बंधनेंही अस्तित्वांत येतात. कित्येक प्राणिवर्गांत श्रमविभागास अनुकूल अशी विशिष्ट अवयवांची रचना निसर्गतः त्या वर्गांतील त्या त्या प्राण्यांच्या ठायीं असल्याचें आढळून येतें उदाहरणार्थ, गांधीलमाशांमध्यें ज्या माशांकडे समुदायाच्या संरक्षणाचें काम असतें त्यांना शस्त्राप्रमाणें उपयोगी पडणारे कांहीं विशिष्ट अवयव असतात. ते बाकीच्या माश्यांना नसतात. ज्या माश्यांना वार्ताहराचें काम करावयाचें असतें त्यांना त्या कामीं उपयोगी पडतील असे कांहीं विशिष्ट अवयव असतात व ज्या माश्यांकडे फक्त प्रजोत्पादनाची कामगिरी असते, त्यांच्या ठिकाणीं जननविषयक अवयवच विशेष पुष्ट स्थितींत असतात. या प्रकारचें अवयववैशिष्ट्य मानवी समुदायाच्या घटकांत निसर्गानें ठेवलेलें नाहीं. तथापि मानवी समाजांत श्रमविभागाच्या तत्त्वाचा पुरस्कार प्रथमपासूनच केला जातो, व कांहीं व्यक्तींनीं जननकार्यापासून अलिप्त राहून समाजाच्या संरक्षणासाठीं लढण्याचेंच तेवढें कार्य नेहमीं करावें, आणि दुसऱ्या कांहीं व्यक्तींनीं युद्धकार्य न अंगीकारितां विवाहित होऊन प्रजोत्पादन करावें अशी व्यवस्था प्रचारांत येते. या व्यवस्थेचा विचार केल्यास, "विवाह म्हणजे संततिनियमनाचीच एक पद्धति होय" असें आपल्याला दिसून येईल असें मि० फ्लॉइड डेल या लेखकाचें म्हणणें आहे. या विधानाचा अधिक विचार आपण पुढें यथाक्रम करूं. पण येवढें खास कीं, मूळ ज्या सहचरलालसेमुळें विवाह अस्तित्वांत आला त्या लालसेला हळुहळू गौणत्व प्राप्त होऊन विवाहाच्या गोष्टीवर इतर विचारांचेंच दडपण अधिक पडलें; आणि विवाह ही संभोगलालसेची साहजिक फलश्रुति असें म्हणण्याऐवजीं त्या लालसेवर घातलेला निर्बंध असेंच समजणें प्राप्त झालें. सर हेन्री मेन नांवाचे सुविख्यात कायदेपंडित म्हणतात कीं, आजारी मनुष्याच्या खाण्यापिण्याच्या वासनेवर ज्याप्रमाणें पथ्याचें बंधन असतें तद्वतच मानवी समागम–प्रवृत्तीवर विवाह हें एक बंधन होय.

अनियमित स्त्री-पुरुषव्यवहाराच्या रानटी अवस्थेतून बाहेर पडून विवाहसंस्थेचा मनुष्यानें केव्हां व कोणत्या कारणांनीं आश्रय केला याविषयीं समाजशास्त्रवेत्त्यांची जीं सर्वमान्य मतें आहेत, त्यांच्याशीं आतांपर्यंत वाचकांचा आम्हीं परिचय

करून दिला. आतां विवाहसंस्था एकदां अस्तित्वांत आल्यानंतर मानवी सुधारणे-बरोबर तिचें स्वरूप कसकसें बदलत गेलें याचीही स्थूल कल्पना वाचकांस थोडक्यांत करून दिली पाहिजे. युद्धप्रधान काळांत विवाहसंस्थेचा प्रथम उगम झाला असावा हें आम्हीं वर दर्शविलेंच आहे. अर्थात् या युद्धकाळांतील इतर आनुषंगिक परिस्थितीचा परिणाम विवाहपद्धतीवर झाला, आणि नवऱ्याच्या आपल्या बायकोविषयीं किंवा सामान्यपणें समाजाच्या स्त्रीजाती-विषयींच्या कल्पनाही त्या काळच्या व परिस्थितीच्या वळणानुसार बनल्या. त्या काळीं बलिष्ठ समाजांतील किंवा राष्ट्रांतील लोक दुर्बळ समाजांतील लोकांचा पाडाव करून त्यांतील पुरुषांस आपले गुलाम करीत व त्याचप्रमाणें त्यांच्या स्त्रियांसही पकडून आणून त्यांच्याशीं लग्नें लावीत. त्यामुळें इतर वस्तूंवर ज्या-प्रमाणें त्याच्या मालकाचा किंवा त्या मालकावर जो विजय मिळवील त्या जेत्याचा हक्क असतो त्याप्रमाणेंच स्त्रियांचीही गोष्ट आहे असा समज प्रचलित झाला व स्त्रियांना पूर्ण दास्यत्व प्राप्त झालें. जोंपर्यंत युद्धप्रधान काळ होता तोंपर्यंत स्त्रिया केवळ दास्यासच पात्र होत या कल्पनेवर उभारलेला विवाहप्रकारच प्रचलित होता; परंतु कालांतरानें समाज मोठमोठे होऊन स्थायिक झाले, आणि युद्धाचें प्राधान्य कमी होऊन आणि चहूंकडे शांतता नांदूं लागून कायदे व राज्य-व्यवस्था यांचा अंमल समाजावर हळुहळू बसूं लागला. तेव्हां लोकांच्या मनांत प्रगल्भ आणि औदार्याचे विचार उदय पावूं लागले, आणि त्यायोगानें स्त्रिया या केवळ दासी होत ही कल्पना नाहींशी व्हावयास लागली. स्त्रियांची योग्यता पुरुष वर्ग ओळखूं लागल्यामुळें त्यांस आपला नवरा पसंत करण्याचा हक्क मिळाला व या सर्व गोष्टींचा विवाहसंस्थेवर परिणाम होऊन स्वयंवरासारखे किंवा गांधर्व-विवाह, प्रीतिविवाह अशासारखे विवाहप्रकार अस्तित्वांत आले. यानंतर विवाह संस्थेच्या इतिहासांतील महत्त्वाचें स्थित्यंतर हें कीं, धर्माचा विवाहावर पगडा बसला आणि विवाह हा इतर धर्मकृत्यांप्रमाणें एक धार्मिक विधिच मानण्यांत येऊं लागला. पतिपत्नींचीं परस्परांविषयीं कोणतीं कर्तव्यें आहेत हेंही धर्मानें ठरविलें. पतिपत्नींनीं कोणत्या प्रकारचें आचरण विहित आणि कोणतें निषिद्ध मानावें यासंबंधींचे नियमही धर्मानेंच घालून दिले. आणि विवाह शास्त्रसंमत व कायदेशीर व्हावयासाठीं अमुक अमुक विधि केलेच पाहिजेत अशा सक्तीच्या धर्माज्ञाही हलके हलके रूढ झाल्या. विवाहाचा हा प्रकार रूढ झाल्यानें एक मोठा

दुष्परिणाम घडून आला तो हा कीं, स्त्रियांच्या दास्यत्वाची पहिली कल्पना मध्यंतरीं स्वयंवरकालामध्यें जी नाहींशी व्हावयास लागली होती, ती पुन्हा वळावली, आणि नवऱ्यानें कसाही प्रकारचें स्वैराचरण केलें तरी हरकत नाहीं; स्त्रीनें मात्र सर्वस्वी पतीच्या आधीन राहून व पति हेंच आपलें परम दैवत समजून त्याची सेवा करण्यांत आपलें सर्वंध आयुष्य वेंचावें असली एकांगी नीतिमत्ता समाजांत मान्य झाली.

श्रीयुत चिंतामणराव वैद्य यांच्या मतें विवाहसंस्थेचीं हीं विविध व एकापुढचीं एक स्वरूपें होऊन गेल्याची साक्ष आपल्या धर्मांत विवाहाचे जे आठ प्रकार वर्णिले आहेत त्यांवरून देखील पटण्यासारखी आहे. आतांपर्यंतच्या विवेचनावरून (१) प्रथम अनियमित स्त्री-पुरुषव्यवहार, (२) मग स्त्रियांच्या दास्यत्वाच्या कल्पनेवर अधिष्ठित झालेली विवाहसंस्था, त्यानंतर (३) प्रेम व स्त्रियांविषयीं उदारबुद्धि यांवर उभारलेले स्वयंवरासारखे विवाहप्रकार, आणि शेवटीं (४) धर्म-विधींनीं भारावलेला विवाहप्रकार अशीं विवाहसंस्थेचीं अवस्थांतरें होत गेल्याचें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. यावर श्रीयुत वैद्य यांची कल्पना अशी आहे कीं, स्मृतींत वर्णिलेले ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, गांधर्व, आसुर, राक्षस आणि पैशाच यांचा उलटया क्रमानें विचार केला तर "हिंदुस्तानांत विवाह कसकसे सुधारत गेले याचें हीच मालिका दर्शक आहे. पैशाच विवाह म्हणजे अनियंत्रित स्त्री-पुरुष-समागम; राक्षस म्हणजे बायको पकडून आणणें व हें स्त्रियांच्या दास्यत्वाचें चिन्ह होय; आसुर म्हणजे बायको विकत घेणें; आणि गांधर्व म्हणजे स्त्री-पुरुषांनीं एकमेकांच्या अनुमतीनें एकमेकांस वरणें. बाकी राहिलेले चार विवाहसंप्रदाय धर्म-प्राबल्याचा काळ दर्शवितात. सारांश, हे आठ विधि विवाहाचे प्रकार कसे बदलत गेले तें स्पष्टपणें दर्शवितात."

श्रीयुत वैद्य यांची ही सरस कल्पना ग्राह्य मानणें किंवा न मानणें हें आम्ही वाचकांच्याच विवेचकशक्तीवर सोंपवितों. विवाहसंस्था कोणत्या कारणानें अस्तित्वांत आली, आणि तिचें स्वरूप कसकसें पालटत गेलें हें वाचकांच्या नजरेस आणणें हा आमचा मुख्य हेतु होय व तो साध्य झाला म्हणजे या विवेचनाचें कार्य संपलें.

---

# प्रकरण तिसरें

विवाहसंस्था कशी रूढ होते आणि तिचे निरनिराळे प्रकार कालमानाप्रमाणें कसे मान्य होतात याची चर्चा आतांपर्यंत झाली. पण यापुढें, आज आपल्या समाजांत कोणत्या स्वरूपाची विवाहरीति प्रचलित आहे, ती सदोष आहे किंवा काय, तिच्यांत जर कांहीं दोष असतील तर ते काढून टाकण्यांत आपल्या प्राचीन सुसंस्कृतीस कांहीं धक्का बसण्यासारखा आहे काय, इत्यादि अनेक प्रश्नांचा विचार आपल्याला केला पाहिजे. कारण समाजांत सर्वत्र सुखाने संसार दिसावेत या दृष्टीनें सर्वांत इष्ट विवाहपद्धति कोणती याचा निश्चय आपणांस मुख्यत्वेंकरून करावयाचा आहे, व तो करण्याच्या कामीं या विचाराची आपणांस अतिशय मदत होण्यासारखी आहे.

आजघटकेला आपल्या देशांत सामान्यपणें कोणता विवाहप्रकार रूढ व मान्य आहे ? या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाहीं. कारण, हिंदुस्थान देशांत इतक्या अनंत जाति व पोटजाति आहेत, व त्या निरनिराळ्या जाति-पोटजातींतील विवाहविधि इतके विविध आहेत, कीं सरसकट सबंध देशांत अमुक एक विवाहप्रकार सर्व संमत आहे असें विधान करणें कठीण आहे. आपल्या दाक्षिणी लोकांत विवाहाच्या ज्या चाली रूढ आहेत त्या जशाच्या तशा गुजराथी लोकांत दिसून येतील असें नाहीं, किंवा पंजाब देशांत आणि बंगाल प्रांतांत प्रचलित असलेले विवाहप्रकार सर्वस्वीं सारखे आहेत असेंही म्हणतां येणार नाहीं. देशभिन्नत्वाप्रमाणें विवाहाच्या चाली भिन्न भिन्न आहेत. इतकेंच नव्हे तर सामाजिक दर्ज्यांतील भिन्नत्वाप्रमाणेंही विवाहसंबंधींच्या चाली वेगवेगळ्या असलेल्या आढळून येतात. गरीब शेतकऱ्याच्या मुलाचें लग्न ज्या प्रकारें होतें तो प्रकार एखाद्या श्रीमंत व्यापाऱ्याच्या किंवा विद्वान् आणि कीर्तिमान् ब्राह्मणाच्या मुलाच्या लग्नप्रकाराहून किती तरी निराळा असतो. सारांश, जाति, संपन्नता आणि प्रांत या तिहींच्या अंमलाखालीं सांपडलेली आमची विवाहसंस्था आमच्या देशाच्या वेगवेगळ्या भागांत भिन्न भिन्न स्वरूपांत दृष्टीस पडते. मात्र, या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी हिंदुस्थानांत बहुतांशीं सर्वमान्य असलेला विवाहप्रकार कोणता तें निश्चित करणें अगदींच कांहीं अशक्य नाहीं. हिंदुस्थानच्या कांहीं प्रांतांत किंवा कांहीं जातींत वराकडून वधूस हुंडा मिळत असेल

व उलट कांहीं ठिकाणीं किंवा कांहीं जातींत वराला हुंडा मिळत असेल; किंवा वधूनें विवाहानंतर श्वशुरगृहीं राहण्यासंबंधीं भिन्न प्रदेशीं भिन्न प्रचार मान्य असतील; किंवा विवाहाच्या आनुषंगिक धर्मविधींमध्येंही ठिकठिकाणीं फरक आढळून येईल. परंतु या गौण गोष्टी सोडून दिल्या आणि विवाहाची कल्पना ज्या तत्त्वावर उभारलेली आहे त्याकडेच मुख्यतः लक्ष पुरविलें तर आपल्या देशांत सार्वत्रिक प्रचारांत असलेला असा एकच विवाहाचा प्रकार आहे असें आपणांस म्हणतां येण्यासारखें आहे, विवाहाचीं जीं अवस्थांतरें मागच्या प्रकरणांत आम्हीं वर्णिलीं, त्यांपैकीं शेवटची अवस्था आपल्या देशांत आज घटकेला बहुतेक ठिकाणीं दिसून येते. विवाह हा एक धार्मिक विधि आहे असें ज्या विवाहप्रकारांत मानण्यांत येतें, ज्या प्रकारांत विवाहसंस्थेवर धर्माचा जबर पगडा असतो, व पतिपत्नींचीं कर्तव्येंही प्रेमाच्या स्वभावानुसार नव्हे तर धर्माच्या विधिनिषेधानुसार ठरविलीं जातात, आणि स्त्रिया या केवळ दास्यत्वासच पात्र असून केवळ उपभोग्य वस्तूप्रमाणें त्यांस वागविण्याचा पुरुषांस हक्क आहे ही निंद्य कल्पना ज्या प्रकारांत ग्राह्य मानली जाते, अशा प्रकाराचें वर्णन आम्हीं मागच्या प्रकरणांत केलेलें वाचकांस आठवत असेल. तें ध्यानांत ठेवून आपल्या देशांतील विवाहांकडे वाचकांनीं पाहिल्यास या विवाहांस तें वर्णन तंतोतंत लागूं पडतें असें वाचकांस सहज पटेल. आज आपल्या देशांत जी विवाहसंस्था सामान्यपणें रूढ आहे तिला धर्मप्राबल्यदूषित असें म्हणणें वावगें होणार नाहीं. धर्माची व विवाहसंस्थेची सांगड असणें वाईट असें आमचें म्हणणें आहे असें वाचकांनीं समजूं नये. उलट, समाजाच्या नीतीचें आणि त्यामुळें एकीचें ज्यामुळें रक्षण होतें—धारयतीति धर्मः—तो धर्म ही जर धर्माची व्याख्या असली, व त्या व्याख्येची सिद्धता करण्यासारखेंच जर आचार-धर्माचें स्वरूप शुद्ध, सात्त्विक व परमहितकारक असेल, तर अशा धर्माच्या संगतीनें विवाहसंस्था निकृष्ट होण्यापेक्षां अधिकाधिक उज्ज्वलच होत जाईल असें आम्ही निःसंशयपणें मानतों. परंतु दुर्दैवानें आमच्या देशांत आज विवाह व धर्म यांची जी सांगड जडलेली आहे ती इतकी सोज्ज्वल व सुपरिणामी नाहीं. केवळ धर्मानेंच आपला अंमल आमच्या विवाहसंस्थेवर बसविला आहे असें नव्हे, तर ज्याप्रमाणें एखाद्या बिजवर नवऱ्याच्या घरांत त्याची सासू एकदां शिरली म्हणजे त्याच्या संसाराचा कारभार आपल्या हातीं घेऊनच ती स्वस्थ बसते असें नव्हे, तर आपल्या घरचीं सारीं माणसें त्याच्या संसारावर पोसण्याची तिची खटपट चालू

असते, त्याप्रमाणेंच आमच्या विवाहसंस्थेची स्थिति करुणास्पद झाली आहे. आमच्या विवाहसंस्थेनें धर्माचें प्राबल्य मान्य केल्यामुळें त्या धर्माबरोबरच ज्यांचा विवाहाशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं असे किती तरी अलबतेगलबते पाहुणे त्या संस्थेच्या ओसरीवर येऊन बसले, आणि हळुहळू पाय पसरून त्यांनीं सारें घर व्यापून टाकलें. असल्या एका पाहुण्याचा उदाहरणार्थ निर्देश करावयाचा झाल्यास फलज्योतिषशास्त्राच्या आधीन आपली विवाहसंस्था किती झाली आहे तें पहावें. फलज्योतिषशास्त्र स्वतः पूर्ण सिद्ध आहे असें नव्हे. त्याचे अनेक सिद्धान्त आजही संशयग्रस्त आहेत आणि त्या शास्त्राच्या प्रचलित नियमांवरून काढलेलीं फळें पुरतेपणीं प्रत्ययास आल्याचा दाखला फारच क्वचित् मिळतो, या गोष्टी त्या शास्त्राचे कट्टे पुरस्कर्तेही कबूल करतात. पण असें असूनही या अपरिपक्व शास्त्रानें आमच्या विवाहसंस्थेवर केवढें वर्चस्व बसविलें आहे ! वधूवरांच्या पत्रिका जुळण्याच्या अटीपासून तों विवाहमुहूर्ताच्या आणि गृहप्रवेशमुहूर्ताच्या अटीपर्यंत हजार ओझीं या फलज्योतिषशास्त्रानें आमच्या विवाहसंस्थेवर लादलीं आहेत; आणि त्या ओझ्याखालीं आमच्या विवाहसंस्थेचीं हाडें पार चुरडून गेल्याची साक्ष देणारे शेंकडों दुष्परिणाम आपल्या समाजांत आढळून येतात. धर्मप्राबल्यामुळें आमच्या विवाहसंस्थेवर जो सर्वांत अनिष्ट असा परिणाम झाला आहे तो हा कीं, आमच्या देशांत बालविवाह प्रचलित झाला, आणि प्रौढविवाहाचा प्रकार धर्मविरुद्ध अतएव त्याज्य ठरला. रजपूत जातीसारखे कांहीं थोडे अपवाद वगळले तर हिंदुस्थानांत हिमालयापासून केपकामोरिनपर्यंत आणि कलकत्त्यापासून पेशावरपर्यंत बालविवाहच रूढ आहे. आज हिंदुस्थानांत सामान्यपणें कोणत्या तऱ्हेची विवाहसंस्था प्रचलित आहे हा जो प्रश्न आम्हीं प्रकरणाच्या आरंभीं उपस्थित केला, त्याला आपणांस असें उत्तर देतां येईलसें आतां दिसतें कीं, हिंदुस्थान देशांत धर्मप्राबल्यदूषित बालविवाहाचा प्रकारच प्रायः सर्वत्र दिसून येतो. हा बालविवाहाचा प्रकार आमच्या देशांत इतका दृढमूल झालेला आहे कीं, त्याचे अनंत दुष्परिणाम समंजस माणसांच्या मतीला चटकन् पटण्यासारखे असूनही आणि आमची आजची नऊशें अधिक वर्षांची राजकीय अवनति बऱ्याच अंशांनीं या विवाहप्रकारामुळेंच आल्याचें अनेक पंडित आमच्या कानींकपाळीं ओरडत असूनही त्याचा बीमोड करण्याची इच्छा अजून कोणाला विशेषेंकरून होत नाहीं. हा बालविवाहप्रकार आमच्या हिंदु समाजांत जो एकदां उद्भवला त्यानें आपलीं

पाळेंमुळें खोलपर्यंत आमच्याच समाजांत पोंचविलीं असें नव्हे तर ज्या मुसलमान लोकांशीं आमच्या देशाचा सुमारें १००० व्या सनापासून संबंध आला त्या मुसलमान समाजांतही त्यानें मूळ धरलें आणि आजमितीला हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान समाज इतर अनेक इष्टानिष्ट गोष्टींत एकमेकांपासून कितीही भिन्नाचारी असले तरी बालविवाहाच्या फुटक्या होडींत दोघांनींही आपल्या स्वहिताचें गांठोडें सारख्याच अंधपणानें आणि मूर्ख धर्मश्रद्धेच्या कल्पनेनें ठेवलेलें आहे आणि ती फुटकी होडी प्रतिदिवशीं रसातळाला जात असूनही दोन्ही समाज सारख्याच मतिमंदपणानें आपला सर्वनाश उघड्या डोळयांनीं पहात आहेत.

या बालविवाहाच्या चालीपासून कोणकोणते दुष्परिणाम होतात तें काय सांगावें ? थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास आम्ही येवढेंच म्हणूं कीं, जोंपर्यंत हा बालविवाहप्रकार नामशेष झाला नाहीं तोंपर्यंत आपल्या देशांत सुप्रजाजनन होण्याविषयीं आशा करणें व्यर्थ होय. कुप्रजाजननाचा एकादा रामबाण उपाय कोणीं विचारला तर बालविवाह असें उत्तर द्यावें, इतका हा प्रकार अनिष्ट आहे. श्रीयुत वैद्य यांनीं आपल्या एका निबंधांत प्रसिद्ध इतिहासकार टाल्बाईस व्हीलर याचें बालविवाहाविषयीं जें मत उध्दृत केलें आहे तें असें आहे कीं, “ हिंदु लोकांपेक्षां पाश्चात्य लोक बळकट आहेत याचें कारण निराळी हवा व निराळा मानववंश हीं आहेत हें खरें; पण एक गोष्ट कधींही विसरतां कामा नये. जोंपर्यंत हिंदुस्थानचे लोक लहान मुलांचीं घरांत कोंडून ठेवलेल्या लहान मुलींशीं लग्नें करतील तोंपर्यंत त्यांची प्रजा लहान पोरांपेक्षां अधिक चांगल्या स्थितींत कधींच येणार नाहीं. स्वतंत्रता व स्वराज्य यांस अवश्य लागणाऱ्या चळवळीनें ते निःशक्त मात्र होऊन जातील. अशा राजकीय अधिकाराचा उपभोग घेण्यास कोणत्याही शिक्षणानें ते समर्थ होणार नाहींत. शिक्षणानें प्रौढ मनुष्याप्रमाणें ते बोलूं शकतील, पण त्यांचे विचार व आचार लहान मुलांप्रमाणेंच राहतील.”

सुप्रजाजननाच्या मार्गांत बालविवाह म्हणजे एक भयंकर अडचण कशी आहे याचें याहून अधिक स्पष्ट शब्दांत वर्णन करण्याची काय गरज आहे ? बालविवाहापासून समाजाचें अनेक प्रकारें अनहित कसें होतें याविषयीं आजपर्यंत अनेक अधिकारी लेखकांनीं आपापल्या ग्रंथांत सविस्तर विवेचन केलें आहे. या निबंधाचा मुख्य विषय निराळा असल्यामुळें बालविवाहाविषयीं सविस्तर विवेचन करणें या ठिकाणीं अनुचित होईल. वाचकांच्या समाधानासाठीं बालविवाहाच्या अनेक

दुष्परिणामांपैकीं जे प्रमुख आहेत त्यांचाच फक्त खालीं संक्षेपतः उल्लेख केला तरी पुरेसें होईल अशी आमची समजूत आहे.

१. बालविवाहापासून शारीरिक ऱ्हास होतो. ज्या समाजांत बालविवाह रूढ आहे त्या समाजांतील स्त्री-पुरुषांच्या अंगचें शरीरबल हलकें हलकें नाहींसें होतें, इतकेंच नव्हे तर धैर्यशौर्य-पराक्रमादि गुण हळुहळू विलयास जातात.

२. याचाच परिणाम असा होतो कीं, समाजांतील स्त्री-पुरुष उत्तरोत्तर अधिकाधिक हतबल, भ्याड आणि पराक्रम-पराङ्मुख झाल्यामुळें परकी लोक त्या समाजावर आपलें प्रभुत्व सहज प्रस्थापित करतात आणि त्या कारणानें त्या समाजाची राजकीय अवनति होते.

३. बालविवाहामुळें स्त्रियांवर मातृपदाची जबाबदारी अकालीं पडते आणि पोरसवदा, अननुभवी आणि अशक्त अशा मातांच्या हातीं अर्भकांच्या संगोपनाचें काम आल्यामुळें तें व्हावें तसें होत नाहीं, व भावी प्रजेचें अनेक प्रकारें नुकसान होतें.

४. बालविवाहामुळें स्त्री-पुरुषांचें शिक्षण अकालीं बंद होतें, आणि चालू राहिलें तरी त्यांत अनेक प्रकारच्या अडचणी उद्भवतात.

५. बालविवाहामुळें बालविधवांचा एक मोठा वर्गच समाजांत निर्माण होतो, आणि समाजाची घडी अनेक प्रकारें विस्कळित होते.

६. बालविवाहामुळें खऱ्या प्रेमाची ओळख स्त्री-पुरुषांस क्वचितच होते, आणि अमर्याद स्वर्गीय प्रेमाच्या प्रोत्साहनानेंच घडण्यासारखीं पराक्रम-कृत्यें त्या समाजांतून सर्वस्वीं लुप्त होतात.

७. तसेंच बालविवाहामुळें स्त्री-पुरुषांच्या मानेवर संसाराच्या चिंतेचें जोखड अल्पवयांतच पडल्यामुळें धाडसाच्या कोणत्याही कार्याकडे त्यांची प्रवृत्ति होत नाहीं, आणि असा हळूपणा स्त्री-पुरुषांच्या अंगीं मुरल्यानें तो समाज किंवा तें राष्ट्र विद्येंत, कलाकुसरींत, शास्त्रीय शोधांत किंवा दुसऱ्या कोणत्याही जगत्कल्याणाच्या कामगिरींत धडाडीनें पुढें येऊं शकत नाहीं.

ही यादी आणखी कितीही लांबविली तरी पुरी व्हावयाची नाहीं. कोळशाचा काळेपणा किती उगाळून दाखविणार ! मात्र या दोषांची चर्चा जरी येथेंच थांबविली तरी एका मुद्दयाचा विचार या ठिकाणीं केलाच पाहिजे. तो मुद्दा असा कीं, बालविवाहाचे सर्व दुष्परिणाम बुद्धीला पटत असूनही कांहीं लोक त्याच प्रकाराला स्वतः चिकटून राहतात, दुसऱ्यांसही तसें करावयाचा उपदेश करतात आणि

कोणीं त्यांस विचारलें तर म्हणतात, "अहो, आमच्या शास्त्रकारांनीं जो धर्म आम्हांस घालून दिला त्या धर्माप्रमाणें वागणें हेंच आपलें कर्तव्य आहे. आजच्या विसाव्या शतकांतील नास्तिकबुद्धीनें बालविवाहप्रकारांत कितीही उणेपणा शोधून काढला तरी तो मार्ग आम्हांस आमच्या मूळ शास्त्रकारांनीं दाखवून दिलेला आहे. त्या निःसीम ज्ञानयुक्त शास्त्रकारांच्या शहाणपणाविषयीं रतिभरही शंका घेणें आम्हांस शोभत नाहीं, आणि त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें जाणें यांतच आमचें कल्याण आहे."

अशा प्रकारच्या विचारसरणीला अनेक समंजस लोक बळी पडले आहेत, आणि आधुनिक शिक्षणाच्या योगानें अवतरलेल्या जागृति-युगांतही, एखाद्या झंझावातांत लहानसें लवाळें सुरक्षित रहावें त्याप्रमाणें, बालविवाहाची विषवल्ली आमच्या समाजांत दृढमूल धरून टिकली आहे याचें बरेंचसें कारण या समजुतींतच आपणांस सांपडेल.

म्हणून या ठिकाणीं आमच्या वाचकांस शक्य तितक्या कटाक्षानें आम्ही असें सांगूं इच्छितों, कीं बालविवाह शास्त्रसंमत आहे आणि प्रौढविवाहाचा प्रकार शास्त्र विरुद्ध आहे ही समजूत सर्वथैव चुकीची आहे. इतर समाजांप्रमाणेंच आपल्याही समाजांत, किंबहुना इतर समाजांपेक्षां अधिक, असे लोक आहेत कीं धर्मश्रद्धा आणि विवेचकशक्ति यांचा लढा पडल्यास ते आपली विवेचकशक्ति दोषयुक्त समजण्यास आणि धर्माप्रमाणें चालण्यास तयार असतात. अशा लोकांना, सारासारबुद्धीला पटणारें असें बालविवाहाच्या दुष्परिणामांचें कितीही लांबलचक विवेचन केलें तरी तें न पटून "पण आमच्या शास्त्रांत बालविवाह सांगितला आहे ना!" ही त्यांची शंका कायम राहते, आणि या शंकेचाच वरपगडा त्यांच्या वर्तनावर सदैव राहतो. अशा लोकांस आमचें पुनःपुन्हा असें सांगणें आहे कीं, प्रौढविवाह शास्त्रविरुद्ध आहे अशा समजुतीला कसलाही आधार नाहीं. प्रौढविवाह करणें गर्ह्य असून बालविवाहच विहित आहे असें आपल्या शास्त्रांचें सांगणें नाहीं. येवढें नुसतें म्हणून वाचकांची खात्री पटण्यासारखी नाहीं आणि हा मुद्दा तर फार महत्त्वाचा आहे म्हणून या मुद्दयाच्या पुष्टीकरणार्थ कांहीं गोष्टी सांगितल्या पाहिजेत.

प्रौढविवाह शास्त्रनिषिद्ध असून बालविवाहच शास्त्रसंमत आहे अशी ज्या लोकांची आग्रही समजूत आहे ते यम, संवर्त व पराशर या ऋषींच्या वचनांचाच आधार नेहमीं दाखवीत असतात. विशेषतः "दशवर्षा भवेत्कन्या अत ऊर्ध्वं

रजस्वला '' हें पराशरांतील वचनें लोकांपुढें मांडून ते असें प्रतिपादतात कीं, मुलीला अकरावें वर्ष लागलें म्हणजे तिला प्रत्यक्ष रजोदर्शन झालें नाहीं तरी रजस्वला या संज्ञेस ती पात्र होते आणि त्यामुळें रजस्वला कन्येचें दान करण्यांत जो दोष पित्यास लागण्यासारखा असतो तोच अशा कन्येच्या दानानेंही लागतो. अर्थात् अकराव्या वर्षाच्या आंत कन्येचें लग्न बापानें केलें पाहिजे. या वचनाप्रमाणेंच हे लोक संवर्तांतील एक वचन नेहमीं पुढें मांडीत असतात. '' विवाहोऽष्टमवर्षायाः कन्यायास्तु प्रशस्यते । '' असा तो श्लोकार्ध आहे व कन्येचें आठवें वर्ष तिच्या लग्नाचा उत्तम काल होय असा त्याचा अर्थ हे लोक लावीत असतात.

परंतु रावबहादुर आठल्ये, चिंतामणराव वैद्य यांजसारख्या संस्कृतप्रवीण पंडितांनीं या वचनांचा खरा अर्थ मोठ्या शोधक बुद्धीनें लावला असून हीं वचनें बालविवाहप्रशस्तिपर नसल्याचें पूर्णपणें सिद्ध केलें आहे. पराशरांत '' दशवर्षा भवेत्कन्या '' वगैरे जें वचन आहे त्याच्या पुढच्याच श्लोकांत '' प्राप्ते तु द्वादशे वर्षे यः कन्यां न प्रयच्छति, मासि मासि रजस्तस्याः पिबंति पितरः स्वयम् ॥ '' असें म्हटलेलें आहे. याचा वरवरचा अर्थ पाहिला तर असा दिसतो कीं, '' कन्येला बारावें वर्ष लागल्यानंतरही जो तिचें दान करीत नाहीं त्याचे पितर त्या कन्येच्या दर महिन्याच्या ऋतुस्नानांतील रज पितात.'' अशा उत्तानार्थावरून बालविवाहाग्रही लोक असें समजतात कीं, पराशरानें अकराव्या वर्षानंतरचा विवाह सर्वथैव निषेधार्ह आणि भ्रष्ट मानलेला आहे. परंतु हें अनुमान चुकीचें आहे. कारण, '' मासि मासि '' म्हणजे '' दर महिन्याला '' कन्येच्या रजाचें पितर प्राशन करतील असें म्हणण्यांत मुलगी बारा वर्षांची झाली कीं, ती हटकून दर महिन्याला रजस्वला होईलच असें पराशरांचें म्हणणें आहे काय ? पराशरांच्या काळीं बाराव्या वर्षानंतरही कित्येक मुलींना रजोदर्शन घडत नसेल. तेव्हां मुलगी बारा वर्षांची झाली कीं ती हटकून ऋतुमती होईलच व प्रतिमासीं तिला रजोदर्शन घडेलच अशा समजुतीनें पराशरांनीं उपरिनिर्दिष्ट श्लोक लिहिलेला असणें शक्य आहे काय ? जर नाहीं, तर त्यांच्या श्लोकाचा उत्तानार्थ न स्वीकारतां त्याचा जरा सूक्ष्मपणें व कल्पकतेनें अर्थ लावला पाहिजे. तो असा कीं, ज्या अर्थी '' मासि मासि '' असा प्रयोग पराशरवचनांत आहे त्या अर्थी '' द्वादश '' याचा '' नक्की बाराच वर्षें '' असा न करतां '' जी कन्या ऋतुमती झाली आहे ती '' असा लक्षणार्थच घेतला पाहिजे. आणि तो घेतला म्हणजे मुलीचें लग्न अकराव्या वर्षा-

च्या आंत झालें पाहिजे असें पराशरांचें सांगणें नसून मुलगी ऋतुमती होण्याच्या आंत पित्यानें तिचें दान करावें इतकाच त्यांचा अभिप्राय असल्याचें सिद्ध होतें.

" विवाहोऽष्टमवर्षीयाः कन्यायास्तु प्रशस्यते । " या संवर्तवचनाविषयींदेखील बालविवाहाग्रही मंडळींनीं स्वतःची अशीच व्यर्थ. गैरसमजूत करून घेतली आहे असें विद्वानांचें मत आहे. याच वचनास पुष्टि देणारें असें एक मरीचिवचन आहे व तेंही नेहमीं पुढें आणलें जातें. तें वचन असें आहेः—

**गौरी ददन्नाक पृष्ठं वैकुंठं रोहिणीं तदत् ।**
**कन्यां ददद् ब्रह्मलोकं रौरवंतु रजस्वलाम् ॥**

या वचनांत प्रारंभींच आठ वर्षांच्या कन्येचें दान केल्यास पित्यास स्वर्गप्राप्ति होते असें म्हटलें आहे, यांत संशय नाहीं. पण बाकीचा श्लोकभाग लक्षांत न घेतां केवळ या पहिल्या श्लोकचतुर्थाकडे लक्ष देऊन शास्त्रांत बालविवाहच सांगितला आहे असें म्हणणें सयुक्तिक होणार नाहीं. कारण, या श्लोकांत आठव्या वर्षीं कन्येचें दान करणाऱ्या पित्यास स्वर्गपृष्ठ मिळतो येवढेंच सांगितलेलें नाहीं तर त्यापुढें नवव्या वर्षीं कन्येचें दान करणाऱ्या पित्यास वैकुण्ठांत स्थान मिळतें आणि 'कन्या' संज्ञेस पात्र झालेल्या मुलीचें, म्हणजे दहाव्या वर्षापासून ती ऋतुमती होण्याच्या आंत तिचें दान केल्यास पित्यास ब्रह्मलोकप्राप्ति होते असें अगदीं स्पष्टपणें सांगितलें आहे.

शिवाय ऋतुस्नात झालेल्या कन्येच्या दानासंबंधीं या श्लोकांत जो निषेध आहे त्याबद्दलसुद्धां एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती अशी, कीं मनुस्मृतींत यासंबंधीं जे श्लोक सांपडतात त्यांत फक्त येवढाच अभिप्राय दिला आहे, कीं ऋतुस्नात मुलीनें बाप आपलें लग्न करील म्हणून तीन वर्षेंपर्यंत वाट पहावी आणि त्यानें त्या अवधींत लग्न न करून दिलें तर स्वतः योग्य पति पाहून करावा. याचा उघड अर्थ असा होतो कीं, योग्य कारणास्तव ऋतुमती कन्याही तीन संवत्सरपर्यंत अविवाहित ठेवण्यास पित्याला मनूनें सांधि ठेविली आहे. संवर्तादि स्मृतींचें या विषयासंबंधीं जें म्हणणें आहे व बौधायन व वसिष्ठ यांची जीं स्पष्ट वचनें आहेत तीं विचारांत घेतलीं तर सर्वांच्या मतांचा निष्कर्ष हाच निघतो कीं, मुलीस पित्याच्या घरीं ऋतु प्राप्त झाला तरी तेव्हांपासून तीन वर्षांच्या आंत जर पित्यानें योग्य वर शोधून तिचें दान केलें तर तो दोषास पात्र नाहीं.

बालविवाहाचा पुरस्कार करणारीं जीं शास्त्रवचनें नेहमीं दाखविण्यांतयेतात त्यांत

प्रौढविवाहनिषेध कोठेंच नसून ऋतुमती कन्येच्या विवाहास देखील शास्त्रकारांनीं मोकळीक ठेवली होती, हें या संक्षिप्त विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. कन्याविवाहासंबंधीं आपल्या शास्त्रज्ञांचा निष्कर्ष चिंतामणराव वैद्य यांनीं असा काढला आहे, कीं ज्याप्रमाणें उपनयन पांचव्या वर्षापासून देखील होऊं शकतें पण तें आठव्या वर्षीं करणें उत्तम, आणि नंतर सोळाव्या वर्षापर्यंतदेखील केल्यास दोष नाहीं, त्याचप्रमाणें "मुलीचा विवाह आठ वर्षांपासून करणें शक्य आहे, दहाव्यापासून ऋतुप्राप्तीपर्यंतचा काल प्रशस्त आहे व त्यांतही बारा वर्षांच्या मुलीचा किंवा आसन्नार्तवेचा ( म्हणजे जिला नहाण यावयास झालें आहे तिचा ) विवाह करणें उत्तम आहे. ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षेंपर्यंत विवाह करण्याचा बापास अधिकार आहे; म्हणजे तीन वर्षांच्या आंत कोणी योग्य वर मिळत नसेल तर त्याला दोष नाहीं."

बालविवाहाच्या बाजूचे जे शास्त्राधार मानले जातात त्यांची ही व्यवस्था झाली. उलट, प्रौढविवाहाच्या बाजूचीं श्रुतिवचनें वगैरे प्रमाणें पाहूं लागल्यास तीं कितीतरी सांपडतात. श्रुतींत जीं विवाहवर्णनें आढळतात त्या सर्वांत वधूविषयीं लिहितांना "जी पूर्ण यौवनांत आली होती," "जी पतीची इच्छा करणारी होती," "जी कामाचें उद्दीपन करणारी होती" अशीं विशेषणें नेहमीं वापरलेलीं आहेत. दुसरी गोष्ट अशी कीं, विवाहकालीं पतीनें वधूस उद्देशून म्हणण्यासाठीं जे मंत्र चारी वेदांत आहेत त्यांत—

"आपण उभयतां विवाह करूं व प्रजा निर्माण करूं."

या व अशा अर्थाचे मंत्र आहेत. त्यांवरून विवाहकालीं वधू संभोगक्षम झालेली असे हें उघड दिसतें. तसेंच विवाहापूर्वीं मुलीचा उपभोग तीन देव घेतात, जीस संभोगेच्छा उत्पन्न झाली नाहीं अशी मुलगी सोमाला प्राप्त होते, मुलीला थोडी पुरुषेच्छा व्हावयास लागली कीं सोम ती विश्वावसु गंधर्वास देतो, तो गंधर्व विवाहकालीं तिला अग्नीस देतो, आणि शेवटीं अग्नि तिला पतीच्या स्वाधीन करतो, अशा कल्पनेनें भरलेल्या ज्या कांहीं ऋचा ऋग्वेदांत आढळतात त्यांवरूनही विवाहाच्या वेळीं वधू पूर्णयौवना आणि विवाहानंतर लगेच प्रजाजननास समर्थ असावी, असाच श्रुतींचा आशय असल्याचें स्पष्ट होतें. चवथें प्रमाण असें कीं, ऋग्वेदाच्या सांख्यायन सूत्रांत आणि यजुर्वेदाच्या हिरण्यकेशी वगैरे सूत्रांत चतुर्थी-कर्म म्हणून जें सांगितलें आहे तें एवढेंच कीं, विवाहानंतर तीन रात्रीपर्यंत

वधूवरांनीं ब्रह्मचर्यानें रहावें आणि चवथ्या रात्रीं चतुर्थी होमानंतर संभोगसुखाचा उपभोग घ्यावा आणि " त्वचा, मांस, हृदय आणि इंद्रियें इत्यादींनीं पत्नीनें पतीशीं संयुक्त होऊन त्याच्या गोत्रांत मिळून जावें." या चतुर्थीकर्माच्या आज्ञेवरूनही प्रौढविवाहच संमत ठरतो.

श्रुतींप्रमाणेंच स्मृतींतही प्रौढविवाहाच्या मान्यतेविषयीं व तो स्मृतिकालीं प्रचलित होता याविषयीं प्रमाणें सांपडतात. " मुलीचें लग्न प्रौढ वयांत बारा वर्षांवर व ऋतुप्राप्तीच्या आंत करावें. आणि आपत्पक्षीं ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षेपर्यंत मुलीचें लग्न केलें तरी प्रत्यवाय नाहीं." असाच मनुस्मृतिवचनांचा सारभूत अर्थ निघतो. शिवाय, " विवाह चालला असतांना वधू रजस्वला झाली तर हविष्मतीनें तिला स्नान घालून दुसरीं वस्त्रें नेसवावीं आणि " युंजानेति " मंत्रानें आहुति देऊन कर्म पुढें चालवावें." अशा अर्थाचें अत्रिस्मृतींत जें वचन आहे त्यावरूनही लग्नांत वधू अस्पृश्य होण्याचा संभव त्या वेळीं असे म्हणजे मुली प्रौढ व न्हाण आलेल्या असत असेंच सिद्ध होतें.

सारांश, प्रौढविवाह श्रुतिस्मृतींनीं व शास्त्रकारांनीं निषिद्ध मानला आहे, आणि आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें वागण्याची ज्याची इच्छा आहे अशा माणसानें बाल-विवाहप्रकारच मान्य समजला पाहिजे, ही समजूत सर्वथैव भ्रामक आहे. या बाबतींत आपले पुराणकालीन पूर्वज कसे वागत असत हें समजून घेण्याच्या इच्छेनें भारत व पुराणें यांजकडे दृष्टि वळविली. तर स्कंद, मार्कंडेय, पद्म इत्यादि पुराणांत प्रौढविवाहाच्याच कथा आहेत आणि भारताविषयीं तर चिंतामणराव वैद्य यांज-सारख्या भारताचार्यांचें स्पष्ट मत असें आहे कीं, " भारतांत अप्रौढ स्त्रीविवाह झाल्याचें कोठेंच उदाहरण सांपडत नाहीं."

मग साहजिकच या ठिकाणीं असा प्रश्न उत्पन्न होण्यासारखा आहे, कीं जो बाल-विवाह सुप्रजाजननशास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत दुष्परिणामी आहे, ज्या बालविवाहाचा पुरस्कार श्रुतींनीं स्मृतींनीं किंवा सूत्रकारांनीं केलेला नाहीं, आणि जो बालविवाह आमच्या प्राचीन आर्यांनीं आपल्या आचरणद्वारा आदर्श म्हणून लोकांपुढें कधींच ठेवला नव्हता, तो हा बालविवाह आमच्या या दुर्दैवी देशांत शिरला तरी कसा आणि आज हजारों वर्षें त्याची कीड आमच्या समाजाला लागून राहिली आहे तरी कशी ?

या प्रश्नासंबंधीं निरनिराळ्या विद्वानांचीं निरनिराळीं मतें आहेत. [१] सर

वुइल्यम हंटर वगैरे लोकांच्या मताप्रमाणें मुसलमान लोकांच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या होण्याच्या काळापर्यंत हिंदुस्थानांत प्रौढविवाहच प्रचारांत होता. परंतु मुसलमानांच्या स्वाऱ्या आणि त्यांचा हिंदु प्रजेवर व विशेषतः स्त्रियांवर अनन्वित जुलूम होऊं लागला तेव्हांपासून हिंदु लोकांनीं आपल्या स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठीं बालविवाहाची पद्धति स्वीकारली. [२] चिंतामणराव वैद्य यांस हें मत मान्य नाहीं व तें नाशाबित करण्यासाठीं त्यांनीं भरपूर प्रमाणेंही दिलीं आहेत. त्यांच्या मताप्रमाणें, श्रीशंकराचार्यांनीं सर्व हिंदुस्थानभर फिरून बौद्धधर्माचा ज्या वेळीं पाडाव केला त्या वेळीं लाखों बुद्ध लोकांस हिंदु करून हिंदुधर्मांत परत घेतांना त्यांच्या मार्गांत अनेक अडचणी उत्पन्न झाल्या, व त्या अडचणींतून पार पडण्यासाठीं बौद्ध लोकांत खिळून गेलेल्या कांहीं वाईट गोष्टी हिंदुधर्मांत घेणें त्यांस भाग पडलें; व या वाईट गोष्टींत जातिनिर्बंध, शाकान्नभक्षण आणि बालविवाह या प्रमुखत्वेंकरून होत्या. म्हणजे इसवी सन ७०० ते ९०० या दोन शतकेंपर्यंत हिंदुधर्म व बुद्धधर्म यांचा युद्धप्रसंग होऊन शेवटीं श्रीशंकरांच्या तेजस्वी दिग्विजयामुळें हिंदुधर्माचा जेव्हां विजय झाला व युद्धप्रसंग संपून हिंदु व बौद्ध या दोन धर्मांचा जेव्हां समेट झाला त्या काळांत बौद्धधर्मांतील बालविवाहाचे जंतु हिंदुधर्मांत शिरले.

या दोन मतांपैकीं कोणतें मत अधिक सत्य व ग्राह्य आहे याविषयीं या ठिकाणीं चर्चा करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. "सुप्रजाजनन" या विषयासंबंधीं ऊहापोह करतांना या दोहोंपैकीं कोणत्याही मताचा पुरस्कार केला तरी सारखेंच आहे. कारण बालविवाह केव्हांही आणि कोणत्याही कारणानें प्रचलित झाला असें मानलें तरी तो श्रुतिस्मृतिविहित नाहीं, आणि आपल्या शुद्ध प्राचीन आर्यसंस्कृतीचा तो एक मूलांश नाहीं एवढी गोष्ट सारखीच संशयातीत राहते; आणि सुप्रजाजननाच्या चर्चेच्या दृष्टीनें एवढी कबुली अगदीं पुरेशी आहे. बालविवाहामुळें भयंकर दुष्परिणाम घडून येणें अपरिहार्य आहे व ते प्रत्यक्ष घडून आल्याची साक्षही आपल्या देशाच्या गुलामगिरीचा इतिहास भरपूर देत आहे, तेव्हां यापुढें तरी आपल्या देशांत सुप्रजा निर्माण होऊन आपल्या राष्ट्राला अभ्युदयावस्था प्राप्त व्हावी आणि लोकांचे संसार सुखाचे व्हावे यासाठीं बालविवाहाचा हा अत्यंत दुष्ट प्रकार समूळ नाहींसा करणें अगत्याचें आहे, हा आमच्या एकंदर विवेचनाचा कटाक्ष आहे हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. आणि बालविवाहाची रूढि उन्मूलित केल्यास श्रुतिस्मृतींनीं लावलेला एक वृक्ष तोडल्याचें पातक आपणांस लागून अंतीं आपलें

अकल्याण होईल कीं काय अशा शंकेनें कांहीं लोक भ्रान्तचित्त होण्याचा संभव असल्यामुळेंच ती रूढि शास्त्रसंमत नसून प्रौढविवाहाला शास्त्राची कोणत्याही प्रकारची आडकाठी नाहीं हें त्यांस पटविण्यासाठींच त्या विषयाचा आम्हीं किंचित् विस्तारानें विचार केला हेंही मार्मिक वाचकांनीं ओळखलेंच असेल.

सारांश, आपल्या समाजांत प्रचलित असलेली विवाहपद्धति सुधारणें हें सुप्रजाजननकार्यांतील आपलें पहिलें काम होय. कोणत्याही कारणानें कां होईना आपल्या पूर्वजांच्या प्रौढविवाह तत्त्वापासून आपण च्युत झालों आहोंत खरे; परंतु जें झालें तें होऊन गेलें. आतां यापुढें तरी जागृत होऊन आपल्या विवाहसंस्थेंत सुप्रजाजननास बाधक असे कोणते ठळक दोष आहेत ते शोधून पाहून त्यांचा पुरा बीमोड करणें हें प्रत्येक समाजहितैषी स्त्री-पुरुषाचें आद्य कर्तव्य होय यांत संशय नाहीं. म्हणून आपली सध्यांची सदोष विवाहसंस्था सुधारावयाची झाल्यास सुप्रजाजननाच्या दृष्टीनें कोणत्या सुधारणा अंमलांत येणें अत्यंत अगत्याचें आहे त्याचाच विचार आपण यापुढें करूं.

---

# प्रकरण चवथें

आपल्या देशांत सामान्यतः चहूंकडे प्रचलित असणारा धर्मप्राबल्यदूषित बालविवाहप्रकार मूळ आपला नसून कांहीं ऐतिहासिक कारणांच्या योगानें तो आपल्यांत शिरला आहे, हें आम्हीं मागील विवेचनांत दाखविलें; आणि सुप्रजाजननाची हानि करणारें हें शल्य आपल्या समाजाच्या देहांतून तीव्र उपायांच्या शस्त्रानेंही काढावयास कांहीं हरकत नाहीं याविषयीं आम्हीं वाचकांची खात्री पटविण्याचा यत्न केला. आतां या बाल-विवाहप्रकाराच्या अनुषंगानें आपल्या समाजांत सुप्रजाघातक कोणत्या कोणत्या गोष्टी शिरल्या आहेत तें अधिक विस्तारानें पाहूं; म्हणजे सुप्रजाजननार्थ आपल्या विवाहसंस्थेंत कोणकोणत्या सुधारणा करावयास पाहिजेत तें आपल्यास निश्चितपणें ठरवितां येईल. परंतु हें करण्यापूर्वीही आपणांस एक गोष्ट प्रथम केली पाहिजे ती ही कीं, आदर्शभूत आणि सर्वोत्कृष्टफलदायी अशा विशेषणास कोणती विवाहपद्धति पात्र होण्यासारखी आहे याबद्दलची कल्पना आपण आपल्या मनाशीं निश्चित केली पाहिजे. कारण कोणत्याही सदोष वस्तूंत सुधारणा करावयाची झाल्यास कोणता तरी एक नमुना डोळयांपुढें असला तरच त्या वस्तूंतील कोणता उणेपणा नाहींसा झाला पाहिजे तें झट्कन् सांगतां येतें. चित्रकला शिकणाऱ्या एखाद्या नवख्या शिष्यानें काढलेलें एखादें चित्र सदोष असलें म्हणजे गुरु त्याच्यापुढें एक निर्दोष नमुना ठेवतो. म्हणजे आपल्या चित्रांत कोणकोणत्या दुरुस्त्या आवश्यक आहेत, हें त्या शिष्यास सहज समजतें आणि त्याप्रमाणें तो आपलें चित्र सुधारतो. याच न्यायानें आपल्या दूरदर्शी आणि मर्मज्ञ पूर्वजांनीं विवाहकर्मानें कोणता हेतु साध्य करावयाचें धोरण ठेविलें होतें त्याचा विचार करून व आधुनिक पाश्चात्य शास्त्रज्ञांचीं मतें त्याच्याशीं जुळतात कीं नाहीं तें पाहून, तीं जुळत असल्यास या दोन मोठ्या आप्तवाक्यांच्या प्रमाणानें आदर्शभूत विवाहपद्धतींत कोणकोणते गुण असावयास पाहिजेत याचा जर आपण प्रथम निश्चय केला तर सध्यांच्या विवाहसंस्थेंत ज्या कांहीं सुधारणा जरूर आहेत त्यांची दिशा आपणांस अधिक स्पष्टपणें दिसेल यांत संशय नाहीं.

या दृष्टीनें आपल्या पूर्वजांच्या धोरणाविषयीं विचार करूं लागल्यास स्त्री-पुरुष-विवाह हें एक सुप्रजाजननाचें साधन होय, ही कल्पना आमच्या पूर्वजांस मान्य

होती, इतकेंच नव्हे तर त्यांनीं विवाहार्थ जे जे नियम घालून दिले, ज्या आचारांचा विधि सांगितला आणि ज्या मंत्रांचा उच्चार करण्याची आज्ञा केली त्या सर्वांत त्यांचा सुप्रजाजननाविषयींचा प्रयत्न होता या गोष्टीविषयीं शंका उरत नाहीं. कोणत्याही राष्ट्राला किंवा समाजाला स्वतःचा मोठेपणा व स्वतःचें अनेकविध ऐश्वर्य कायम ठेवून इतर समाजांवरील आपलें वर्चस्व चिरकाल टिकविण्याची इच्छा असेल तर समाजाचे घटकावयव जे स्त्री पुरुष ते आपल्या शारीरिक व बौद्धिक बलानें इतरांस दिपवितील अशा योग्यतेचे असण्याविषयीं त्या समाजानें अतिशय खबरदारी घेतली पाहिजे. आमचे पूर्वज ज्या परिस्थितींत रहात होते तिच्याविषयीं विचार केल्यास असें दिसतें कीं, आर्य लोकांनीं हिंदुस्थानच्या मूळ रहिवाश्यांस पादाक्रांत करून वसाहत स्थापिलेली असल्यामुळें, सर्व प्रकारच्या शत्रूंपासून या नव्या वसाहतीचें संरक्षण करण्याइतके आपल्या समाजांतील स्त्री-पुरुष बुद्धीनें व शरीरानें बलवान् असले पाहिजेत, हा विचार त्यांच्या मनांत सदैव असावयास पाहिजे होता; आणि तसा तो होताही. याच कारणानें भावी पिढीचें सामर्थ्य निर्माण करणारी एक सामाजिक बाब या दृष्टीनें त्यांनीं विवाहसंस्थेचा विचार केला. विवाह म्हणजे आगामी प्रजेच्या गुणावगुणांचा एक जिवंत झरा होय हें त्यांस अवगत होतें. विवाहोन्मुख वधूवर म्हणजे भावी प्रजेच्या उत्पादनाचीं साधनें अशी त्यांची समजूत खचित होती. तो प्राचीन काळ आजच्या विसाव्या शतकासारखा चिकित्सक नव्हता. समाजाचे पुढारी जें जें करावयास सांगतील त्याची चर्चा न करतां किंवा त्याविषयीं त्यांस कोणतेही प्रश्न न विचारतां त्यांच्या आज्ञेचें मुकाट्यानें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें परिपालन करावयाचें अशा श्रद्धामय स्वरूपाचा तो काळ होता. त्यामुळें ज्या धर्माविषयीं सर्व समाजाच्या अंतःकरणांत परमादराची भावना होती त्या धर्माच्या नांवानें आणि त्या धर्माच्या सहीशिक्क्यानिशीं विवाहविषयक गोष्टी लोकांपुढें मांडल्या म्हणजे त्या गोष्टींची अंमलबजावणी त्यांजकडून निमूटपणें होईल, अशी विचारसरणी त्या वेळच्या समाजधुरंधरांच्या मनांत आली असल्यास तें साहजिकच नव्हे काय? परंतु, त्या लोकांनीं त्या काळांत विवाहविषयक तत्त्वांच्या गुटिकांना धर्मशर्करेचें जें अवगुंठन दिलें तें आज आपल्याला चोखून दूर करतां येण्यासारखें आहे व तसें केलें असतां जीं तत्त्वें आंत दृष्टीस पडतात तीं सुप्रजाजननतत्त्वेंच असल्याचें आपणांस स्पष्टपणें आढळतें. आज मूळ विवाह-

वल्लिकेच्या भोंवतीं अनेक वर्षांच्या प्रवाहामुळें नानाप्रकारच्या विधींचें, आचारांचें आणि चालींचें जें शेवाल वाढलें आहे तें दूर केलें आणि सूत्रकारांनीं विवाह-कार्यार्थ जे होमविधि सांगितले होते त्यांतील मंत्रांचें मर्म पाहिलें तर तें आम्ही म्हणतों त्याप्रमाणेंच असल्याचें वाचकांस दिसून येईल. विवाहहोमांतील कांहीं मंत्रांचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

[१] **वर म्हणतो**—हे अग्ने, चांगलीं कर्में करणारा तूं आमच्या ठायीं **उत्तम पराक्रम व तेज ठेव;** आणि द्रव्य व **पुत्र** यांची समृद्धि कर.

[२] **वर म्हणतो**—हे वधू, तूं माझ्याबरोबर एक पाऊल चाललीस तेव्हां तुझें माझें सख्य झालें, म्हणून तूं मला अन्न देणारी हो आणि मला अनुकूल वाग. **आम्हां उभयतांना पुष्कळ पुत्र होतील.** ते आमचे पुत्र शतायु होवोत.

[३] **वर म्हणतो**—ब्रह्मदेव आम्हां उभयतांपासून **सुसंतति** उत्पन्न करवो.

[४] **वर म्हणतो**—हे इंद्रा ! तूं **या वधूस सुपुत्र होतील** असें कर व हिला ऐश्वर्य प्राप्त होऊं दे. हिच्या ठायीं माझ्यापासून **दहा पुत्र होतील** असें कर.

सारांश, ज्या संततीमुळें समाजाचें भवितव्य उज्ज्वल आणि ऐश्वर्यसंपन्न होईल अशी सुसंतति निर्माण करण्यासाठींच आपण परस्परांशीं संलग्न होत आहोत ही कल्पना विवाहास उद्युक्त होणाऱ्या तरुण स्त्री-पुरुषांनीं पूर्णपणें लक्षांत बाळगावी, असाच आपल्या पूर्वजांचा कटाक्ष होता विवाहाचा उद्देश काय व त्याचें फल काय, व त्या दृष्टीनें नमुनेदार विवाहप्रकार कोणता यांविषयीं प्राचीन आर्यांचीं मतें कोणत्या स्वरूपाचीं होतीं या विषयींचें विवेचन याहून लांबविणें अगत्याचें वाटत नाहीं.

पाश्चात्य विद्वानांचीं व शास्त्रशोधकांचीं मतें पाहिलीं तर तीं आर्यमताहून भिन्न नसल्याचेंच दिसतें. एलन काय या विदुषीचें असें म्हणणें आहे कीं, "प्रणयाची खरी परिणति जर कोणती असेल तर ती विवाहच होय आणि अपत्यजन्म ही त्या विवाहाची योग्य परिणति होय. अपत्य जन्माला आलें, कीं त्याच्या माता-पितरांचा एकंदर समाजाशीं अतिशय निकट असा संबंध जोडला जातो. अपत्य-जन्मापूर्वीच्या प्रणयपुष्पास समाजानें स्पर्श न करतां त्याचा मनःपूत आस्वाद घेण्याची मोकळीक पतिपत्नींस ठेविली पाहिजे हें खरें; पण कालांतरानें हें प्रणयपुष्प फलित होऊन अपत्य जन्मलें म्हणजे त्या पतिपत्नींचा समाजाच्या हिताहिताशीं संबंध येतो." या कारणासाठीं समाजांतील स्त्री-पुरुषांस प्रीतिविवाह करण्याची जरी मोकळीक असली तरी पुरुषानें पत्नीची निवड करतांना आणि स्त्रीनें पुरुषाच्या

मागणीस रुकार देतांना सुप्रजाजननाचीच दृष्टि डोळ्यांपुढें अढळपणें ठेविली पाहिजे, असा एलन काय हिच्या मतांचा निष्कर्ष आहे. हेव्हलॉक एलिस हें पंडितही असेंच म्हणतात कीं, विवाहबद्ध होण्याच्या बाबतींत स्त्रियांना व पुरुषांना अमुक हक्क असावेत किंवा नसावेत याविषयींच्या भिन्न भिन्न मतांतील तारतम्य कशाही प्रकारचें असलें, तरी इतकें खचित कीं, या विषयाच्या कोणत्याही अंगोपांगाचा विचार करतांना सुप्रजाजननाची दृष्टि नजरेसमोरून कधींही ढळूं देतां कामा नये. एलन काय व हेव्हलॉक एलिस या दोघांनीं आपले सर्व ग्रंथ हेतुपुरःसर समाजशास्त्राच्या दृष्टीनें लिहिले असल्यामुळें त्यांचा अभिप्राय अशा प्रकारचा पडला असेल अशी शंका कोणास आली तर तिचेंही निराकरण व्हावें म्हणून ज्या स्पेन्सरच्या काळांत सुप्रजाजनन विषयाचा हल्लींसारखा गाजावाजा नव्हता त्याचीं मतें साररूपानें पुढें दिलीं आहेत. स्पेन्सर म्हणतोः–

"एकंदरींत पाहतां, समाजाचा आणि त्यांतील मुलें व तरुण पुरुष यांचा उत्कर्ष व्हावा आणि विवाहबद्ध होणाऱ्या स्त्री-पुरुषांस शरीरस्वास्थ्य, सुख आणि प्रसन्नता लाभावी हाच विवाहाचा खरा हेतु होय."

आपल्या प्राचीन आर्यांच्या आणि पाश्चात्य पंडितांच्या विवाहहेतुविषयक कल्पना इतक्या जुळतात ही जितकी विस्मयाची तितकीच आनंदाची गोष्ट होय हें कोणीही कबूल करील. आतां यावरून नमुनेदार विवाहपद्धतीचें प्रत्यक्ष स्वरूप कसें असावें तें थोडक्यांत सांगतां येण्यासारखें आहे. यासंबंधीं स्पेन्सरचे विचार या ठिकाणीं उद्धृत केले तरी चालेल. तो म्हणतोः—समाजाचें, मुलांचें आणि आईबापांचें अशीं तीन हितें साधण्यासाठीं विवाहपद्धति अशा स्वरूपाची असावी कीं, "[१] स्त्री-पुरुषांच्या स्वतःच्या वृद्धीकडे त्यांच्या आयुष्याचा बराच भाग लागल्याखेरीज त्यांना मुलें व्हावयास लागूं नयेत, [२] त्यांना अतिशय मुलें होऊं नयेत व जीं होतील त्यांस यथायोग्य काळजीनें आणि प्रेमानें वाढवितां यावें व [३] वार्धक्य होईपर्यंत त्यांनीं प्रजोत्पत्तीचा क्रम ठेवूं नये."

विवाह हें सुप्रजाजननाचें मूल साधन होय हें तत्त्व एकदां मनांत बाणलें म्हणजे स्पेन्सरच्या या म्हणण्याप्रमाणेंच विवाहप्रकाराची रूपरेखा कोणाही सुज्ञ मनुष्याच्या डोळ्यांपुढें येईल. पण या रूपरेखेशीं आमची आजची विवाहपद्धति ताडून पाहिली तर असें मनांत आल्यावांचून रहात नाहीं कीं, कुप्रजा निर्माण करण्यासाठीं या विवाहप्रकारापेक्षां अधिक अमोघ उपाय शोधून काढावयाचा

म्हटला तरी सांपडेल कीं नाहीं शंकाच आहे. आज जी विवाहपद्धति आपल्यांत— या ठिकाणीं अर्थातच आम्ही हिंदुस्थानांतील सर्व जातींविषयीं नव्हे तर साधारणपणें हिंदु समाजाविषयीं व त्यांतल्या त्यांतही महाराष्ट्रीय समाजाविषयीं विधान करीत आहोंत--प्रचलित आहे ती किती प्रकारांनीं सुप्रजाघात करीत आहे हें सविस्तर सांगण्याइतका स्थलावकाश येथें नाहीं. तथापि प्रमुख गोष्टींचा उल्लेख या ठिकाणीं केला पाहिजे म्हणजे प्रचलित विवाहप्रकारांत कोणत्या सुधारणा तावडतोब घडवून आणल्याच पाहिजेत याविषयीं जो विचार आम्ही पुढें करणार आहोंत त्याचें मर्म वाचकांस सहज पटेल.

[१] आपल्या आजच्या विवाहपद्धतींतील सर्वांत हानिकारक दोष कोणता असेल तर तो हा कीं, तिच्यामुळें स्त्री-पुरुष संभोगसौख्याचा अनुभव अल्पवयांत घ्यावयास लागतात. आज सुमारें सत्तर वर्षें सामाजिक सुधारणेचा ओरडा थोड्या-फार अंशानें होत असूनही विवाहाच्या वयाची इयत्ता फारच मंद गतीनें पुढें सरकलेली दिसते. पंधरा वर्षांच्या पुढें जिचा विवाह होतो अशी मुलगी आज अपवादात्मकच समजली जाते. बारापासून पंधराव्या वर्षांच्या दरम्यान् बहुतेक सुशिक्षित लोकांतील मुलींचे विवाह होतात आणि सामान्य जनतेविषयीं सिद्धान्त काढावयाचा झाल्यास दहाव्या वर्षानंतर मुलगी क्वचितच अविवाहित राहते असेंच म्हणावें लागेल. १९२१ सालच्या सेन्सस् रिपोर्टांत पुढील कोष्टक दिलेलें आहे त्यावरून आमच्या म्हणण्याची सत्यता वाचकांस पटेल.

| सन | एक हजार मुलींत अविवाहित राहिलेल्यांची संख्या | |
|---|---|---|
| | ५ ते १० वर्षांच्या वयांत | १० ते १५ वर्षांच्या वयांत |
| १८८१ | | ४८१ |
| १८९१ | ८७४ | ४९१ |
| १९०१ | ८९३ | ५५९ |
| १९११ | ८९१ | ५५५ |
| १९२१ | ९०७ | ६०१ |

यावरून एकंदर चाळीस वर्षांच्या कालावधींत दहा वर्षांच्या नंतर अविवाहित राहणाऱ्या मुलींचें प्रमाण शेंकडा बारांनींदेखील वाढलेलें नाहीं असें स्पष्ट दिसतें.

या कोष्टकाविषयीं सेन्सस् रिपोर्ट लिहिणाऱ्या लेखकानेंदेखील असे उद्गार काढले आहेत कीं, "हिंदुस्थानांत कोणी केव्हां प्रजोत्पादन करावें याविषयीं मुळीं कांहीं धरबंधच नाहीं. सशक्त, अशक्त, श्रीमंत, गरीब, जो उठतो तो अपत्य निर्माण करतो. हिंदूंची कल्पनाच अशी आहे, कीं मुलें कशींही असोत, त्यांचीं लग्नें हीं झालींच पाहिजेत. हिंदु समाजांत तरुण मुलानें विवाह करून प्रजाजनन केलेंच पाहिजे–तो पुत्र निर्माण करील तर सोन्याहून पिवळें, नाहीं तर त्याच्या मृत्यूनंतर त्याला तिलांजलि द्यावयास कोणी अधिकारी राहणार नाहीं आणि त्याचा शांतिशून्य आत्मा नरकांत पिचत राहील. ऋतुप्राप्तीनंतर अविवाहित राहिलेली मुलगी म्हणजे तिच्या आईबापांच्या बेअब्रूची पताकाच आणि तिच्याकुळांतील पूर्वपुरुषांच्या नरकगतीची तयारीच समजली जाते."

हा अभिप्राय परकीयानें लिहिला असला तरी तो सार्थ नाहीं असें कोण म्हणेल? बालविवाहाचें पर्यवसान बालसंभोगांत झालेंच पाहिजे आणि बालसंभोगाचें पर्यवसान कुप्रजाजननांत झालेंच पाहिजे, ही गोष्ट नव्यानें सिद्ध करीत बसण्याचें वास्तविक आतां प्रयोजनच उरलेलें नाहीं. मुलां-मुलींचीं लग्नें लवकर झालीं म्हणजे त्यांच्या मनांत परस्परांविषयीं स्थिर प्रेम उत्पन्न होतें ही समजूत खुळ्या माणसाखेरीज कोणीच हृदयाशीं धरणार नाहीं. त्यामुळें कांहीं होत असेल तर इतकेंच होतें कीं, पतिपत्नींच्या मनांत परस्परांविषयीं अगदीं अकालीं आसक्ति उत्पन्न होते. ही आसक्ति प्रबल झाल्यास आणि वडीलधाऱ्या माणसांच्या धाकाचा दाब नसल्यास, आणि कधीं कधीं वडील माणसांच्या प्रच्छन्न संमतीनें देखील स्त्रीस ऋतुदर्शन होण्याच्या अगोदरच तिचा पतीशीं संबंध येतो आणि ऋतुप्राप्तिनंतर स्त्री-पुरुष एकमेकांपासून अलिप्त राहण्याचा संभव तर मुळींच उरत नाहीं. सारांश, बालविवाह आणि बालसंभोग या गोष्टी पुष्पफलाप्रमाणें एका मागोमाग निश्चयानें येणाऱ्या अशाच आहेत. बालसंभोगाच्या मागोमाग गर्भधारणा ठेवलेलीच असते. असल्या गर्भापासून होणारी प्रजा बुद्धीनें व शरीरानें कमकुवत व अल्पायुषी अशी निपजावी हें शास्त्रनियमांस अनुसरूनच होय. स्त्रीच्या गर्भाशयांत गर्भाची वाढ उत्तम प्रकारें व्हावी यासाठीं त्या स्त्रीची स्वतःची वाढ आधीं पूर्ण झालेली असली पाहिजे. आई आणि मूल या दोघांच्याही वाढीचें दुहेरी काम देहपेशींना करावें लागलें म्हणजे त्यांच्यावर वाजवीपेक्षां अधिक कामाचें ओझें पडून दोघांच्याही वाढीस प्रत्यवाय येतो आणि अशा स्थितींत जन्मलेलें मूल साहजिकपणेंच

निकृष्ट प्रतीचें निघतें. प्राणिशास्त्राचा नियम पाहिला तर असें दिसतें कीं, प्रत्येक प्राण्याच्या एकंदर आयुर्मर्यादेचे तीन विभाग कल्पितां येतात व त्या तीन विभागांपैकीं पहिला त्या प्राण्याच्या स्वतःच्या वाढीकडे खर्च व्हावा आणि दुसरा जननकार्यांत खर्च व्हावा, अशी निसर्गाची योजना आहे. पशुपक्ष्यांच्या कोणत्याही जातीचें उदाहरण घेऊन या नियमाची सत्यता पाहतां येण्यासारखी आहे. या नियमाप्रमाणें स्त्री-पुरुषांच्या आयुष्याचा पहिला एक तृतीयांश पूर्ण होईपर्यंत त्यांच्यावर प्रजोत्पत्ति-कार्याची जबाबदारी बिलकूल पडतां कामा नये हें उघड होत नाहीं काय ?

[२] आपल्या सध्यांच्या धर्मप्राबल्यदूषित बालविवाहपद्धतींतील दुसरा दोष म्हणजे अनवश्यक गोष्टींना व्यर्थ दिलेलें महत्त्वाचें स्थान. पूर्वीं एके ठिकाणीं आम्हीं म्हटलेच आहे कीं, समाजाचें धारण ज्यामुळें होतें तो धर्म अशी व्याख्या लागू होण्यासारख्या स्वरूपाचा शुद्ध धर्म असेल तर त्याची व विवाहसंस्थेची सांगड जडली तर ती इष्टफलदायीच होईल; परंतु आपल्या विवाहसंस्थेवर असल्या शुद्ध धर्माचें नियंत्रण असण्याऐवजीं भलभलत्याच आगंतुक गोष्टींचें दडपण पडलेलें आहे. फल ज्योतिषाचें जें स्तोम आपल्या समाजांत माजलेलें आहे व विवाहनिश्चयाच्या बाबतींत फलज्योतिषास जें महत्त्व आज दिलें जातें त्यास वास्तविक पाहतां धर्माचा किंवा प्राचीन सूत्रकारांच्या आज्ञेचा किंचित्‌ही आधार नाहीं. पण ज्या-प्रमाणें आमच्या विवाहसंस्थेच्या शरीरांत बालविवाहाचा रोग कांहीं विशिष्ट ऐति-हासिक परिस्थितीमुळे शिरला, त्याचप्रमाणें हे फलज्योतिषस्तोमही केव्हां तरी घुसलें असलें पाहिजे. खेदाची गोष्ट ही कीं, या आगंतुक पाहुण्यानें मूळ उच्च विवाहहेतुरूप धन्याला आतां घरांतून बाहेर घालवून दिलें असून 'पाहुण्याला मलिदा आणि धन्याला धत्तुरा' अशी त्याची अवस्था करून सोडली आहे. आज कोणत्याही मुलीचें लग्न व्हावयाचें म्हणजे तिच्या स्वतःच्या गुणावगुणांपेक्षांही तिच्या पत्रिकेच्या बरेवाईटपणावरून तिची परीक्षा केली जाते. पत्रिकेवरून मुलगी सासऱ्याच्या किंवा सासूच्या मुळावर जाण्याचा संभव आहे असें दिसत असल्यास त्या मुलीचा विवाह जुळविण्यांत तिच्या पित्याला किती त्रास भोगावा लागतो हें त्याचें त्यालाच माहीत ! किंवा एखाद्या मुलीला वाईट मंगळ असला म्हणजे तिच्यासाठीं वर मिळवितां मिळवितां बापाला इतके कष्ट पडतात कीं, आपल्या मंगळाच्या कन्येला या पृथ्वीतलावर नवरा पाहण्याऐवजीं मंगळ लोकांतच

पाहिला पाहिजे असें त्याला वाटूं लागतें, हेंही स्वानुभवावरून पुष्कळ लोक सांगूं शकतील ! या सर्व प्रकाराचा परिणाम सुप्रजाघातक झाल्यावांचून रहात नाहीं. कारण वधू आणि वर विविधगुणसंपन्न असल्यांचें भरपूर प्रत्यक्ष प्रमाण असूनही केवळ त्यांच्या पत्रिका जुळत नाहींत येवढ्याच कारणानें त्यांचा विवाह अशक्य होतो आणि मग त्या मुलीचा कोठल्या तरी एका निकृष्ट प्रतीच्या मुलाशीं व त्या मुलाचा कोणत्या तरी एखाद्या गुणविहीन मुलीशीं विवाह होतो. त्या दोघांचा परस्पर विवाह झाला असतां जी बलवान् व बुद्धिवान् प्रजा निर्माण झाली असती ती निर्माण न होतां हीन प्रतीच्या प्रजेचीच उत्पत्ति त्या दोघांच्या वेगवेगळ्या विवाहांपासून होते. यामुळें समाजांत सुप्रजादायी अशीं जीं बीजें असतात तीं संलग्न होण्याऐवजीं वाटेल तशीं इतस्ततः फेंकलीं जातात आणि सुप्रजेऐवजीं कुप्रजा निर्माण होऊन संसार दुःखान्त होतात. असल्या परंपरेमुळेंच आज हजार वर्षांत आमचा समाज इतका खालीं गेलेला आहे.

[३] या फलज्योतिषमाहात्म्याप्रमाणेंच आणखीही एका गोष्टीचें जें प्रस्थ आपल्या समाजांत माजलेलें आहे त्यामुळें सुप्रजाजननावर मुळांतच घाव बसत आहेत. ही गोष्ट म्हणजे हुंडा. या हुंड्याच्या पद्धतीला अलीकडे किती किळसवाणें स्वरूप आलेलें आहे, आणि या लज्जास्पद पद्धतीचे काय काय घोर परिणाम होतात, हें येथें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. या पद्धतीमुळें कित्येक मुलींचे बाप जन्माचे भिकारी झालेले दिसतात व कित्येक मुलींनीं अपमानास्पद कौमार्याला कंटाळून आत्महत्या करून घेतल्याचेंही आपण अनेक वेळां ऐकतों. असल्या शोकपरिपूर्ण हकीगतींचीं हृदयस्पर्शी शब्दचित्रें कांहीं लेखकांनीं आणि नाटककारांनीं काढलेलीं आहेत. तसलें हृदयस्पर्शी शब्दचित्र या ठिकाणीं वाचकांच्या मनश्चक्षूंपुढें उभें करण्यापेक्षां त्यांस आम्हांस असें विनविणेंच अधिक उचित दिसतें कीं, या हुंड्याच्या पद्धतीमुळें सुप्रजा निर्माण होण्याच्या संभवाचा नायनाट कसा होतो याचा त्यांनीं विचार करावा. केवळ हुंड्याच्या रकमेकडे पाहून वडीलधाऱ्या माणसांनीं सुंदर आणि बुद्धिसंपन्न मुलाच्या गळ्यांत कुरूप आणि अवगुणी मुलगी बांधल्याचीं उदाहरणें कांहीं थोडीं घडत नाहींत. त्याचप्रमाणें एखादी मुलगी रूपवती आणि इतर गुणांनींही युक्त असून केवळ ती दरिद्री बापाच्या पोटीं येऊन तिच्यासह येणाऱ्या हुंड्याची थैली अगदीं लहान या एकाच कारणानें अनेक शारीरिक आणि बौद्धिक अवगुणांचें जणुं आगरच अशा

पुरुषाशीं त्या विचारीची जन्मगांठ पडते आणि त्या पुरुषाशींच संसारसुखाचा आस्वाद (!) घेऊन ती अनेक कुजक्या नासक्या व गुणहीन पोरांची माता बनते. अशा स्थितींत योग्य वधूवरें एकत्र येण्याऐवजीं भलत्याच स्त्री पुरुषांची गांठ पडते आणि समाजांत सुप्रजेची संख्या वाढण्याऐवजीं अशक्त, दुर्बल, रोगी व बुद्धिहीन असली प्रजाच सारखी उत्पन्न होत जाते आणि समाज खालीं खालीं जावयास लागतो. केवळ हुंड्याच्या एका बंधनामुळें एकत्र बांधल्या गेलेल्या पतिपत्नींस खऱ्या पवित्र संसारसुखाचा तरी आनंद कोठून मिळणार ! असल्या स्त्रीपुरुषांच्या मनांत एकमेकांविषयीं तळमळणारी प्रीति असण्याचा कोठून संभव उरणार ? अशांच्या संसारात सुखाऐवजी घडोघडीं कुरबुर, संताप, भांडणें वगैरे प्रकार चालू असले तर नवल तें काय ? आणि परस्परांविषयीं प्रेमानें वेडावलेले नव्हे तर तिटकाऱ्यानें भरलेले असें स्त्री-पुरुष केवळ संभोगक्रियेपुरते एकत्र आल्यावर त्या क्रियेपासून निर्माण होणारी प्रजा अतिशय निकृष्ट दर्जाची असल्यास त्यांत तरी नवल तें काय ! सारांश, सुप्रजाजनन हा जो विवाहाचा मूळ उदात्त हेतु त्याच्यावर द्रव्यतृष्णेचें खदिरांगार ठेविले गेल्यामुळें तो पार दग्ध होऊन गेला आहे आणि अल्पायुषी निकामी प्रजेचा पसारा हेंच आपल्या समाजाचें लज्जास्पद वैशिष्ट्य होऊन बसलें आहे.

आमच्या आजच्या विवाहपद्धतींतील इतरहीं अनेक दोषांविषयीं लिहिण्यासारखें आहे. परंतु एक तर ते सर्व दोष या उपरिनिर्दिष्ट प्रमुख दोषांतूनच उद्भवणारे आहेत, व शिवाय त्यांचा सुप्रजाजननविषयाशीं तितका प्रत्यक्ष संबंध नाहीं. आतांपर्यंतच्या एकंदर चर्चेंत सुप्रजाजननाच्या मुख्य सूत्राविषयींचें अवधान आम्हीं कोठेंही सुटूं दिलेलें नाहीं हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. म्हणूनच मुख्य विषयाचा दूरान्वय करून आपल्या विवाहपद्धतींतील इतरही दोषांचा विचार करीत बसणें आम्हांस उचित वाटत नाहीं. ज्या तीन प्रमुख दोषांमुळें सुप्रजासंभवाचा प्रत्यक्ष घात होत आहेसें आम्हांस वाटतें त्यांजविषयीं आम्हीं येथपर्यंत संक्षिप्त विवेचन केलें.

या विवेचनानंतर, हे तिन्ही दोष आपण तावडतोब नाहींसे करून टाकले पाहिजेत असें आम्ही प्रतिपादणार हें काय वाचकांस सांगावयास पाहिजे ? प्रौढविवाहाची सुधारणा जोंपर्यंत आपण अंमलांत आणणार नाहीं तोंपर्यंत आपल्या देशांत सुप्रजा निर्माण होऊन सुखाचे संसार दिसण्याची आशा करणें व्यर्थ आहे.

एक वेळ सूर्यमंडळांतील ग्रहोपग्रह आपापलीं भ्रमणें उलट दिशेनें करूं लागतील, किंवा पृथ्वीवरील माणसें पायांवर चालण्याऐवजीं डोक्यानें चालूं लागतील; पण ज्या समाजांत बालविवाह, बालसंभोग आणि बालमातृत्व हे परस्परसंलग्न प्रकार चालू आहेत त्या समाजांत सुप्रजा निर्माण होणें कठीण आहे. या बाबतींत समंजस व सुशिक्षित लोकांनीं पुढाकार घेतला पाहिजे. प्रौढ विवाहाची सुधारणा सरकारी कायद्याच्या धाकदपटशानें सिद्धीस नेण्याचा प्रयत्न अनेक दृष्टींनीं अनिष्ट आहे. त्याचा सविस्तर विचार येथें करण्यासारखा नाहीं. तथापि पूर्वीं संमतिवयाच्या बिलामुळें लोकांमध्यें केवढी अस्वस्थता उत्पन्न झाली व थोड्याच वर्षांपूर्वीं पटेलबिलानें समाज कसा प्रक्षुब्ध करून सोडला, इकडे वाचकांनीं लक्ष पुरविल्यास आमच्या म्हणण्याची सत्यता त्यांस कळून येईल आज आपल्या देशावर राज्य करणारें सरकार परकी आहे म्हणून प्रौढविवाह किंवा तत्सदृश सुधारणा सरकारी कायद्याच्या जोरावर होऊं शकत नाहींत अशी कोणीही आपल्या मनाची समजूत करून घेऊं नये. सरकार देशी असलें तरीदेखील कायद्याच्या शस्त्रानें सामाजिक रोग बरे करणें त्रासदायक आणि अनिष्ट फलावहच होईल. मनुष्यस्वभावच असा आहे कीं, गोडीगुलाबीनें जी गोष्ट माणूस चट्दिशीं ऐकेल व करील तीच गोष्ट त्यास जबरदस्तीनें करणें भाग पाडल्यास शक्य त्या उपायानें ती टाळण्याच्याच खटपटीला तो लागेल. हा अनुभव सर्व देशांच्या समाजिक व इतर सुधारणांच्या इतिहासांत सांपडण्यासारखा आहेसें आम्हांस वाटतें. यासाठीं आपल्या समाजांतील सुशिक्षित मध्यम वर्गानेंच जागृत होऊन प्रौढविवाह तावडतोब प्रचारांत आणला पाहिजे. मुलाचें व मुलीचें विवाहयोग्य वय काय असावें याचा नक्की आंकडा सांगणें अवश्य नाहीं व शक्यही नाहीं. किंबहुना हें अवश्य व शक्य नाहीं म्हणूनच यासंबंधांत सरकारी कायदे अनिष्ट ठरतात. पण येवढें खास कीं, आपल्या सुश्रुत-चरकादि वैद्यक ग्रंथांपासून आणि पाश्चात्य वैद्यकशास्त्राच्या सिद्धान्तांपासून कांहीं बोध घेतां येण्यासारखा असेल तर मुलीच्या शरीराची पूर्ण वाढ झाल्याखेरीज तिचा पुरुषाशीं संबंध घडणार नाहीं आणि गर्भधारणेची जबाबदारी तिच्या शरीरावर पडणार नाहीं अशा बेतानें तिचें लग्न आईबापांनीं केलें पाहिजे. आज प्रौढविवाहाची कल्पना समाजांत किंचित् प्रसृत झाली असली तरी आपल्या समजुती अजूनही अतिशय मागसलेल्या आहेत. मुलगी रजस्वला होण्यापूर्वीच तिच्या वयाची प्रौढता इष्ट मानण्यास आईबाप तयार

आहेत. असे तयार असणारे आईबापही शेंकडा तीन चार इतक्याच प्रमाणांत सांपडतील. बाकीचे शिशुविवाहभक्तच आहेत. ही स्थिति पार बदलली पाहिजे. मुलगी प्रौढ होऊं देणें म्हणजे ती तेरा वर्षांची होऊं देणें इतक्या संकुचित अर्थावर संतुष्ट राहण्याचें कारण नाहीं. मुलगी ऋतुमती झाली म्हणजे ती पापराशि होते ही समजूत वेडेपणाची होय. मागें सूत्रकारांच्या मताविषयीं जेव्हां आम्हीं विवेचन केलें तेव्हां आम्हीं वाचकांस दर्शविलेंच आहे कीं, मुलीस ऋतु प्राप्त झाल्यानंतरही तीन वर्षेंपर्यंत ती अविवाहित राहिली तरी तिच्या पित्यास दोष नाहीं असेंच त्यांचें मत होतें. आम्ही हें कबूल करतों कीं, प्रौढ परंतु ऋतु प्राप्त न झालेली अशी कन्या सदृश वरास देणें हाच सूत्रकारांच्या मतानुसार उत्तम मार्ग ठरेल, आणि ऋतुमती कन्येचें दान पापमूलक नसलें तरी तो गौण पक्षच समजला जाईल. परंतु ऋतुमती कन्येचा विवाह त्यांनीं अजिबात निषिद्ध मानिला नाहीं व त्या प्राचीन काळीं देखील तसल्या विवाहास त्यांनीं परवानगी ठेविली, येवढ्याचा आधार घेऊन, आणि आज हजारों वर्षांच्या कालप्रवाहानंतर परिस्थिति किती बदलली आहे तें ध्यानांत घेऊन, त्या प्राचीन काळीं जो आपत्पक्ष मानला जात असे त्यास उत्तम पक्ष समजण्यास हरकत नाहीं. नहाण आलेल्या मुली घरांत राहिल्या तर त्या अनीतीच्या मार्गास प्रवृत्त होतील ही भीति शुद्ध मूर्खपणाची होय. नहाण न आलेल्या मुली सासरीं गेल्यामुळें कोणकोणते अनिष्ट प्रकार घडतात हें आम्हीं मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. त्यापेक्षां न्हात्याधुत्या झालेल्या मुली आईबापांच्या किंवा पालकांच्या सुज्ञ देखरेखीखालीं राहिल्यानेंच कमी अनिष्ट परिणाम घडतील. मुलगी सासरीं गेलेली असली म्हणजे तिला नहाण आल्यावर तिला तिच्या पतीपासून अलिप्त ठेवणें फार कठीण आहे. उलट, मुलीला ऋतुप्राप्ति झाल्यावर ती कांहीं काल माहेरींच असली म्हणजे तिला संभोगप्रवृत्त करण्याची कल्पनाच उत्पन्न होणें शक्य नाहीं. मग दोन तीन वर्षांत तिच्या शरीराची वाढ उत्तम प्रकारें होईल व त्यानंतर तिचा विवाह होऊन ती आपल्या पतीशीं सर्वांशानें संलग्न झाली म्हणजे तिच्या ठिकाणीं राहणाऱ्या गर्भापासून तेजस्वी संतति निःसंशयपणें निर्माण होईल. मुलींच्या बाबतींत ही सुधारणा व्हावयास लागली म्हणजे मुलांचेही विवाह अधिक प्रौढपणीं आपोआप व्हावयास प्रारंभ होईल. मुलगी ऋतुमती होणें हें तिची वाढ परिपूर्ण झाल्याचें चिन्ह नव्हे. मुलगा सुमारें सोळा वर्षांचा झाला म्हणजे त्याच्या जननेंद्रियांतून

शुक्लाव किंचित् प्रमाणांत केव्हां केव्हां व्हावयास लागतो, तरी त्या वयाच्या मुलास कोणीही शहाणा मनुष्य स्त्रीसंभोगास पात्र समजत नाहीं. त्याच न्यायानें मुलींविषयींही विचार केला पाहिजे. ऋतुप्राप्ति हें केवळ मुलीच्या देहांत कांहीं महत्त्वाच्या घडामोडी व्हावयास लागल्या याचें दर्शक आहे. मुलीची वाढ संपूर्ण होण्यास आणखी दोनतीन वर्षें जाऊं देणें अत्यावश्यक आहे. इतर देशांतील मुलींपेक्षां आपल्याकडील मुलींस लवकर ऋतु प्राप्त होतो अशी साधारण समजूत आहे. यासंबंधीं पुढील कोष्टक पाहण्यासारखें आहे.

## प्रथमऋतुदर्शनाचा काल

| वय | युरोपियन स्त्रिया | आपल्या स्त्रिया |
|---|---|---|
| ११ वे वर्षी | शेंकडा ०·७ | शेंकडा २ |
| १२ वे ,, | ,, ३·६ | ,, १०·४ |
| १३ वे ,, | ,, १०·८ | ,, ३६·४ |
| १४ वे ,, | ,, २५·४ | ,, २९·३ |
| १५ वे ,, | ,, २४·६ | ,, १३·९ |
| १६ वे ,, | ,, १७·३ | ,, ४·५ |
| १७ वे ,, | ,, १२·४ | ,, २·२ |
| १८ वे ,, | ,, ३·१ | ,, ०·२ |
| १९ वे ,, | ,, १·२ | ,, ०·०४ |

या कोष्टकावरून आणि आम्हीं वर जें विवेचन केलें त्यावरून मुलींच्या विवाहयोग्य वयाविषयीं सिद्धान्त काढणें वाचकांस अवघड नाहीं. प्रौढ विवाहाची ही सुधारणा घडवून आणण्यासंबंधीं लिहितांना आम्हांस असें म्हणावेंसें वाटतें कीं, आपल्या मुलाचें लग्न आपल्या हातून झालें पाहिजे ही वृत्तिच मुळीं आई-बापांनीं हळुहळू सोडली पाहिजे. आपण स्वतः पैसे मिळवावयास लागल्याखेरीज, आणि स्वतःच्या पायावर उभें राहण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आल्याखेरीज आपला विवाह होणें बरें नव्हे हा विचार आतां पुष्कळ तरुण मुलांच्या मनास पटूं लागला आहे. लग्न करण्याच्या बाबतींत त्यांस स्वातंत्र्य दिलें तर ते स्वतःचा विवाह प्रौढ वयांतच करून घेतील. परंतु अशा मुलांस आपल्या आईबापांच्या किंवा कुटुंबातील मोठ्या माणसांच्या इच्छा मोडून आपल्या मतांचा आग्रह धरणें अशक्य असतें. “माझे डोळे मिटण्यापूर्वी मला माझ्या नातसुनेचें तोंड पाहूं दे”

असें म्हणणारी आजी घरांत असली, किंवा "आमचा सर्व संसार नीट झाला, आतां एकदां मुलाचें लग्न होऊन तो व त्याची बायको सुखानें संसार करितांना आम्हीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलीं, कीं आम्ही धन्य झालों" असा विचार करणारे वयस्क आईबाप असले, म्हणजे तरुण मुलांचा नाइलाज होतो आणि वडील माणसांशीं भांडून त्यांस दुःखी करण्याच्या प्रसंगापेक्षां विवाहास तयार होणेंच त्यांना अधिक श्रेयस्कर वाटतें. हा प्रकार बंद व्हावयाचे दोनच मार्ग आहेत. एक तर तरुण मुलांनीं वडिलांच्या इच्छांचा अवमान करूनही समाजाच्या अंतिम हितासाठीं स्वतःचा हट्ट चालविला पाहिजे; किंवा प्रौढविवाहाची इष्टता लक्षांत घेऊन आईबापांनीं बालविवाहाची भलती हौस सोडून दिली पाहिजे. यांपैकीं पहिला मार्ग शक्य असला तरी तो श्रेयस्कर नव्हे. त्यापेक्षां त्या मार्गाचें अवलंबन करण्याची पाळी मुलांवर येईल इतक्या निकराला आईबापांनीं गोष्टी जाऊं न देणें हेंच सर्वांत हितकर होय. आपल्या मुलांचीं लहानपणींच लग्नें लावून केवळ लग्नविधींच्या सोहाळ्यांत आनंद मानणाऱ्या आईबापांना व पालकांना काय म्हणावें ? त्यांचा खेळ होतो; पण अजाण वधूवरांचा जीव जातो हें त्यांच्या कसें लक्षांत येत नाहीं ! आपल्या वेडगळ हौशीच्या पूर्ततेसाठीं समाजाच्या भावी प्रजेवर आपण कुऱ्हाडीचे घाव घालीत आहोंत हा विचार त्यांना कसा सुचत नाहीं ? केवळ लग्नसोहळ्याचीच हौस पुरवून घ्यावयाची असेल तर, आम्ही म्हणतों, असल्या आईबापांनीं श्रीमंतांच्या रिकामटेकड्या बायका खेळ खेळतात त्याप्रमाणें भावला भावलींचीं लग्नें लावून ती पुरवून घ्यावी; पण दोन स्त्री-पुरुषांचा—नव्हे—अर्भकांचा आपल्या हौसेच्या स्थंडिलावर बळी देण्याचें पातक करूं नये. सारांश. आपण ह्यात आहोंत तोंपर्यंत आपल्या मुलांचीं व मुलींचीं लग्नें आपण करून टाकलीं पाहिजेत ही कल्पना सर्वस्वीं चूक आहे. अशा वेळीं आईबाप कशा तऱ्हेनें विचार करतात हें आम्हांस माहीत आहे. ते म्हणतातः—"आतां आमचें वय झालें. आमचा फार दिवस भरंवसा नाहीं. आम्ही इहलोक सोडून गेलों म्हणजे आमच्या मुलाचें लग्न कोण करील, तें थाटानें होईल किंवा नाहीं व त्याला बायको चांगली मिळून त्याचा संसार सुखाचा होईल किंवा नाहीं तें काय सांगावें ! तेव्हां, अशा संशयांत मरण्यापेक्षां आत्तांच त्याचें एखाद्या लहानशा मुलीशीं लग्न करून दिलें म्हणजे जिवाला कोणतीही हुरहुर न राहतां आम्ही समाधानानें मरूं !" या विचारसरणींतील वेडेपणा वास्तविक उघड नाहीं काय ? आपण मेल्यानंतर

आपल्या पश्चात् आपल्या मुलाचा विवाह चांगल्या प्रकारें होईल किंवा नाहीं अशी काळजी वाटणें आईबापांच्या प्रेमाला साजेसेंच आहे; परंतु ती काळजी नाहींशी करण्यासाठीं आपल्या हातानें त्या मुलाचा अल्पवयांत विवाह करून बालसंभोग आणि बालजनकत्व यांसारखीं संकटें त्याच्यावर कोसळण्याची आणि त्याच्या संसाराची आणि समाजाची घडी विस्कटण्याची खात्रीलायक तयारी करणें हें कोणत्या मुलुखाचें शहाणपण होय? सारांश, आपल्या मुलांचे विवाह आपण आपल्या हातानें लावून दिले पाहिजेत ही कल्पनाच आतां वडील माणसांनीं शक्य तितक्या लवकर सोडली पाहिजे. आपल्या पुत्रास लहानपणापासून उत्तम शिक्षण देणें, त्याच्या बुद्धीला व अंतःकरणाला चांगलें वळण मिळेल अशा प्रकारें त्याच्यावर स्वतःच्या उपदेशाचा व प्रत्यक्ष आचरणाचा दाब ठेवणें आणि एकंदरींत आपला मुलगा सुवृत्त, विनयशील, सुज्ञ, धूर्त, ज्ञानसंपन्न, बलवान् आणि आपला चरितार्थ चालविण्यास सर्वस्वीं समर्थ असा निपजेल अशी काळजी आईबापांनीं घेतली म्हणजे त्यांचें खरें कर्तव्य संपलें असें आम्ही समजतों. इतकी खबरदारी बापानें घेतली, कीं लग्नाच्या जबाबदारीचा बहुतेक भाग मुलाच्या आवडीनिवडीवर सोंपविण्यास बापानें भिण्याचें बिलकुल कारण नाहीं. कारण, अशा तऱ्हेनें वाढलेल्या मुलास सहसा कुवासना उत्पन्न होणारच नाहीं. दुष्यंत राजास ज्याप्रमाणें स्वतःच्या वासनांविषयीं आत्मविश्वास होता आणि शकुंतलेविषयीं माझ्या मनांत लालसा उत्पन्न झाली तेव्हां ती उत्तम कुळांतील असलीच पाहिजे असे ज्याप्रमाणें त्यानें उद्गार काढले, त्याप्रमाणेंच अशा मुलांची स्थिति असेल. तें कसेंही असो; मुलांचीं लग्नें स्वतःच्या हातांनीं लावण्याचा वेडगळ शहाणपणा आईबापांनीं आतां टाकलाच पाहिजे. "गप्प बसावयास काय घ्याल?" अशा तऱ्हेचा प्रश्न आईबापांना विचारण्याची वेळ आतां आली आहे. मुलांच्या लग्नाच्या बाबतींत आईबाप तटस्थ राहिले आणि अगदींच कुपात्र मुलीशीं आपला मुलगा लग्न करणार नाहीं येवढें पाहण्याचेंच आपलें काम आहे अशा धोरणानें ते वागूं लागले म्हणजे प्रौढ विवाहाचें पाऊल आपोआप पुढें पडेल.

बालसंभोग कोणत्याही देशाच्या वैद्यकशास्त्रास संमत असणें शक्य नाहीं हें आईबापांनीं व तरुणांनीं विसरूं नये. आपल्या श्रुतिस्मृतींना व सूत्रकारांना बालविवाह व परंपरेनें बालसंभोग इष्ट वाटत होता ही कल्पना किती निराधार आहे तें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. प्रौढविवाह शास्त्रविरुद्ध आहे अशी भलती

भीति आतां सर्वांनीं टाकून दिली पाहिजे. धर्मांत किंवा वैद्यकशास्त्रांत कशाचा स्पष्ट निषेध असेल तर तो प्रौढविवाहाचा किंवा प्रौढ स्त्री-पुरुष समागमाचा नसून बालसंभोगाचा व तदनुषंगानें बालविवाहाचाच आहे ही कल्पना प्रत्येकानें आपल्या मनावर पूर्णपणें ठसवावी. याबद्दल अनेक प्रकारचे आधार मागें दिलेच आहेत. आणखी एक आधार या ठिकाणीं देतों. बालसंभोग किती दुष्परिणामी आहे तें दर्शविणारे पुढील श्लोक पहा—

[१] ऊनषोडशवर्षायाम् प्राप्तः पंचविंशतिम् ।
यद्याधत्ते पुमान्गर्भं कुक्षिस्थः स विपद्यते ॥
जातो वा न चिरंजीवेज्जीवेद्वा दुर्बलेंद्रियः ।
तस्मादत्यंतबालायां गर्भाधानं न कारयेत् ॥

—सुश्रुतः, शारीरस्थान, अध्याय १०.

[२] पूर्णषोडशवर्षा स्त्री पूर्णविंशेन संगता ।
शुद्धे गर्भाशये मार्गे रक्तेशुक्रेऽनिले हृदि ॥
वीर्यवंतं सुतं सूते ततो न्यूनाब्दयोः पुनः ।
रोग्यल्पायुरधन्यो वा गर्भो भवति नैव वा ॥

—वाग्भटः, शारीरस्थान, अध्याय १.

या दोन्ही वचनांचा स्पष्ट उपदेश असा आहे कीं, पूर्ण सोळा वर्षांची स्त्री झाल्यावर तिच्या ठिकाणीं पुरुषाकडून गर्भाधान झालें तरच त्या गर्भाची उत्तम प्रकारें वाढ होऊन वीर्यवान् सुपुत्र तिच्या पोटीं जन्म पावतो आणि उलट ज्या स्त्रीची वाढ सोळा वर्षांपर्यंत झालेली नाहीं अशा स्त्रीच्या ठिकाणीं गर्भाधान झाल्यास तो गर्भ बहुतकरून वाढतच नाहीं, वाढून जन्मला तरी दीर्घायुषी निपजत नाहीं, आणि पुष्कळ दिवस जगला तरी दुर्बलेंद्रिय स्थितींत मरणाहूनही अधिक दुःखप्रद अशा प्रकारचें आयुष्य त्याला कंठावें लागतें.

म्हणजे आर्यवैद्यकाच्या दृष्टीनेंही स्त्री-पुरुषसंयोगाचा उत्तम काल १६ व २५ हीं वयेंच अनुक्रमानें ठरतात. बालविवाहानंतर बालसंभोग क्रमप्राप्तच असतो व बालसंभोग नष्ट करावयाचा असेल तर मुलीला न्हाण येऊन दोन वर्षें लोटल्या-नंतरच तिचा विवाह केला पाहिजे. आपल्या स्त्रियांस प्रथम ऋतुदर्शन केव्हां होतें त्याविषयींचें जें एक कोष्टक वर एकदां आम्हीं उद्धृत केलें आहे त्याकडे

वाचकांनीं पाहिल्यास तेराव्या वर्षी ऋतुस्नात होणाऱ्या मुलींचेंच प्रमाण सर्वांत अधिक असल्याचें त्यांस दिसेल. अर्थात् या वयानंतर दोनतीन वर्षे मुलींच्या पूर्ण वाढीस दिलीं असतां सोळाव्या वर्षाचीच मर्यादा विवाहयोग्य ठरते. सर्व दृष्टींनीं पाहतां १६ वर्षांची स्त्री व २५ वर्षांचा पुरुष अशांचा विवाहच सुप्रजाजननास उपयोगी ठरतो. हीच गोष्ट थोड्या निराळ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास असें म्हणतां येईल कीं, आज आपल्यांत विवाह या शब्दाचे जे दोन अर्थ आहेत त्यांतील भेद आपण काढून टाकला पाहिजे. वधूवरांवर मंत्राक्षता पडणें यास विवाह म्हणतात; पण स्त्री ऋतुमती होऊन ती सर्वांशानें पतिसंलग्न झाली म्हणजे त्या दोघांचा खरा विवाह लागला असें आपण समजतों. आतां यापुढें या अर्थभेदाला जागाच उरतां कामा नये. विवाह होणें याचाच अर्थ स्त्री-पुरुष सर्व प्रकारें एकमेकांशीं संलग्न झाले पाहिजेत असें ज्या दिवशीं होईल त्याच दिवशीं प्रौढविवाह प्रचलित झाला असें म्हणतां येईल, आणि सुप्रजाजननाचा पाया आपण उत्तम प्रकारें घातला असें समाधान आपल्याला मानतां येईल.

प्रौढविवाहाची रूढि अंमलांत आणणें ज्याप्रमाणें सुप्रजाजननाच्या दृष्टीनें अगत्याचें आहे त्याचप्रमाणें सध्यांचें फलज्योतिषमाहात्म्यही नाहींसें करणें आवश्यक आहे. या फलज्योतिषाच्या प्राबल्यामुळें योग्य वधूवरांच्या विवाहांत कशा अडचणी उभ्या राहतात तें आम्हीं मागें दर्शविलेंच आहे. तेव्हां ही अडचण दूर करण्याच्या आवश्यकतेसंबंधीं अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. एक तर या घटित प्रकारांत सत्याचा अंश फारच कमी आहे. वधूवरांचा वर्ण, नाडी, गण इत्यादि प्रकार पाहिल्यानें कांहीं विशेष फायदा होतो किंवा न पाहिल्यानें कांहीं विशेष हानि होते असें म्हणण्यास कांहींच आधार नाहीं. वे० शा० सं० शिवरामशास्त्री गोरे यांनीं आपल्या "वैदिक विवाहपद्धति" या पुस्तकांत स्पष्टपणे असें मत दिले आहे कीं, "ज्यांचें घटित पाहिलें आहे अशीं वृद्ध झालेलीं शंभर जोडपीं, आणि घटित न पाहिलेलीं शंभर जोडपीं, यांची स्थिति पाहून सरासरी काढली तर घटित पाहिल्यापासून कांहीं फायदा होतो असें दिसून येत नाहीं." शिवाय, अशा प्रकारें वधूवरांचे घटित पाहिलें पाहिजे अशी शास्त्राज्ञा असेल म्हणावें तर तसेंही नाहीं. याही बाबतींत वे०शा०सं० शिवरामशास्त्री गोरे यांनीं असें मत दिलें आहे कीं, "सापिंड्य व गोत्रप्रवर यांचा विचार करणें हें जसें धर्मशास्त्रानें अवश्य सांगितलें आहे तसें घटिताबद्दल कांहींच सांगितलें

नाहीं....घटिताप्रमाणेंच किंबहुना त्याहून विशेष मंगळ पाहण्याचें खूळ अली-कडे माजलें आहे... "लग्ने व्यये च पाताले जामित्रे चाष्टमे कुजे । कन्या हरति भर्तारं भर्ता हरति कन्यकाम् ।" असें एक वचन मानण्यांत येतें. पण हें वचन कोणत्या ग्रंथांत आहे त्याचा अद्यापि पत्ता लागलेला नाहीं." सारांश, ज्या गोष्टी शास्त्रानें सांगितलेल्या नाहींत आणि ज्यांत हितकारक असाही कांहीं अंश नाहीं व उलट ज्यांमुळें सुप्रजासंभव मात्र अनेकांशांनीं कमी होतो, त्या गोष्टी ताबडतोब टाकून द्यावयास लोकांनीं कचरावयाचें बिलकुल कारण नाहीं.

हीच गोष्ट हुंड्याच्या किळसवाण्या प्रकाराबद्दल. या प्रकारामुळें कोणकोणते दुष्परिणाम होतात त्यांविषयीं सुज्ञ वाचकांस आम्हीं नव्यानें कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं आपल्या देशांत ज्या ज्या प्रांतांत व जातींत या चालीला प्रमाणाबाहेर महत्त्व आलेलें आहे त्या त्या प्रांतांत आणि जातींत लोकांची स्थिति किती करुणास्पद झाली आहे तें दक्षिण महाराष्ट्र आणि सिंध यांच्या उदाहरणांवरून सहज दिसण्या-सारखें आहे. उत्तम वधूवरविवाह या चालीमुळें अशक्यप्राय होऊन बसले आहेत. समाजांतील उत्कृष्ट बीजांचा परस्परसंयोग होण्याऐवजीं त्या बीजांची नासधूस होत आहे आणि याचा परिणाम होऊन एकंदर समाजाची योग्यता कमी कमी होत चाललेली आहे. या हुंड्याच्या चालीला शास्त्राधार निघण्यासारखा नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. शास्त्रांत वर्णिलेल्या आठ विवाह-प्रकारांपैकीं जो आपल्यामध्यें सध्यां प्रचलित आहे त्यास 'ब्राह्म' ही संज्ञा देतां येईल व अशा विवाहांत "वस्त्रालंकारविभूषित" अशा कन्येचें दान पित्यानें करावें असें सांगितलेलें आहे, या सर्व गोष्टी खऱ्या; पण मुलीच्या पित्यानें आनंदानें, खुषीनें आणि हौसेनें दिलेली वरदक्षिणा कोणीकडे, आणि बाजारांतील बनिया आपल्या कर्जदाराकडून पैसे पिळून काढतो त्याप्रमाणें मुलीच्या बापाकडून निष्ठुर-पणानें उकळलेली वरदक्षिणा कोणीकडे ! असल्या वरदक्षिणेनें भ्रष्ट झालेल्या विवाह-प्रकाराला 'ब्राह्म' ही संज्ञा देण्यापेक्षां आसुर किंवा पैशाच याच संज्ञा अधिक चांगल्या शोभतील. ही हुंड्याची चाल नष्ट होण्याऐवजीं उलट वाढतच चाललेली आहे आणि अत्यंत खेदाची गोष्ट ही कीं, गरीब व अशिक्षित लोकांपेक्षांही श्रीमंत आणि सुशिक्षित लोक या चालीच्या विषवृक्षाला पाणी घालून पोसण्याचें काम अधिक प्रमाणांत करीत आहेत. ज्या देशांत सामाजिक सुधारणा कळसाला पोंचली आहे, उदार मतें हवेंत जिकडे तिकडे भरलीं आहेत, स्त्रीदाक्षिण्याची परमावधि

झाली आहे आणि प्रीतिविवाहाखेरीज दुसऱ्या विवाहप्रकाराला थारा नाहीं, अशा देशांत–इंग्लंडांत–तीन वर्षें राहून आय्. सी. एस्. होऊन आलेले तरुण लग्नाच्या बाजारांत उभे राहून वीस हजार, पंचवीस हजार असा स्वतःच्या देहाचा भाव पुकारतात या लज्जास्पद प्रकाराला काय म्हणावें तें समजत नाहीं! असल्या गोष्टी ऐकल्या, कीं निराशेनें मन व्याकुळ होतें! आमच्या तरुण पिढीची कींव येते! तिच्या कमकुवतपणाचा तिटकारा येतो! इतर देशांचा उद्धार त्या देशांतील तरुणांनींच केला आणि आमचे तरुण मात्र जागृत होण्याऐवजीं उलट देशाचा अधःपात घडवून आणीत आहेत. हा दुर्दैवाचा फेरा आमच्या अभागी देशाला आणखी किती काळ सोसावा लागणार असें मनांत येऊन अंतःकरणाची तळमळ होते! आमच्या तरुणांना येवढाही निश्चय करतां येऊं नये? या निश्चयांत कोणत्याही प्रकारचें राजकारण नाहीं, सरकारी कायद्याची किंवा रोषाची भीति नाहीं, सामाजिक बहिष्काराचेंही भय नाहीं, किंवा विलक्षण अवघड स्वार्थत्याग करावा लागेल असेंही नाहीं.

मात्र, प्रौढविवाहाविषयीं लिहितांना आम्हीं जें एक विधान केलें तें या हुंड्याच्या चालीच्या बाबतींतही खरें आहे. स्वतः विवाहयोग्य तरुणांचीं मतें पाहिलीं तर तो बालविवाह, फलज्योतिषमाहात्म्य आणि हुंडा या तिन्ही गोष्टींना प्रतिकूल असतात; परंतु आज आपल्यांत विवाह होतात ते वधूवरांच्या मतानुसार होण्याऐवजीं आईबापांच्या मतांप्रमाणें होतात. यासाठीं आम्हांस असें वाटतें कीं, बाल-विवाहादि तिन्ही प्रमुख अनिष्ट गोष्टी एकाच उपायानें एकदम नाहींशा होतील असा जर एखादा उपाय असेल तर तो हाच कीं, मुलांचीं लग्नें आईबापांनीं करण्याचें सोडून दिलें पाहिजे आणि विवाहाची बाब मुलांच्या अधिकारांत आली पाहिजे. असें झालें म्हणजे स्वतः पैसे मिळवावयाला लागल्याखेरीज लग्न करण्याची इच्छा तरुणांना व्हायची नाहीं व त्यांचें लग्नाचें वय आपोआपच पंचविसावर येऊन बसेल. मग विवाह म्हणजे एक सामाजिक जबाबदारी आहे आणि सुप्रजाजननासाठीं आपणांस विवाह करावयाचा आहे वगैरे कल्पना असल्या तरुणांस साहजिकपणेंच समजूं लागतील व वधूची निवड करतांना एखादी १२–१३ वर्षांची पोर पसंत करण्याऐवजीं १६ वर्षांच्या प्रौढ कन्येचीच ते इच्छा धरतील आणि अशा प्रकारें मुलींच्या लग्नाची वयोमर्यादाही इष्टस्थलापर्यंत आपोआप चढेल. याप्रमाणें वधूवरांना लग्नाच्या बाबतींत बरेच अधिकार मिळाले तर

रूपगुणांमुळें ज्या मुलीविषयीं प्रेम वाटतें ती केवळ हुंड्यासाठीं नाकारण्याची कल्पना तरुणांच्या मनांत क्वचितच उत्पन्न होईल आणि हुंड्याची चाल साहजिकपणेंच नष्ट होत जाईल; आणि तसेंच फलज्योतिषमाहात्म्याचीही हळुहळू विवाहक्षेत्रांतून हकालपट्टी होईल.

या ठिकाणीं कोणी कदाचित् असें विचारतील कीं, "काय हो ! तुम्हीं तर अगदीं प्रीतिविवाहाची तरफदारी करण्यापर्यंत मजल मारलीत कीं ! आणि पत्रिका वगैरे सर्व झूट आहे असें तुम्ही म्हणतां, तेव्हां गोत्र, पिण्ड, वर्ण याही गोष्टी झूट मानाव्या आणि वाटेल त्या पुरुषानें वाटेल त्या स्त्रीचा हात पकडून तिच्याशीं विवाह लावावा असेंही प्रतिपादण्यास तुम्ही तयार आहांत कीं काय ?"

या शंकेपैकीं प्रीतिविवाहाच्या तरफदारीविषयीं जो भाग आहे त्याला आम्ही असें उत्तर देतों कीं, खरोखरच प्रीतिविवाहाची तरफदारी करण्यांत कांहीं वावगें आहेसें आम्हांस वाटत नाहीं. विवाह म्हणजे चहाचा पाला आणि पाणी एकत्र करून आपण एक मिश्रण तयार करतों तशापैकीं वधूवरांचें कृत्रिम मिश्रण नजून प्रीतीच्या वेलीला येणारें तें सुंदर पुष्प आहे, असेंच मनुष्य या संज्ञेला पात्र असलेल्या कोणत्याही माणसाचें मत असेल. प्रीतिविवाहामुळें पाश्चात्य समाजांत कोणकोणते अनर्थकारक प्रकार व आचार उद्‌भवले आहेत तें दाखवून आम्हांला भेवडावण्यांत अर्थ नाहीं. तसा वाद घ्यावयाचीच वेळ आली तर आम्ही इतकें सुद्धां म्हणूं कीं, आपल्या समाजांत प्रीतिविवाह रूढ होऊन प्रथम शेंदोनशें वर्षें उत्तम प्रजा निर्माण होऊन नंतर तीनचारशें वर्षांनीं प्रीतिविवाहाचे दुष्परिणाम कदाचित् प्राप्त होणार असले, तर ते **कदाचित् प्राप्त होणारे** दुष्परिणाम पुरवले; पण आज ज्या बालविवाहापासून **दुष्ट अनर्थांची प्रत्यक्ष प्राप्ति** आमच्या समाजास प्रत्यहीं होत आहे तो बालविवाह खाचित नको. पण हें केवळ वादभरापुरतें बोलणें झालें. प्रीतिविवाह प्रचारांत यावा या आमच्या म्हणण्याचा अर्थ असा नव्हे कीं, स्त्रीपुरुषांनीं मन मानेल तशीं आपापलीं लग्नें जुळवून घ्यावीं आणि आईबापांना खुशाल धाब्यावर बसवावें. उलट, इतकें मात्र आम्ही खाचित म्हणतों कीं, आज वधूवरांच्या परस्परांवरील प्रेमाचा—प्रेम दूरच राहिलें पण निदान त्यांच्या पसंतीचा—बिलकूल विचार होत नाहीं ही गोष्ट अतिशय अनिष्ट असून ती ताबडतोब बंद झाली पाहिजे. अलीकडे बरेचसे आईबाप स्वतः मुलगी पसंत केल्यानंतर ती पसंत ठरविण्याची संधि मुलालाही देत असतात हें आम्ही विसरलों नाहीं. पण ही संधि

म्हणजे केवळ एक फार्सच असतो. बहुतकरून मुलगा या संधीचा उपयोग करीत नाहीं. आईबापांची मर्यादा राखण्यासाठीं तो आपल्या या हक्कावर पाणीच सोडतो आणि जरी या संधीचा उपयोग त्यानें केला तरी आईबापांनीं केलेल्या विवाहनिश्चयाविरुद्ध जाणें त्याला शक्य नसतें. सारांश, सन १९१९ च्या सुधारणा-कायद्यान्वयें युद्धखात्याच्या अंदाजपत्रकावर कांहींच नियंत्रण नसतांना त्याला संमति देण्याचा जो अपमानास्पद पोकळ हक्क वरिष्ठ कायदेकौन्सिलला आहे त्या हक्कांत आणि वराच्या या अधिकारांत कांहीं भेद नाहीं. वधूच्या विचारीच्या मताची तर इतकीदेखील दाद घेण्यांत येत नाहीं. हुंड्याच्या चाली- मुळें आणि इतर अनेक कारणांनीं अशी परिस्थिति उत्पन्न होते कीं, बाप कितीही सुशिक्षित आणि उदार मतांचा असला तरी आपण ठरविलेल्या वराविषयीं मुलीचें मत काय आहे तें पाहून त्याप्रमाणें वागणें त्याला शक्यच नसतें.

असलीं हीं वधूवरांचीं कृत्रिम मिश्रणेंच विवाह या नांवानें आज आपल्या समाजांत ओळखलीं जात आहेत. हा सुप्रजाजननविघातक प्रकार बंद व्हावा म्हणून प्रीतिविवाहाचा आम्हीं पुरस्कार केला तर तें समंजसपणाचेंच नव्हे काय ? शिवाय, प्रीतिविवाह आपल्या देशांत सुरू झाल्यास पाश्चात्य समाजांत आज दृष्टीस पडणारे घाणेरडे प्रकार आपल्यांतही दिसूं लागतील असें समजण्याचें काय कारण आहे ? रामायण—भारतकालीं आपल्यांत प्रीतिविवाह प्रचलित होता. त्या काळच्या समाजांत अनीति प्रसृत झाल्याची किंवा प्रीतिविवाहामुळें त्या समाजास निकृष्टावस्था प्राप्त झाल्याची साक्ष आपणांस भारतांतील कोणत्याही कथेंत सांपडत नाहीं. उलट त्या काळांतील आपले पूर्वज अधिकाधिक बलवान्, बुद्धिमान् व पराक्रम- शील होत गेले असाच स्पष्ट पुरावा आपल्याला मिळतो. मग यावरून आपण असें कां समजूं नये कीं कांहीं कारणामुळें प्रीतिविवाहाची वेली पाश्चात्य वातावरणांत नीट न वाढतां तिला कुजकीं नासकीं फळें येतात; परंतु तीच वेली आपल्या आर्यसंस्कृती- च्या वातावरणांत उत्तम प्रकारें वाढून सुफलित होण्याचाच संभव आहे !

आतां घटितादि प्रकाराप्रमाणेंच गोत्रवर्णादि प्रकारही झूट समजण्याचा आमचा हेतु आहे किंवा काय याविषयीं थोडक्यांत खुलासा केला पाहिजे.

सगोत्र, सपिंड आणि असवर्ण हे विवाहप्रकार आपल्या शास्त्रकारांनीं निषिद्ध मानले होते व वधू आणि वर हीं एकाच वर्णाचीं पण भिन्न गोत्रांतील व भिन्न-

पिढ्यांचीं असलीं पाहिजेत असा नियम त्यांनीं घालून दिला होता हें खरें आहे. म्हणजे ब्राह्मणशूद्रादि चार वर्णांत बेटीव्यवहार होणें त्यांना अनिष्ट वाटत होतें व त्याचप्रमाणें एकाच गोत्रांतील किंवा सापिण्ड्यांतील वधूवरांचे विवाहही हित-परिणामी नाहींत अशी त्यांची समजूत होती. या समजुतीच्या मुळाशीं सुप्रजा-जननाविषयींची आस्थाच होती हेंही खरें आहे. सगोत्र, सपिंड किंवा असवर्ण विवाह झाल्यानें सुप्रजाजनन होणार नाहीं असें वाटल्यामुळेंच आपल्या पूर्वजांनीं ते विवाह निषिद्ध ठरविले होते. आधुनिक वनस्पतिशास्त्राचाही आधार या गोष्टीला मिळण्यासारखा आहे. Cross-breeding नांवाचा जो प्रकार आहे त्या योगानें झाडांना उत्तम फळें येतात, किंबहुना या प्रकारानें पशूंच्या ठायींसुद्धां अधिक चांगली संतति निर्माण होते असें अनेक प्रयोगांवरून सिद्ध झालेलें आहे. हें cross-breeding किंवा ही कलम करण्याची पद्धति म्हणजे एक प्रकारचा असगोत्र विवाहच होय; परंतु या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी सवर्ण परंतु असगोत्र विवाहाच्या तथ्याविषयीं कित्येक शंका तशाच राहतात. त्या ह्या—

[१] ज्या ऋषीपासून गोत्रास प्रारंभ झाला तेव्हांपासून हजारों वर्षांचा काळ आतांपर्यंत लोटला असल्यामुळें आज आत्रि गोत्रांतील स्त्री–पुरुष विवाहित झाल्यास एकाच कुळांतील स्त्री-पुरुषांच्या विवाहासारखा तो कसा मानतां येईल तें समजत नाहीं. हीच स्थिति सर्व गोत्रांची. सापिंड्यासंबंधीं जी विचारसरणी शास्त्रकारांनीं स्वीकारली आहे ती पाहिली असतां, सात पिढ्यांनंतर आनुवंशिक संस्कारांचा जोर नाहींसा होतो. मग मूळ ऋषीपासून सातच काय, सातशें पिढ्या लोटल्या असतांनाही वंशसंस्काराच्या तत्त्वावर सगोत्र विवाह कसा निषिद्ध ठरेल ! शिवाय सपिण्ड विवाह अनर्थमूलक आहे ही समजूतदेखील फारशी शास्त्रशुद्ध आहेसें वाटत नाहीं. वनस्पतिवर्गांत आणि पशुवर्गांत सपिण्डसंबंध नेहमीं घडून येतात. पण त्यांची संतति त्यांच्या जातीच्या मानानें चांगलीच असते. आपल्यांतही पूर्वीं एके काळीं सपिण्ड स्त्री-पुरुषांचे शरीरसंबंध घडून येत असत याबद्दल कोणीही इतिहासज्ञ वाद घालणार नाहीं व त्या शरीरसंबंधापासून कुप्रजा निर्माण झाल्याचा दाखला मिळण्यासारखा आहे असेंही आम्हांस वाटत नाहीं. सपिण्ड विवाह झाल्यानें वधूवरांच्या अंगचे अवगुण प्रजेच्या ठायीं द्विगुणित प्रमाणांत प्रगट होतात असा एक मुद्दा पुढें आणण्यांत येतो; पण असली विचारसरणी पटणें शक्य नाहीं. कारण,

अवगुण द्विगुणित होत असले तर गुणही द्विगुणित होत असले पाहिजेत. आणि असें असेल तर अवगुणी सपिण्ड स्त्री-पुरुषांचा विवाह होऊं नये हा नियम जितका सिद्ध होतो त्याच्या दसपटींनीं गुणसंपन्न सपिण्ड स्त्री-पुरुष मुद्दाम निवडून काढून त्यांचे विवाह करावे असा नियम प्राप्त होतो. सारांश, सुप्रजाजननशास्त्राच्या दृष्टीनें सपिण्ड विवाहांत कोणता दोष आहे तें सांगतां येण्यासारखें नाहीं. आम्हांस तर हे विवाह निषिद्ध ठरविण्यांत ते मनास प्रशस्त वाटत नाहींत यापलीकडे कांहीं कारण असेलसें वाटत नाहीं. विवाहसंस्थाच मुळीं स्त्री-पुरुष संबंधावर घातलेलें एक कृत्रिम बंधन कसें आहे हें मागें एके ठिकाणीं आम्हीं दाखविलें आहे. तें वाचकांस आठवतच असेल. विवाहसंस्था रूढ होऊन बराच काल लोटल्यावर उदात्त आणि प्रगल्भ भावना विवाहकर्माभोंवतीं जसजशा जमत गेल्या तसतशी एकाच कुळांतील स्त्री-पुरुषांनीं संयुक्त होण्याची कल्पना अप्रशस्त वाटूं लागली असली पाहिजे, आणि तसेंच पाहिलें तर आपणां सर्वांचाच मूळ पुरुष एक आहे. तेव्हां स्त्री-पुरुषांनीं लग्नेंच मुळीं होऊं नयेत कीं काय, असा अनवस्थाप्रसंग उत्पन्न होण्यासारखा आहे असें वाटल्यामुळें पांच, सहा, सात अशा कांहीं नियमित पिढ्यांपर्यंतच सापिण्ड्य मानण्याची कल्पना निघाली असली पाहिजे.

[२] बरें, अभिन्न कुळांतील स्त्री-पुरुषांच्या विवाहापेक्षां भिन्न कुळांतील वधूवरांचा संबंध अधिक सुप्रजादायी असतो, ही कल्पना क्षणभर खरी मानली तर गोत्र व पिंड मात्र भिन्न पाहिजेत आणि वर्ण मात्र निराळा असतां कामा नये, ही मर्यादा काय म्हणून असावी ? कोणी कदाचित् असें म्हणतील कीं, आंब्याच्या झाडाचें कलम करतांना एका आंब्यावर दुसऱ्या कुळांतील आंब्याचें-पण आंब्याचेंच, पेरूचें किंवा नारिंगाचें नव्हे-बीजारोपण आपण करतों त्याप्रमाणेंच, भिन्न गोत्रांतील पण एका ब्राह्मणवर्णांतील स्त्री-पुरुष एकत्र आणण्याचा नियम असावा हें साहजिकच आहे; पण ही उपमा पुढें मांडण्यांत थोडी हातचलाखी होते. आंब्यावर पेरूचें कलम करूं नये हें खरें आहे; आणि या न्यायानें पुरुष व एखादी गाय संयुक्त होऊं नयेत हें आम्ही कबूल करूं; पण कलमाच्या बाबतींत ज्याप्रमाणें दोन आंब्यांचीं झाडें त्याचप्रमाणें विवाहाच्या बाबतींत ब्राह्मण व शूद्र. ते एकाच मानवी जातीचे उपवर्ग आहेत व त्यांचा संबंध घडून यावयास कांहींच प्रत्यवाय असतां कामा नये. सारांश, असवर्ण विवाह निषिद्ध मानण्यांत कोणतें सुप्रजाजननाचें तत्त्व आहे तें सांगतां येण्यासारखें नाहीं. हे विवाह निषिद्ध

गणले गेले याचीं ऐतिहासिक कारणें फार निराळीं आहेत व हिंदुस्थानच्या मूळ अनार्यांपासून आपलें आर्य बीज अलिप्त रहावें ही आर्यांची दक्षताच या निषेधाच्या मुळाशीं बऱ्याच अंशांनीं आहे असें आम्हांस वाटतें.

या आमच्या विवेचनावरून गोत्रादि विवाहविषयक बंधनेंही आतां टाकलीं पाहिजेत असें म्हणण्याकडे आमची प्रवृत्ति असल्याचें वाचकांस दिसून आलेंच असेल; परंतु विवाह असगोत्र, असपिंड आणि सवर्ण व्हावा हें इष्ट होय असें ज्यांस मनापासून वाटत असेल त्यांच्या समजुती दुखविण्याची आमची इच्छा नाहीं. खेरीज हिंदुधर्मांत राहून हीं बंधनें तोडण्याची अजून कायद्याची परवानगी नाहीं. म्हणून आम्ही इतकेंच म्हणतों कीं, विवाहाच्या बाबतींत हीं बंधनें तर पाळावींतच; पण शिवाय सर्वांत मोठें जें सुप्रजाजननहेतूचें बंधन त्याकडे दुर्लक्ष करूं नये. आज असा प्रकार घडतो कीं, दोन उत्तम स्त्री-पुरुष असले तरी ते एकाच गोत्राचे असले कीं त्यांच्या विवाहाची भाषा अजिबात बंद होते आणि एखाद्या वधूसाठीं एकादा अवगुणी मुलगा केवळ तो भिन्न गोत्री म्हणून पसंत करण्यांत येतो. ही स्थिति सुप्रजाघातक होय व ती जितक्या लवकर बदलेल तितकी चांगली. प्रीतिविवाह रूढ झाले म्हणजेसुद्धां स्त्री-पुरुषांनीं सुप्रजाजननाचें ध्येय सतत नजरेसमोर ठेवूनच परस्परांची निवड केली पाहिजे हें आम्ही येथें पुन्हा एकदां कटाक्षानें बजावतों. प्रीतिविवाह म्हणजे अनाचार किंवा अत्याचार नव्हे. आपल्या प्रीतींतील स्त्री आपल्याशीं संलग्न झाली असतां आपण उत्तम प्रजा निर्माण करूं किंवा नाहीं हा विचार करूनच तरुणांनीं स्त्रिया निवडल्या पाहिजेत. एलन काय या विदुषीचीं या विषयासंबंधींचीं जीं मतें मागें एकदां आम्हीं उल्लेखिलीं होतीं तीं अशींच असल्याचें वाचकांस स्मरत असेल. आपली प्रीति समाजास कोणत्याही प्रकारें घातुक होणार नाही अशी खबरदारी घेण्याची आवश्यकता ज्या स्त्री-पुरुषांस समजते तेच स्त्री-पुरुष परस्परप्रीतीचें स्वर्गीय सुख भोगण्यास लायक आहेत याविषयीं तिळमात्र संशय नाहीं.

असो. हें विवेचन फार लांबलें. परंतु इतका विस्तार अपरिहार्यच होता. " सुप्रजाजननसंभव वाढवावयाचा असेल तर आधीं विवाहसंस्था सुधारली पाहिजे " हे हॅव्हलॉक एलिस यांचे उद्गार सर्वथैव सत्य वाटल्यामुळेंच आम्हीं या विषयाचा इतका ऊहापोह केला. सुप्रजाजननाविषयीं ज्यांना ज्यांना कळकळ वाटत असेल

त्यांच्या मनावर **प्रौढ विवाहाचें व पर्यायानें प्रतिविवाहाचें अगत्य** थोड्या प्रमाणांत तरी बिंबलें गेलें, आणि आम्हीं दर्शविलेल्या दिशेनें विवाहसंस्थेची सुधारणा केल्यानें आपल्या आर्यसंस्कृतीस कोणत्याही तऱ्हेनें दुखविल्यासारखें न होतां उलट प्राचीन चालीरीतींचें पुनरुज्जीवन केल्यासारखेंच होईल, अशी त्यांची समजूत पटली तर आमच्या विवेचनाच्या विस्ताराबद्दल आम्हांस वाईट वाटण्याचें कांहींच कारण उरणार नाहीं.

(१)

# प्रकरण पांचवें

सुप्रजाजननाच्या विधायक कार्यक्रमाचा विचार वास्तविक मागच्या प्रकरणाच्या शेवटींच संपावयास पाहिजे. कारण प्रीतियुक्त प्रौढ विवाह झाले म्हणजे सुप्रजाजननाची पूर्वतयारी झाली असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं. वधूवर हीं प्रजाजननाचीं साधनें असल्यामुळें तीं प्रौढ, एकमेकांविषयींच्या प्रीतीनें युक्त, विविधगुणसंपन्न आणि स्वतःवरची सुप्रजाजननाची सामाजिक जबाबदारी ओळखणारीं असावींत असा आग्रह धरणें योग्यच आहे. परंतु या आग्रहापलीकडे सुप्रजाजननासाठीं आणखीही कांहीं गोष्टी झाल्या पाहिजेत असें म्हणण्याचें वास्तविक प्रयोजन असतां कामा नये. कारण सुप्रजाबीजसंपन्न स्त्री-पुरुषांचे एकदां विवाह झाले म्हणजे सृष्टिक्रमाप्रमाणें त्यांस संतति होणार, आणि मूळ आईबापांचीच निवड चांगली झाली असल्यामुळें ही संतति बुद्धि, सामर्थ्य, पराक्रम, तेज इत्यादि गुणांनीं संपन्न अशीच होणार याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं, इतकेंच नव्हे तर अशा स्त्री-पुरुषांच्या पोटीं जितकी अधिक संतति निर्माण होईल तितकें समाजाचें अधिक हित होईल असें आपण समजलें पाहिजे.

वास्तविक असें असावयास पाहिजे; पण दुर्दैवानें तसें नाहीं. रूपगुणसंपन्न स्त्री-पुरुषांच्या पोटीं जी प्रजा येईल ती सुप्रजा असेल येवढें म्हणणें खरें आहे, परंतु अशा स्त्री-पुरुषांस जितकी अधिक संतति होईल तितकी इष्टच आहे आणि तिच्यामुळें समाजाचें अधिकाधिक हितच होईल असें समजणें चुकीचें होय. किंबहुना सत्पात्र स्त्री-पुरुषांचे विवाह झाल्यानंतर समाजाच्या हिताच्या दृष्टीनें त्यांनीं आपल्या पोटीं जन्म पावणाऱ्या संततीचें योग्य प्रकारें नियमन करणें अगत्याचें आहे. याच कारणासाठीं केवळ सत्पात्र वधूवरांचे विवाह घडवून आण ल्यानें सुप्रजाजननाचें विधायक कार्य संपत नाहीं; तर विवाहित स्त्री-पुरुषांच्या मनावर संतति-नियमनाचें अगत्य बिंबविणें ही पुढची पायरी शिल्लक राहते.

कित्येक वाचकांना या विचारसरणीचा मोठा विस्मय वाटेल. ते विचारतील, “ काय हो, सुप्रजाजनन हा विवाहाचा आद्य हेतु होय असें थोड्या वेळापूर्वीं तुम्हींच म्हटलें ना ? त्या आधारावर तर तुम्ही बालविवाहाचा जोरानें निषेध करून प्रीतियुक्त प्रौढविवाहाची थोरवी गाइलीत ! आणि आतां तुम्ही आपल्याच

विधानाच्या विरुद्ध जाऊन—पलट खाऊन असें म्हणतां कीं, सत्पात्र स्त्री-पुरुषांच्या पोटीं जितकी प्रजा होईल तितकी हवी असें नसून त्यांच्यापासून नियमित प्रजा निर्माण झाली पाहिजे ! या तुमच्या असंबद्धतेला म्हणावें तरी काय ?"

वाचकांच्या मनांत अशी शंका उद्भवणें साहजिक आहे आणि आमची विचारसरणी प्रथमदर्शनीं त्यांस असंबद्ध वाटली तर त्यांतही नवल नाहीं; पण त्यांनीं आम्हीं म्हणतों त्या गोष्टींचा थोडा विचार करण्याचे श्रम घेतले तर त्यांस आमच्या विचारसरणींतील मर्म पटल्यावांचून राहणार नाहीं.

संभोगसौख्य हें विवाहानुषंगिकच होय, आणि संतति हें क्रमप्राप्त विवाहफलच होय. या दोन्ही गोष्टींविषयीं कोणी वाद घेणार नाहीं. तसेंच विवाह करण्यामध्ये सुप्रजा-जननाखेरीज दुसरा कोणताही हेतु स्त्री-पुरुषांच्या हृदयांत असतां कामा नये यांतही शंका नाहीं. आपल्या पूर्वजांचीं जीं मतें आपण मागच्या प्रकरणांत पाहिलीं तीं अशींच आहेत. "ही माझी कन्या प्रजोत्पादनासाठीं मी तुला देतों" अशा मंत्रानें पित्यानें कन्यादान करण्याविषयींच शास्त्रकारांची आज्ञा आहे. त्याचप्रमाणें विवाहहोम-प्रसंगी वरानें वधूला उद्देशून जे मंत्र म्हणावेत अशी शास्त्राज्ञा आहे त्या मंत्रांचेही "आपण उभयतां आतां प्रजोत्पादन करूं," "आपण पुष्कळ पुत्रांस जन्म देऊं" असाच मथितार्थ असून, त्या प्रसंगीं देवांची प्रार्थना करण्यासाठींही "या माझ्या पत्नीच्या ठिकाणीं दहा पुत्र जन्म पावोत" या व अशा अर्थाचेच मंत्र शास्त्र-कारांनीं वराच्या तोंडीं घातले आहेत. अर्थात् या सर्व गोष्टींवरून हेंच उघड होतें कीं, विवाहित स्त्री-पुरुषांनीं आपल्या पोटीं शक्य तितकी संतति निर्माण होण्याची इच्छा करावी, असाच शास्त्रकारांचा अभिप्राय होता.

परंतु शास्त्रकारांचा अभिप्राय त्या प्रकारचा होता म्हणून आजही बहु-प्रसवाचा उपदेश स्त्री-पुरुषांना करणें हितकारक होईल किंवा काय ? शास्त्रकारांच्या काळांतील परिस्थिति आणि आजची परिस्थिति यांत कांहीं महत्त्वाचा भेद आहे किंवा नाहीं ? भेद असल्यास त्या भेदाच्या आधारावर बहुप्रसविनेच्या ऐवजीं संततिनियमनाचाच उपदेश स्त्री-पुरुषांस करणें समर्थनीय ठरेल किंवा नाहीं ? आणि संततिनियमनाचा उपदेश प्रथमदर्शनीं विवाहहेतूविषयींच्या प्राचीन कल्पनांच्या विरुद्ध दिसला तरी वास्तविक तो तसा नाहीं असें म्हणतां येईल किंवा नाहीं ? इत्यादि प्रश्नांचा विचार करणें अगत्याचें आहे.

पहिली गोष्ट ही कीं, प्राचीनकाळीं शास्त्रकारांनीं बहुप्रसविता प्रशस्त मानली

होती तेव्हां ती खरोखरच समाजाच्या कल्याणाची होती. मानवी सुधारणेच्या प्राचीन अवस्थेंत असा एक काल असतो कीं, तेव्हां कोणत्याही समाजसंघास आपलें अस्तित्व आणि वर्चस्व कायम ठेवावयाचें असेल तर इतर समाजांशीं युद्ध करून त्यांना जिंकण्याची तयारी त्यास नेहमीं ठेवावी लागते. या कारणानें समाजाचा अंतर्गत एकोपा आणि मनुष्यबळ हीं ज्या ज्या गोष्टींनीं वाढतील त्या सर्व गोष्टींचा अंगीकार करण्याचें धोरण त्या समाजास ठेवावें लागतें. या काळासच युद्धप्रधान काळ असें म्हणतात. आपले शास्त्रकार ज्या काळीं होऊन गेले तो अशा प्रकारचा युद्धप्रधान काळच होता. त्यामुळें समाजाचें मनुष्यबळ वाढणें त्यांस इष्ट वाटणें अगदीं साहजिक होतें व त्या दृष्टीनें विवाहित स्त्री-पुरुषां-च्या पोटीं अधिक संतति झाल्यास "अधिकस्याधिकं फलम्" असें त्यांस वाटून बहुप्रसवितेचा प्रकार त्यांनीं प्रशस्त मानला यांत नवल नाहीं. श्रुतींच्या काळांत आपले आर्य पूर्वज नुकतेच इकडे येऊन व अनार्य लोकांवर प्रभुत्व स्थापित करून वसाहत करून राहूं लागले होते ही कल्पना जर खरी असली तर अशा अटापटीच्या वेळीं त्यांना आपल्या स्वतःच्या समाजाचें संख्याबल वाढणें अगत्याचें वाटणें अपरिहार्यच होतें; व "आम्हांस पुष्कळ गाई द्या", "आम्हांस पुष्कळ पुत्र द्या" अशा प्रकारची त्यांनीं देवांची प्रार्थना केल्याची साक्ष कित्येक वेदऋचांवरून पटते हें ठीकच आहे. श्रुतींनंतर शास्त्रकारांच्या वेळीं ही परिस्थिति बहुतांशीं अशाच स्वरूपाची होती. समाजाचें संख्याबल वाढेल तितकें वाढणें इष्टच नव्हे तर अतिशय जरुरीचें होतें.

ज्या काळीं शास्त्रकारांनीं बहुप्रसविता प्रशस्त मानली आणि स्त्री-पुरुषांनीं बहु-प्रसवितेचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवावें असा पर्यायानें उपदेश केला त्या काळांत लोकसंख्या अगदीं कमी होती व ती जितकी वाढेल तितकें समाजाचें कल्याण होण्यासारखें होतें. आर्य लोकांची वसाहत बहुतांशीं स्थिर झाली होती. ज्या देशांत त्यांनीं वसाहत स्थापन केली होती तो इतका विस्तृत असल्याचें त्यांना आढळून येत होतें कीं, हा देश म्हणजे एक स्वतंत्र 'पृथ्वीच आहे' असें त्याचें वर्णन त्यांना करावेंसें वाटत होतें. आपण जितके हातपाय पसरूं तितके पसरावयास अवकाश आहे अशी त्यांची खात्री होती. नैसर्गिक धनधान्याची इतकी समृद्धि होती कीं, "देवा, तुझें वैभव असमर्याद आहे! तें लुटतां लुटतां आम्ही थकून जातों!" अशा अर्थाचे उद्गार त्यांच्या तोंडून पुनः पुन्हा बाहेर पडत. सारांश, एखाद्या घराण्यांत

सर्व प्रकारची रेलचेल असून तिचा उपभोग घ्यावयास कोणी मूलच नसलें म्हणजे त्या घराण्यांतील पतिपत्नींना आपल्याला मुलेंबाळें व्हावीं अशी तीव्र इच्छा ज्याप्रमाणें होते त्याच प्रकारची इच्छा त्या काळच्या माणसांना व्हावी यांत नवल नाहीं.

पण आजची परिस्थिति तशी आहे काय ? धनधान्याची समृद्धि असून तिचा उपभोग घेणाऱ्या लोकांची संख्या मात्र थोडी, अशी स्थिति आज आहे काय ! आपला समाज कितीही वाढला तरी त्याला सुखानें हातपाय पसरतां येण्यासारखे आहेत काय ! आज आपल्या देशांत धनाची समृद्धि आहे काय ! धान्याची समृद्धि आहे काय ! लोकसंख्या कितीही वाढत गेली तरी तिचा भार सहन करण्याची शक्ति आपल्या देशांत उरली आहे काय ! या सर्व प्रश्नांस कोणीही सुज्ञ माणूस नकारात्मकच उत्तर देईल. कारण, कोरडे आणि ओले दुष्काळ, धान्याची टंचाई, वस्त्रप्रावरणाची महागाई आणि द्रव्याचा तर जवळ जवळ अभावच–हेंच आपल्या देशाच्या आजच्या स्थितीचें सगळ्यांत सार्थ वर्णन होईल हें आपल्यांपैकीं प्रत्येकाला स्वानुभवानें आणि थोड्याशा अवलोकनानें पटलेलें आहे. आपल्या देशांत उत्पन्न होणारें धनधान्य परकी अंमलामुळें परदेशांत रवाना होतें, त्यामुळें आपल्या देशांतील प्रजेला पोटभर खावयास मिळत नाहीं असें एखाद्यास वाटण्याचा संभव आहे. परंतु, परकी राज्य जाऊन हिंदुस्थानांत स्वराज्य किंवा सुराज्य स्थापन झालें, आणि देशांतील धनधान्य परदेशीं न जातां येथील लोकांच्या उपभोगासाठीं येथेंच रहावें अशी व्यवस्था झाली, तरी देखील तें एकतीस कोटि व त्याहीपेक्षां अधिक वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या सुखासमाधानाला पुरेसें होईल असें समजतां येणार नाहीं. माल्थस नांवाच्या गृहस्थानें तर आठराव्या शतकांत लोकांना सिद्ध करून दाखविलें कीं, आजपर्यंतच्या मनुष्यजातीच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, कोणत्याही देशाची लोकसंख्या नेहमीं दुप्पट, चौपट, सोळापट अशा प्रमाणांत वाढत जात असून त्या देशाच्या निसर्गोत्पादित द्रव्यांचा सांठा मात्र दुप्पट, चौपट, आठपट अशा प्रमाणांत वाढत जातो; आणि या सिद्धान्ताचा इशारा देऊन त्यानें अखिल मानवजातीला उद्देशून लोकसंख्येची वाढ कमी करण्याविषयीं कंठरवानें उपदेश केला. माल्थसच्या या सिद्धान्ताविषयीं, आणि जन्मसंख्या व मृत्युसंख्या यांच्या परस्पर प्रमाणाबद्दल जो सिद्धान्त विद्वन्मान्य झालेला आहे त्याविषयीं सविस्तर विवेचन येथें करावयाचें नाहीं. प्रस्तुत मुद्दा इतकाच कीं, शास्त्रकारांच्या वेळच्या परिस्थितींत आणि आजच्या परिस्थितींत अत्यंत महत्त्वाचा भेद असल्याकारणानें त्यांनीं

प्रशस्त मानलेली बहुप्रसविता आपण प्रशस्त न मानली तर तें समर्थनीयच ठरेल.

दुसरी गोष्ट अशी कीं, विवाहित स्त्री-पुरुषांस बहुप्रसवितेच्या ऐवजीं संततिनियमनाचा उपदेश करण्यांत विवाहाचा मूळ हेतु जो सुप्रजाजनन त्याच्याशीं विरुद्ध असा मार्ग आपण पत्करतों ही कल्पना खरी नव्हे. ही गोष्ट लक्षांत यावयासाठीं विवाहाचा हेतु नुसतें "प्रजाजनन" नव्हे तर "**सुप्रजाजनन**" होय हें वाचकांनीं विसरतां कामा नये. वर सांगितलेंच आहे कीं, प्राचीनकाळची परिस्थितिच अशी होती कीं, वधूवर गुणसंपन्न असतील अशाविषयीं काळजी घेतली कीं, पुढच्या गोष्टींची चिंता वाटण्याचें कारणच नव्हतें. कारण, अशा सत्पात्र वधूवरांच्या पोटीं येणारी संतति संख्येनें कितीही मोठी असली तरी तिला सर्व प्रकारचीं सुखसाधनें प्राप्त होतील याविषयीं लोकांना खात्री होती. संतति मूळ जन्माला येतांना गुणविशिष्ट असली म्हणजे पुढें खडतर परिस्थितीच्या अग्नींत ती दग्ध होईल असा संभवच कोणाच्या ध्यानींमनीं त्या काळीं येत नसे; पण आज तशी परिस्थिति राहिलेली नाहीं. देशकालाचें मान अजिवात बदललें आहे. स्त्री-पुरुषांच्या पोटीं जितकी संतति निपजेल तितकी इष्टच आहे असें वाटण्याचें आज कारण नाहीं. उलट देशाची मृत्युसंख्या दिवसें दिवस वाढत चालली आहे हें आपणांस स्पष्ट दिसत आहे; आणि या अवाढव्य मृत्युसंख्येचें खरें मूलकारण अवाढव्य जन्मसंख्याच होय असें तज्ज्ञ लोकांचें सांगणें आहे. जन्मसंख्येचें प्रमाण जसजसें वाढेल तसतसें मृत्युसंख्येचे प्रमाण वाढत जातें हा जर एक निसर्गसिद्ध नियमच असेल, तर अंध बहुप्रसविता हें कांहीं सुप्रजाजननाचें अमोघ साधन म्हणतां येत नाहीं. येवढेंच नव्हे तर बहुप्रसवितेमुळें "बहुप्रजा" निर्माण होईल; पण त्या प्रजेपैकीं बराच भाग अल्पकाळांतच मृत्युवश झाल्यावांचून राहणार नाहीं. तात्पर्य, "बहुप्रजा" व "सुप्रजा" यांतील भेद आपण ओळखला पाहिजे. हा भेद ओळखला आणि आजच्या परिस्थितींत स्त्री-पुरुषांनीं बहुप्रसवितेचें तत्त्व अंगिकारलें तर उत्पन्न होणारी प्रजा अवगुणी आणि अल्पायुषी अशी निपजेल हें ध्यानांत ठेविलें म्हणजे आज संततिनियमनाचाच उपदेश स्त्री-पुरुषांस केला पाहिजे हें प्रत्येकजण कबूल करील. विवाहाचा मूळ हेतु केवळ "**प्रजाजनन**" नसून "**सुप्रजाजनन**" आहे याची वाचकांस आम्ही पुन्हा एकदां आठवण देतों,

म्हणजे आज संततिनियमन करावयास सांगणें हें त्या मूल हेतूच्या विरुद्ध नसून त्या हेतूस पोषकच कसें आहे तें त्यांच्या चटकन् ध्यानांत येईल.

अर्थात् संततिनियमनाचा उपदेश विवाहित स्त्री-पुरुषांस करावयाचा झाल्यास त्या नियमनाच्या मार्गांचीही माहिती त्यांस शास्त्रीय रीत्या व मनमोकळेपणानें करून दिली पाहिजे. स्त्री-पुरुषांनीं ब्रह्मचर्याचें परिपालन केल्यास अवश्य तेवढें संततिनियमन घडेल असें कांहीं लोकांस वाटतें. महात्मा गांधी या मताचे आहेत; परंतु या मतांत सद्धेतु असला तरी सत्यांश नाहीं असें अनेक प्रमाणांनिशीं दाखवितां येईल. पण प्रस्तुत ग्रंथाचा तो विषय नव्हे. आमचें विचारपूर्वक बनविलेलें मत म्हणून आम्ही इतकेंच सांगतों कीं, संततिनियमनाचें ध्येय मान्य असेल तर तें ध्येय साध्य होण्यास विवाहित स्त्री-पुरुषांस कृत्रिम गर्भप्रतिबंधकांची शास्त्रशुद्ध माहिती करून देणें हा एकच सर्वांत अधिक परिणामी व व्यवहार्य मार्ग आहे. गर्भप्रतिबंधकांची माहिती उपलब्ध झाल्यास अनेक दुष्परिणाम होतील असा आक्षेप येतो; पण त्याला एक उत्तर असें कीं, दुष्परिणामांपेक्षां सुपरिणाम अधिक होतील कीं नाहीं हेंच आपण पाहूं. कारण जगांत निर्भेळ सुपरिणामी गोष्टच नाहीं. आणि शिवाय हे दुष्परिणाम टाळण्याचा एक मार्ग आहे तो हा कीं, सर्व समाजास सुप्रजाजननविषयक शिक्षण देण्यांत यावें.

# प्रकरण सहावें

सुप्रजाजननविषयक शिक्षण लोकांस मोठ्या प्रमाणावर दिलें असतां प्रतिबंधकांच्या ज्ञानाच्या प्रसाराचे दुष्परिणाम पुष्कळ अंशीं टळतील असें आम्हीं मागच्या प्रकरणांत सुचविलें; पण सुप्रजाजननविषयक शिक्षण म्हणजे काय असा प्रश्न वाचकांच्या मनांत या ठिकाणीं कदाचित् उत्पन्न होईल व तें शिक्षण कशा रीतीनें लोकांस द्यावें असेंही ते आम्हांस कदाचित् विचारतील. या प्रश्नास इतकें उत्तर पुरेसें आहे कीं, सुप्रजाजननविषयक शिक्षण म्हणजे कांहीं एक मोठा बागुलबुवा आहे अशी कोणी कल्पना करून घ्यावयाचें कारण नाहीं. तें शिक्षण द्यावयाचें म्हणजे इतकेंच करावयाचें कीं, वंशसंस्कार ( Heredity ) आणि परिस्थिति (Environments) यांचा प्रजाजननावर केवढा मोठा परिणाम होतो, विवाहास उद्युक्त होणारे स्त्री-पुरुष आरोग्य आणि बुद्धिमत्ता या दृष्टींनीं सत्पात्र असणें भावी प्रजेच्या हितासाठीं किती अगत्याचें आहे, आणि विवाहित स्त्री-पुरुषांनीं आपल्या आर्थिक सामर्थ्यानुरूप संततीचें नियमन करणें समाजाच्या कल्याणास्तव किती आवश्यक आहे, या सर्व गोष्टी समाजांतील प्रत्येक व्यक्तीस पुऱ्या समजून द्यावयाच्या. या गोष्टींच्या मुळाशीं असलेल्या सर्व शास्त्रीय तत्त्वांचें यथातथ्य ज्ञान म्हणजेच सुप्रजाजननविषयक शिक्षण होय. या तत्त्वांचें विवेचन आमच्या ग्रंथांत पूर्वीं आलेंच असल्यामुळें त्यांजविषयीं या ठिकाणीं अधिक ऊहापोह केल्यास ती केवळ पुनरुक्ति होईल. एका मुद्द्यासंबंधीं मात्र विशेष कटाक्षानें येथें लिहावेंसें आम्हांस वाटतें. ती गोष्ट ही कीं, सुप्रजाजननविषयक शिक्षणांत स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियांच्या रचनेच्या आणि कार्यांच्या माहितीचा अंतर्भाव होतो, आणि ही माहिती लोकांस करून देण्याच्या बाबतींत नसत्या सभ्य-पणाच्या कल्पना आड येऊं देतां कामा नये.

जननेंद्रियाविषयींची माहिती वाचणें किंवा सांगणें बीभत्सपणाचें होय ही कल्पना निखालस मूर्खपणाची होय. या कल्पनेनें समाजाचें हित होण्याऐवजीं अहितच होतें. आज घटकेस इंद्रियविषयक ज्ञानास जें गूढ स्वरूप प्राप्त झालेलें आहे त्यापासून समाजाचा कांहीं फायदा होत असेल तो आमच्या बुद्धीस तरी कळत नाहीं. त्यापासून होणारे तोटे मात्र आमच्या दृष्टीस धडधडीत दिसत आहेत. आज अशी स्थिति आहे कीं, धंद्यासाठीं शारीरशास्त्र शिकणाऱ्या डॉक्टर

व वैद्य लोकांचा वर्ग सोडला तर जननेंद्रियांसंबंधींची यत्किंचित्देखील माहिती एकालाही नसते. जननेंद्रियांविषयीं उघडपणें बोलणें किंवा वाचणें हें फाजील-पणाच्या सदरांत गणलें जात असल्यामुळें त्या माहितीवर गूढतेचें विलक्षण आवरण चढलेलें आहे. साधारण तेरा–चवदा वर्षांच्या मुलांस आणि मुलींस जननेंद्रियांविषयीं कुतूहल निसर्गतःच उत्पन्न होतें. कांहीं केलें तरी नैसर्गिक कुतूहलाची ही उकळी दाबून टाकणें शक्य नसतें. पण तें कुतूहल पूर्ण करण्याचा उघड मार्ग बंद झालेला असल्यामुळें गुप्तपणानें जें वाङ्मय हातीं येईल तें वाचून मुलगे व मुली आपली जिज्ञासा तृप्त करून घेत असतात. किंबहुना जननेंद्रियांसंबंधींची उघड चर्चा करणें किंवा त्या-संबंधींची माहिती उघडपणें वाचणें निषिद्ध ठरल्यामुळें त्याविषयींची तरुणांची जिज्ञासा अधिकच वाढते. जी गोष्ट विशेष कटाक्षानें लपवावी ती जाणण्याची इच्छा अधिकच होणें हा मुळीं मानवी स्वभावाचा धर्मच आहे. अमुक गोष्ट करूं नकोस असें एखाद्या लहान मुलाला सांगितलें कीं ती एकदां तरी करून पाहण्याची जबर इच्छा त्याच्या मनांत हटकून उत्पन्न होते. कॉलेजांतील विद्यार्थ्यांस परीक्षे-साठीं नेमलेल्या एखाद्या संस्कृत काव्यांतील कांहीं विशिष्ट भाग बीभत्स म्हणून गाळला कीं तो वाचून पाहण्याची उत्कंठा विद्यार्थ्यांच्या मनांत हटकून उद्भवते. या न्यायानेंच जननेंद्रियांच्या विषयावर पांघरूण घालण्याचा जितका प्रयत्न करावा तितकी तो विषय जाणण्याची मुलांची जिज्ञासा मुलांच्या मनांत वळावते.

याचा एक दुष्परिणाम असा होतो कीं, जननेंद्रियांच्या विषयाचा उच्चार म्हणजे एका निषिद्ध आणि गुप्त गोष्टीच्या उच्चाराप्रमाणें झाल्यामुळें तो उच्चार होतांच मुलांच्या व तरुणांच्या मनांत भलभलत्या भावना चटदिशीं उत्पन्न होतात. वास्तविक या उच्चाराचा असा परिणाम होण्याचें कांहींच कारण नाहीं. पण केवळ त्या विषयास चोरटेपणाचें स्वरूप प्राप्त झाल्यामुळें असें होतें. एखादी गोष्ट कधीं नव्हे ती घडणारी असली म्हणजे तिचे जे परिणाम मनावर होतात ते नेहमीं आणि उघडपणें ती घडूं लागली तर होत नाहींत. याचें एक मोठें चांगलें उदाहरण देण्यासारखें आहे. हिंदु समाजांत स्त्रिया व पुरुष यांचें बोलणें चालणेंही क्वचित् होतें आणि परस्त्रीच्या स्पर्श तर हिंदु पुरुषास अत्यंत अपवादात्मक अनुभव होय. उलट, युरोपिअन समाजांत स्त्री-पुरुषांचें परस्परांशीं वागणें अगदीं मोकळेपणाचें असतें आणि परस्त्रीच्या अंगाचा स्पर्श हा त्या समाजांतील पुरुषांस नेहमींचा अनुभव असतो. याचा परिणाम

असा होतो, कीं नृत्यसमारंभाच्या वेळीं परस्त्रीची मनसोक्त मिठी गळ्याभोंवतीं पडली तरी ज्या भावना युरोपिअन पुरुषाच्या मनांत उत्पन्न होत नाहींत त्या परस्त्रीच्या नुसत्या करस्पर्शानेंही हिंदी पुरुषाच्या मनांत उभ्या राहतात. जननेंद्रियांच्या विषयासंबंधीं आज असेंच आहे. त्या विषयाचा निर्देश करण्याची देखील चोरी झाल्यामुळें तो निर्देश झाल्याबरोबर मुलांच्या व तरुणांच्या मनांत भावनांची खळबळ उडते. उलट या विषयाची शास्त्रीय चर्चा इतर विषयांप्रमाणें होऊं लागली तर तिच्यांत गुप्त किंवा असाधारण असें कांहींच उरणार नाहीं आणि भावनांची धार बोथट होऊन जाईल. जे विद्यार्थी डॉक्टरीच्या परीक्षेसाठीं जननें-द्रियविषयक वाङ्मयाचें अध्ययन करतात ते किती भावनाशून्य वृत्तीनें त्याची चर्चा करतात तें पाहिलें म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता वाचकांस चटकन् पटेल.

जननेंद्रियविषयक ज्ञानासंबंधीं सध्यां जी "गौप्यगोपन" वृत्ति समाजांत आहे तिचा दुसरा एक दुष्परिणाम असा होतो, कीं त्या विषयासंबंधीं विलक्षण मूर्ख-पणाच्या आणि सर्वथैव चुकीच्या कल्पना लोकांच्या मनांत माजतात. जननेंद्रियां-च्या रचनेसंबंधीं आणि कार्यासंबंधीं, किंवा गर्भधारणेच्या क्रियेसंबंधीं कित्येक लोकांच्या मनांतील अत्यंत हास्यास्पद कल्पना आमच्या ऐकण्यांत आलेल्या आहेत. योनिमार्ग आणि मूत्रमार्ग एकच आहे अशी बहुतेक लोकांची समजूत असते. योनि-मार्गांत एखादा पदार्थ घातल्यास तो आंतल्या आंत नाहींसा होऊन पुन्हा बाहेर काढतां येणार नाहीं किंवा स्त्री व पुरुष या दोघांचा वीर्यपात एकत्र झाला, कीं गर्भ राहतो असल्या विचित्र समजुती कित्येकांनीं आमच्याजवळ बोलून दाखविल्या आहेत. या प्रकाराचें कारण येवढेंच, कीं या विषयाचें शास्त्रशुद्ध व यथातथ्य ज्ञान उघडपणें मिळविण्याची चोरी असल्यामुळें तरुण लोक त्यासंबंधीं केवळ आपली कल्पक शक्ति चालवून कांहीं तरी कल्पना बसवितात, किंवा "आतंकनिग्रह" कंपनीतर्फें प्रसिद्ध होणाऱ्या स्वस्त चोपड्यांसारखीं चोपडीं हातीं येतील तशीं वाचून अर्धेंकच्चें चुकीचें ज्ञान मिळवून तें खरें असें समजून चालतात.

या सर्व प्रकारामुळें असें होतें, कीं संभोगक्रियेसंबंधीं कांहीं तरी वेड्यावांकड्या समजुती स्त्रीपुरुषांच्या मनांत दृढमूल होतात व त्यांचे अनिष्ट परिणाम त्यांस भोगावे लागतात. वास्तविक संभोगकर्म हें मानवी जीवितांतील अत्यंत महत्त्वाचें आणि अत्यंत पवित्र असें कर्म होय. अंधारांत आंधळेपणानें कशीबशी पार पाडण्याची एक गोष्ट असें स्वरूप त्या कर्मास प्राप्त होणें अत्यंत अनिष्ट होय. पण

दुर्दैवानें आपल्या जीवनास आवश्यक अशीं आणि ज्यांचा आपल्या जीवनावर दूरवर परिणाम होतो अशीं सारींच कर्में विचारशून्यतेनें व अंधपणें करण्याची संवयच आपल्याला झालेली आहे. आपण रोज दोन वेळां जेवतों. पण अन्नाच्या चर्वणापासून तों पचनापर्यंत आपल्या इंद्रियांपैकीं कोणकोणत्या इंद्रियांची कशी क्रिया घाडत असते व ती उत्तम प्रकारें घडावी यासाठीं आपण कसें वागलें पाहिजे याविषयीं सबंध आयुष्यांत दोनदां आपण विचार करूं किंवा नाहीं त्याची शंकाच आहे. आहाराची जी गोष्ट तीच इतर कर्मांची. त्यामुळें पशू ज्याप्रमाणें आहार, निद्रा व मैथुन या क्रिया करतात त्यांच्यापेक्षां फारशा निराळ्या रीतीनें किंवा अधिक विचारशीलतेनें आपण त्या करतों असें क्वचितच म्हणतां येईल. आणि पचनेंद्रियांविषयीं कांहींही माहिती न मिळवितां मूर्खासारखी आहारक्रिया केल्यानें शारीरिक पीडा ज्याप्रमाणें भोगावी लागते त्याप्रमाणें जननेंद्रियांसंबंधीं खुळचट-पणाच्या समजुती मनांत वागवून संभोगसुखाचा उपभोग घेतल्यानें स्त्रीपुरुषांस नानातऱ्हेचीं दुःखें सोसावीं लागतात.

ही स्थिति सुधारावयाची असेल तर लोकांना सुप्रजाजननविषयक शिक्षण देऊन त्यांत शारीरशास्त्राचा अंतर्भाव अवश्य केला पाहिजे. आम्हांस तर असें वाटतें कीं, इतर कोणत्याही शास्त्रापेक्षां शारीरशास्त्राचें महत्त्व अधिक आहे, आणि अगदीं प्राथमिक शाळेपासून तों वरिष्ठ शिक्षणापर्यंत त्या शास्त्राचें अध्ययन विद्यार्थ्यांकडून करवून घेतलें पाहिजे. चीन देशाची राजधानी मुलांमुलींकडून घोकून घेण्यापेक्षां स्वतःच्या शरीरराज्याची राजधानी जें हृदय त्याची रचना आणि क्रिया त्यांना पुरी समजावून देणें अधिक हितकारक होणार नाहीं काय ! रशियांतल्या नद्या कोठें उगम पावतात व कशा वहात जातात त्याची घोकंपट्टी मुलांकडून करवून घेण्यापेक्षां स्वतःच्या शरीरांत रक्ताचा प्रवाह कसा चालतो हें त्यांना पूर्णपणें समजल्यास त्यापासून त्यांचें अधिक कल्याण होणार नाहीं काय! सारांश, शारीरशास्त्राचें ज्ञान प्रत्येक लहान मोठ्या माणसास असलें पाहिजे. समाजांतील प्रत्येक स्त्रीस व पुरुषास त्या शास्त्राचा परिचय करून देणें हें सुप्रजाजननविषयक शिक्षणाचें एक महत्त्वाचें अंग होय.

अर्थात् हा परिचय करून देतांना इतर कोणताही योग्यायोग्यतेचा विचार करण्याचें प्रयोजन नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. स्त्रीपुरुषांच्या वयोमानाप्रमाणें शारीरशास्त्राचे विभाग पाडणें अगत्याचें आहे. हात, पाय, नाक, डोळे वगैरे

इंद्रियांची रचना अगदीं लहान मुलांसही समजावून देण्यास हरकत नाहीं. पण जननेंद्रियांसंबंधींची माहिती कांहीं एका विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत न देतां पुढेंच देणें शहाणपणाचें होईल. सात आठ वर्षांच्या मुलांच्या मनांतदेखील जननेंद्रियां-संबंधीं कुतूहल असतें व त्याविषयींचे नाना प्रकारचे प्रश्न तीं आपल्या आई-बापांस व इतरांस अनेक वेळां विचारतात. हॅव्हलॉक एलिस यांचें असें मत आहे कीं, सगळ्या लहान मुलांच्या मनांतील एक नेहमींची ठरींव जिज्ञासा म्हणजे मूल उपजतें तें कोठून उपजतें तें जाणण्याची जिज्ञासा होय. यासंबंधीं मुलें आपल्या आईला वारंवार प्रश्न विचारीत असतात. पण अशा प्रश्नांस सरळ उत्तरें देऊन त्या विषयाची स्पष्ट मांडणी लहान बालकांपुढें करणें केव्हांही वेडेपणाचेंच ठरेल. या दृष्टीनें विचार केल्यास शारीर शास्त्रापैकीं जननेंद्रियविषयक माहिती कांहीं एका विशिष्ट वयानंतरच दिली पाहिजे. मात्र, हॅव्हलॉक एलिस यांच्या मतें त्या वयापर्यंतदेखील जननेंद्रियांसंबंधीं मुलांना अगदींच अंधकारांत ठेवूं नये. त्या-बद्दलची माहिती पर्यायानें देतां येण्यासारखी आहे. लहान मुलांच्या शिक्षणक्रमांत वनस्पतिशास्त्राच्या ढोबळ तत्त्वांचा अंतर्भाव केला म्हणजे ही गोष्ट सहज साध्य होईल. कारण वनस्पति आणि मनुष्य या दोघांच्या बाबतींत उत्पादनक्रियेचें स्वरूप बहुतांशीं एकच आहे. त्यामुळें लहान मुलांना वनस्पतीच्या जीवनाची माहिती झाली म्हणजे मानवी जननेंद्रियांची स्पष्ट चर्चा त्यांच्याकडून करविण्याचा दोषास्पद प्रकार टळूनच्या टळून त्याबद्दलची पर्यायात्मक माहिती त्यांना होईलच.

हें लहान मुलांसंबंधीं झालें, पण मुलगे किंवा मुली वयांत आल्यावर मात्र जननेंद्रियांविषयीं रूपकात्मक किंवा पर्यायात्मक कल्पना त्यांस देऊन स्वस्थ बसणें हिताचें होणार नाहीं. वयांत आलेल्या प्रत्येक मुलास व मुलीस जननेंद्रियाच्या रचनेविषयीं आणि कार्याविषयीं अगदीं स्पष्ट व शास्त्रपूत माहिती असलीच पाहिजे. असली माहिती उघडपणें देणें हें सदभिरुचीच्या विरुद्ध होय असें ज्यांस वाटत असेल, त्यांच्याशीं कितीही वाद घातला तरी तो पुरेसा व्हावयाचा नाहीं. त्यांची सदभिरुचि त्यांना लखलाभ होवो ! असल्या सदभिरुचीचे काय काय दुष्परिणाम होतात त्याचें विवेचन वर एके ठिकाणीं आम्हीं केलेंच आहे. त्याची पुनरुक्ति न करतां आम्ही इतकेंच म्हणतों कीं, असली सदभिरुचि यापुढें उराशीं बाळगण्यापेक्षां ती टाकल्यानेंच या नव्या शास्त्रीय युगांत आपल्या समाजाचें कल्याण होईल !

# भाग दुसरा

# सुप्रजाजननाचें निवारक व प्रतिबंधक कार्य

# प्रकरण सातवें

सुप्रजाजननविषयक कार्यक्रमाचे एकंदर तीन ठळक विभाग पाडतां येतात असें आम्हीं पहिल्या प्रास्ताविक प्रकरणांत सांगितल्याचें वाचकांस स्मरतच असेल. हे तीन विभाग म्हणजे सुप्रजाजननासाठीं विधायक कार्य करणें, निवारक उपाय योजणें, आणि प्रतिबंधक उपायांची तरतूद करणें, हे होत. या तीन विभागांस इंग्रजींत Positive, Negative व Preventive Eugenics अशीं नांवें येतात. यांपैकीं विधायक कार्याच्या दिशेचें विवेचन आम्हीं येथपर्यंत केलें; व त्या कार्यांत कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो त्याविषयीं सविस्तर ऊहापोह केला. आतां सुप्रजाजननासाठीं कोणकोणत्या गोष्टी विहित मानल्या पाहिजेत त्याविषयींची चर्चा अधिक वाढविण्यापेक्षां कोणकोणत्या गोष्टी निषिद्ध समजल्या पाहिजेत हें पाहणें अगत्याचें आहे.

सुप्रजाजननाच्या बाबतींत वंशसंस्काराचें महत्त्व अतिशय आहे हें आम्हीं मागील एका प्रकरणांत दर्शविलेंच आहे. प्रजेचा चांगुलपणा मातापितरांच्या व एकंदर वंशाच्या गुणावर बहुतांशीं अवलंबून असतो; आणि यासाठीं सुप्रजा निर्माण व्हावी म्हणून खटपट करावयाची असल्यास ज्यांच्या द्वारें तिचें जनन व्हावयाचें तीं पतिपत्नीच शरीरानें व बुद्धीनें गुणसंपन्न असलीं पाहिजेत. या दृष्टीनें आपल्या समाजांत प्रौढविवाह आणि प्रीतिविवाह लवकर रूढ होण्याची कितो आवश्यकता आहे त्याची चर्चा आम्हीं पूर्वीं केली ती वाचकांच्या ध्यानांत असेलच. परंतु प्रजाजनक पतिपत्नी गुणसंपन्न असतील अशी काळजी घेणें हें जसें सुप्रजाजननाचें विधायक कार्य आहे तसेंच सुप्रजाजननाच्या हेतुनें निवारक (Negative) कार्यही करणें जरुरीचें आहे. तें कार्य हें कीं ज्यांचा विवाह अगोदरच झालेला आहे, पण ज्यांच्याकडून प्रजोत्पत्ति झाल्यास ती प्रजा अवगुणदूषित असण्याची भीति आहे, अशा पतिपत्नींकडून प्रजोत्पत्ति होणारच नाहीं अशी तजवीज करणें.

प्रजोत्पादनास पात्र कोणास समजावें या प्रश्नाचें उत्तर आमच्या आतांपर्यंत-च्या चर्चेवरून वाचकांस सहज सुचण्यासारखें आहे. वंशसंस्कारवादांतील तत्त्वें

लक्षांत घेतल्यास, विशेषतः बीजपरंपरेचें महत्त्व दृष्टीपुढें ठेवल्यास, कोणीही असेंच म्हणेल कीं, समाजांत सुप्रजा निर्माण होऊन समाजाचें शारीरिक आणि बौद्धिक तेज उत्कृष्ट प्रतीचें व्हावें अशी इच्छा असल्यास अत्यंत शुद्ध बीजाच्या आणि गुणसंपन्न अशा पतिपत्नींसच प्रजोत्पादनास पात्र मानलें पाहिजे. अर्थात् ज्या पतिपत्नींच्या अंगीं कांहीं शारीरिक किंवा बौद्धिक व्यंग असेल तीं पतिपत्नी प्रजोत्पादनास पात्र नव्हेत. प्रजोत्पादनास सत्पात्र कोण आणि कुपात्र कोण हें याप्रमाणें एकदां ठरल्यानंतर, सुप्रजाजननाच्या दृष्टीनें कुपात्र पतिपत्नींच्या पोटीं संतति होणार नाहीं अशी व्यवस्था करणें अतिशय जरुरीचें होय हें उघडच होतें.

पण या ठिकाणीं असा एक प्रश्न साहजिकपणेंच उत्पन्न होतो, कीं कुपात्र पतिपत्नींना आपल्या पोटीं संतति उत्पन्न होऊं देऊं नये असा लोकांनीं त्यांस उपदेश करणें सोपें आहे, पण तो अंमलांत आणणें त्या पतिपत्नींस तितकें सोपें नाहीं व तसें वागण्यास तीं सहज तयार होतील असेंही नाहीं. एकंदर समाजाच्या कल्याणाच्या गोष्टी सांगावयाच्या म्हटल्या तर त्या कोणासही सांगतां येतील; किंवा सुप्रजाजननाच्या अगत्यावर व्याख्यान द्यावयाचें झालें तर तें कोणासही देतां येईल, पण ज्यांचा या व्याख्यानाशीं जिव्हाळ्याचा संबंध येतो त्या कुपात्र पतिपत्नींकडून त्या व्याख्यानाप्रमाणें वर्तन सहज रीतीनें होईल अशी अपेक्षा करणें चुकीचें ठरेल. कारण, कुपात्र पतिपत्नींनीं प्रजा निर्माण करूं नये या तत्त्वाचा एक अर्थ असा होऊं शकतो, कीं त्यांनीं संभोगसुखाचा मुळीं अनुभवच कधीं घेऊं नये. हा अर्थ स्वीकारूनही कांहीं लोक असें म्हणणारे निघतील कीं, समाजाच्या हितासाठीं आजन्म व्रतस्थ राहावयास कुपात्र पतिपत्नींनीं तयार कां असूं नये ? आपल्या संभोगसुखामुळें साऱ्या समाजाचें अपरिमित नुकसान होईल असें धडधडीत कळत असल्यावर तें नुकसान करण्याचा अधमपणा करण्यापेक्षां स्वतःच्या सुखलालसेवर कायमचें पाणी सोडण्यास कुपात्र स्त्री-पुरुषांनीं तयार कां होऊं नये ? हें म्हणणें तर्कशुद्ध असेल, पण मानवी स्वभावाचा धर्म ध्यानांत घेतला तर तें सुज्ञपणाचें ठरणार नाहीं. कुपात्र पतिपत्नींनीं संभोगाचा सर्वस्वीं त्याग करून निसंतान राहाण्याचें स्वखुषीनें पतकरलें तर त्यापासून समाजाचें अमर्याद हित होईल यांत बिलकुल शंका नाहीं; पण अशी खुषी त्यांच्या ठिकाणीं दिसून येणें जवळजवळ अशक्य आहे. समाजाच्या हिताहिताची निःस्वार्थी दृष्टि तर बाजूलाच राहिली, पण संभोगामुळें स्वतःचा नाश होईल असें स्पष्ट दिसत

असूनही संभोगापासून सर्वस्वीं अलिप्त राहणें मनुष्यास अत्यंत दुष्कर आहे. महाभारतांतील पंडुराजाची कथा या बाबतींत नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

असें असल्यामुळें कुपात्र पतिपत्नींना सुप्रजाजनन साध्य करण्यासाठीं अजीबात व्रतस्थ रहावयास सांगणें शक्य दिसत नाहीं. कुपात्र पतिपत्नींस संतति होऊं नये याचा अर्थ जर त्यांनीं संभोगसुख कधींच अनुभवूं नये असा होत असेल तर हें तत्त्व मुळींच व्यवहार्य ठरणार नाहीं. या तत्त्वाप्रमाणें वागण्यास कोणी तयार होणार नाहीं हें एक; आणि कुपात्र पतिपत्नींस तसें वागावयास सांगणें विलक्षण निष्ठुरपणाचें होईल हें दुसरें. पतिपत्नी कुपात्र असलीं तरी त्यांस संभोगाची कायमची बंदी करावयाची हा कोठला न्याय ? त्यांच्या अंगीं कांहीं शारीरिक किंवा मानासिक व्यंग असलें तरी तो सर्वस्वीं त्यांचाच दोष आहे असें म्हणतां येईल काय ? आनुवंशिक संस्कारांमुळें एखाद्या स्त्रीच्या ठिकाणीं कांहीं व्याधि उत्पन्न झाली असेल, किंवा बाप दारूबाज असल्यामुळें एखाद्या पुरुषाच्या अंगीं कांहीं शारीरिक व्यंग आलेलें असेल तरे त्या स्त्रीस किंवा पुरुषास त्या व्यंगानिमित्त संभोगास अपात्र ठरवून एक प्रकारची जबर शिक्षाच देणें न्याय्य ठरेल काय ?

सुप्रजाजननाच्या साध्यतेसाठीं कुपात्र पतिपत्नी निसंतान राहणें तर अत्यंत अवश्य आहे, आणि उलट तीं तशीं निसंतान रहावीं यासाठीं त्यांस आजन्म संभोगत्याग करावयास सांगणें तर अव्यवहार्य आणि अन्यायाचें ठरतें. मग या अडचणींतून मार्ग कसा काढावयाचा ? या प्रश्नास एकच उत्तर शक्य दिसतें तें हें कीं, कुपात्र पतीपत्नींचा संभोगाचा नैसर्गिक हक्क हिरावून न घेतां त्यांस प्रजोत्पत्तीस अक्षम करण्याचा कांहीं उपाय असेल तर त्याची योजना केली पाहिजे. संभोगसुखास कायमचें न आंचवितां संततिविहीन राहण्याचा एखादा उपाय असेल तर त्या उपायास कुपात्र पतिपत्नींची संमति चटकन् मिळेल. कारण हा उपाय अंमलांत आणल्यास केवळ अपत्यसुखाचाच काय तो लाभ आपणांस मिळणार नाहीं, बाकीचें सर्व संसारसौख्य इतर लोकांप्रमाणेंच आपल्याला मिळेल अशी त्यांची खात्री पटेल; आणि समाजाच्या कल्याणासाठीं मूळ संभोगाचा हक्कच सोडण्यापेक्षां फक्त अपत्याचें सौख्य सोडण्यास कोणतींही कुपात्र पतिपत्नी कदाचित् अधिक आनंदानें तयार होतील.

सुदैवानें असला उपाय शास्त्रज्ञांच्या शोधक बुद्धीनें उघडकीस आणला आहे. स्त्रीस किंवा पुरुषास निर्वीर्य करण्याची एक कृति शास्त्रज्ञांनीं शोधून काढली आहे.

या कृतीस इंग्रजींत Sterilization अशी संज्ञा आहे. स्त्रीस निर्वीर्य करावयाचें असल्यास तिच्या अंडवाहिनी मध्येंच कापतात, आणि पुरुषास निर्वीर्य करावयाचें झाल्यास Vas-deferens नांवाच्या एका वाहिनीचा छेद करतात. हे शस्त्रच्छेद केले म्हणजे स्त्रीच्या अंडाशयांतील सूक्ष्मांडकें आणि पुरुषाच्या वीर्यांतील सूक्ष्मबीज यांचें मीलन सर्वस्वीं अशक्य होऊन बसतें. आणि या मीलनाखेरीज गर्भसंभव शक्य नसल्यामुळें तोही कायमचा बंद होतो. शिवाय, असल्या शस्त्रच्छेदामुळें संभोगक्रियेच्या मार्गांत कोणत्याही प्रकारचा अडथळा उत्पन्न होत नाहीं, किंवा त्या क्रियेंतील नेहमींचें सौख्यही कमी होत नाहीं. या शस्त्रच्छेदाच्या कृतींत एकच दोष आहे तो हा कीं, स्त्रीवर किंवा पुरुषावर एकदां शस्त्रक्रिया झाली म्हणजे त्यांस कायमचें निर्वीर्यत्व येतें. या दोषामुळेंच संततिनियमनासाठीं सरसकट सर्व पतिपत्नींस आचरितां येण्यासारखा एक मार्ग या नात्यानें या शस्त्रच्छेदाच्या कृतीची शिफारस करतां येत नाहीं. परंतु, कुपात्र पतिपत्नींचा विचार करतांना या दोषाचें महत्त्व उरत नाहीं. कारण, त्यांच्या बाबतींत आपला संकेतच मुळीं उघड उघड असा असणार कीं, तीं कायमचीं प्रजोत्पादनास अक्षम व्हावींत. तेव्हां कुपात्र पतिपत्नींस संभोगाची मोकळीक राहूनच्या राहून त्यांच्या पोटीं संतति मात्र निर्माण होऊं नये असें करावयाचें असल्यास शस्त्रच्छेदाच्या साहाय्यानें त्यांस निर्वीर्य करणें (Sterilization) हाच मार्ग सर्वांत उत्तम दिसतो.

पाश्चात्य देशांत सुप्रजाजननासंबंधींचे निवारक कार्य कशा रीतीनें करण्यांत येतें तें पाहूं गेल्यास हा Sterilization चा उपायच त्यांनीं विस्तृत प्रमाणावर अमलांत आणलेला दिसतो. सत्पात्र स्त्री-पुरुषांपासून संतति निर्माण होईल अशी व्यवस्था करणें, आणि कुपात्र स्त्री-पुरुषांच्या पोटीं संतति होणार नाहीं, अशी तरतूद करणें, हीं सुप्रजाजनन कार्याचीं दोन प्रमुख अंगें होत हें पाश्चात्य देशांतील सर्व विद्वानांस मान्य आहे. त्याचप्रमाणें कुपात्र पतिपत्नींस केवळ व्रतस्थ राहाण्याचा उपदेश करण्यापासून इष्ट फलसिद्धि होणार नाहीं ही अडचणही सर्वांनीं ओळखलेली आहे. त्यामुळें कुपात्र स्त्रीपुरुषांस निर्वीर्य करण्याचा प्रयोग तिकडे प्रत्यक्ष करून पाहाण्यांत आला असून त्याचे परिणाम चांगले होतात असा अनुभवही मिळालेला आहे. न्यू यॉर्क शहरांत Eugenics Record

Office नांवाची एक संस्था स्थापन झालेली आहे. त्या संस्थेमार्फत सु-प्रजाजननाच्या विषयासंबंधीं हरप्रकारची माहिती मिळविण्यांत येते, व या विषयाच्या अंगोपांगांसंबंधीं अधिकारी लोकांचीं मतें व सूचना संकलित करून प्रसिद्ध करण्यांत येतात. अमेरिकन प्रजेच्या रक्तांत किंवा हाडींमासीं जे अवगुण खिळलेले असतील ते वंशसंस्कारवादाप्रमाणें पुढील पिढींत उतरण्याच्या संभवाची भीति वाटल्यावरून ते अवगुण तसे उतरणार नाहींत अशी प्रतिबंधक योजना करतां येईल किंवा नाहीं याचा विचार करण्यासाठीं या संस्थेमार्फत सन १९१४ सालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. त्या कमिटीनें कुपात्र स्त्री-पुरुष कोणास समजावें, याविषयीं प्रथम चर्चा करून नंतर त्यांस प्रजाहीन करण्याचे सर्वांत चांगले उपाय कोणते याविषयींच्या सूचना आपल्या रिपोर्टांत नमूद केलेल्या आहेत. त्या कमिटीच्या मतें कुपात्र स्त्रीपुरुषांचें खालील वर्गीकरण सयुक्तिक होईल.

१. भ्रमिष्ट लोक (Feeble-minded)
२. व्यसनमग्न लोक (Inebriate)
३. बेरड (Criminals)
४. रोगी
५. वेडे

या सर्व प्रकारच्या स्त्री-पुरुषांच्या ठिकाणीं असलेले अवगुण पुढील पिढींत उतरण्यासारखे असतात, व त्यांमुळें समाजाच्या हिताच्या दृष्टीनें त्यांस निसंतान ठेवणें अगत्याचें असतें. उपरिनिर्दिष्ट कमिटीच्या रिपोर्टांत तर या पांच जातींच्या लोकांच्या पंक्तीलाच भिकारी, बेकार वगैरे रिकामटेकड्या लोकांस बसविलेलें आहे. या रिकामटेकडया लोकांस संतति झाली असतां ती मनानें आणि शरीरानें पंगू व दुबळी झाल्यावांचून राहणार नाहीं अशा कल्पनेनेंच अर्थात् त्यांनीं असें केलें असलें पाहिजे. आपण ही कल्पना ग्राह्य मानावयाची किंवा नाहीं हें निराळें. बाकी, आपल्याकडे रिकामटेकडेपणाचा धंदा किती मोठ्या प्रमाणावर चालतो, आणि भिकारी, साधु, बैरागी, पंडये, पुजारी यांना पोळासारखें हिंडून पैसे मिळत असल्यामुळें त्यांची व त्याबरोबरच देशाची केवढी अवनति

होत आहे तें ध्यानांत आणलें म्हणजे व्यसनी किंवा वेरड लोकांतच त्यांची गणना करावयास कांहीं हरकत नाहीं असेंच कोणीही म्हणेल.

या कुपात्र स्त्री-पुरुषांस प्रजाहीन करण्यासाठीं शस्त्रच्छेदाचा ( Sterilization ) उपाय अंमलांत आणला पाहिजे असें या कमिटीनें स्पष्ट मत दिलेलें आहे. आपणही या उपायाचा विचार केला पाहिजे. कारण, आपल्या देशांत कुपात्र स्त्री-पुरुषांची संख्या अतिशय मोठी असून, आपणांस सुप्रजाजननासाठीं झटावयाचें असल्यास या कुपात्र लोकांच्या बीजाची परंपरा पुढच्या पिढ्यांत चालणार नाहीं अशी खबरदारी घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं. हिंदुस्थानच्या प्रजेंत कुपात्र लोकांचा भरणा किती आहे याची वाचकांस कल्पना द्यावयासाठीं सेन्सस रिपोर्टांतील कांहीं आंकडे खालीं दिले आहेत.

| देश | वेडे | | मुके व बहिरे | | आंधळे | | महारोगी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष |
| हिंदुस्थान | ३ | २ | ९ | ६ | १६ | १७ | ६·८ | २ |
| इंग्लंड व वेल्स | ३१ | ३३ | ६ | ५ | ९ | ८ | ... | ... |
| आयर्लंड | ३८ | ३४ | ८ | ७ | ११ | १२ | ... | ... |
| अमेरिका | ३५ | ३२ | ७ | ६ | १० | ९ | ... | ... |

या कोष्टकावरून प्रथमतः लक्षांत येतें तें हें कीं, वेड्यांचें प्रमाण पाहिलें तर तें हिंदुस्थानांत इतर देशांहून कमी आहे, पण मुके, बहिरे, आंधळे यांची संख्या इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांत अधिक आहे, आणि महारोगानें तर हिंदुस्थानास विशेषेंकरून ग्रासलेलें आहे.

इतर देशांशीं तुलना न करतां फक्त हिंदुस्थानाच्या प्रजेंत कुपात्र लोक किती प्रमाणांत आहेत तें समजून घ्यावयाचें असल्यास खालील कोष्टकें पहावीं.

## दर लाख माणसांमागें कुपात्र लोक.

| देश | वेडे लोक | |
|---|---|---|
| | १९११ | १९२१ |
| हिंदुस्थान | २६ | २८ |
| मुंबई | २९ | ४२ |
| मध्यप्रांत, वऱ्हाड | १५ | २२ |

| देश | मुके आणि बहिरे | |
|---|---|---|
| | १९११ | १९२१ |
| हिंदुस्थान | ६४ | ६० |
| मुंबई | ६१ | ५५ |
| मध्यप्रांत, वऱ्हाड | ४७ | ८८ |

| देश | आंधळे | |
|---|---|---|
| | १९११ | १९२१ |
| हिंदुस्थान | १४२ | १५२ |
| मुंबई | १४४ | १४६ |
| मध्यप्रांत, वऱ्हाड | २०७ | २५६ |

या तीन कोष्टकांकडे पाहिलें तर असें दिसतें कीं, सन १९११ पासून १९२१ पर्यंतच्या दहा वर्षांत कुपात्र लोकांची संख्या वाढत गेलेली आहे, आणि ती तशी वाढत गेली आणि येत्या १९३१ च्या शिरगणतीच्या वेळीं ती याहूनही फुगलेली दिसली तर त्यांत नवल नाहीं. कारण, आज स्थिति अशी आहे, कीं मुके आंधळे, पांगळे वगैरे सर्व कुपात्र लोक मनःपूत विवाह करीत आहेत आणि मनः. पूत संततीही निर्माण करीत आहेत. यांचा हा क्रम असाच अव्याहत चालला तर त्यांच्या पोटीं येणाऱ्या कुप्रजेमुळें समाज आंतून किडत जाईल आणि सुप्रजाजननाचे जे प्रयत्न आपण करूं त्या प्रयत्नांवर विरजण पडत जाईल. एखाद्या पाण्याचा प्रवाह एका बाजूनें कोणी तरी शुद्ध करीत असावें आणि त्याच्या मूळ उगमापाशीं त्यांत कोणीं दुसऱ्यानें घाण टाकीत राहावें, तशांतील हा प्रकार होईल. म्हणूनच कुपात्र स्त्रीपुरुषांच्या पोटीं संतति निर्माण होणार नाहीं अशी व्यवस्था करणें हें सुप्रजाजननाच्या एकंदर कार्यांतील महत्त्वाचें अंग ठरतें. न्यू यॉर्क शहरांतील Eugenics Record Office या संस्थेमार्फत बसलेल्या ज्या कमिटीचा उल्लेख आम्हीं वर केला त्या कमिटीनें सुप्रजाजननार्थ सुचविलेल्या उपायांत या निवारक ( Negetive ) कार्यास प्रमुख स्थान दिलेलें आहे; आणि तिनें असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, प्रथम कांहीं कालपर्यंत विधायक कार्यापेक्षांही निवारक कार्याकडे अधिक लक्ष पोंचविणें आपणांस भाग पडेल, आणि एकदां प्रजेंतील वाईट बीजाचा मोड झाला म्हणजे विधायक कार्य अधिक सुलभ होऊन तें अधिक जोरानें आपल्यास हातीं घेतां येईल. या अभिप्रायाची सुज्ञता कोणासही पटण्यासारखी आहे, आणि याचसाठीं Sterilization च्या उपायाचा अवलंब करून कुपात्र स्त्रीपुरुषांस निसंतान करण्याचा प्रयत्न आपल्या समाजांत होणें अत्यंत अगत्याचें होय असें आम्हीं प्रतिपादन केलें आहे.

यासंबंधीं दुसरी एक सूचना करण्यासारखी आहे ती ही कीं, कुपात्र पतिपत्नींनीं संतति निर्माण करूं नये हें जसें खरें तसेंच त्याच्याही अलीकडे एक पाऊल येऊन कुपात्र स्त्री-पुरुषांनीं मुळीं विवाहच करूं नये. स्त्री-पुरुष विवाहित झाले म्हणजे त्यांस संभोगसुखावर एक प्रकारचा हक्क सांगतां येतो, आणि मग हा हक्क हिरावून न घेतां कुपात्र पतिपत्नींस संततिविहीन कसें ठेवतां येईल त्याचा विचार करण्याची पाळी येते. उलट, कुपात्र स्त्री-पुरुषांचे विवाहच होईनासे झाले तर हा कठीण प्रश्न उद्भवणारच नाहीं, आणि निवारक ( Negative ) कार्याची

साध्यता सहजासहजीं होईल. कुपात्र स्त्री पुरुषांस अविवाहित ठेवण्याचा हा मार्ग चटकन् पटण्यासारखा असल्यामुळें सुप्रजाजननार्थ खटपट करणाऱ्या कांहीं लोकांचा असा आग्रह आहे कीं, कायद्याचा अवलंब करून हा मार्ग प्रत्यक्ष आचरणांत आणावा. त्यांच्या मतें कोणत्याही स्त्रीचें किंवा पुरुषाचें लग्न व्हावयाचें असल्यास स्वतः सुप्रजाजननक्षम असल्याचा डॉक्टरी दाखला मिळविण्याची कायदेशीर सक्ति त्यांजवर असावी. असला दाखला देण्यासाठीं सरकारनें एक स्वतंत्र खातेंच निर्माण करावें, आणि तज्ज्ञ वैद्यकशास्त्रविशारदांची त्यावर नेमणूक व्हावी. या खात्यामार्फत ज्यांस दाखला मिळाला असेल त्यांसच लग्न करण्याची परवानगी असावी आणि या दाखल्याखेरीज कोणीं लग्न केलें तर तो गुन्हा समजला जावा.

ही जहाल योजना विशेष ग्राह्य किंवा व्यवहार्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. सुप्रजाजननासारख्या कार्यांत कायद्याच्या सक्तीनें हित होण्याऐवजीं अहितच होण्याचा संभव असतो. हॅव्हलॉक एलिस वगैरे विद्वानांचीं मतें कायदेशीर सक्तीच्या विरुद्ध असल्याचें आम्हीं पूर्वीं एकदां सांगितलेंच आहे. आपल्या देशांतील सामाजिक सुधारणेच्या इतिहासावरूनही हीच गोष्ट उघड होते. म्हणून कुपात्र स्त्री-पुरुषांनीं विवाह करूं नयेत ही गोष्ट कितीही महत्त्वाची असली तरी तिच्यासाठीं सक्तीचा अवलंब करण्यापेक्षां लोकांच्या खुषीवरच ती ठेवणें अधिक सुज्ञपणाचें होईल. मात्र कुपात्र स्त्री-पुरुषांच्या मनांत तशी स्फुर्ती निर्माण करण्यासाठीं आपण अतिशय झटलें पाहिजे, व लोकशिक्षणाच्या साधनावर विश्वास ठेवून त्याचा हरतऱ्हेनें आपण उपयोग केला पाहिजे हें निर्विवाद होय.

# प्रकरण आठवें

पहिल्या भागांत वंशसंस्कारवादाचा विस्तृत ऊहापोह करण्यासाठीं दुसऱ्या प्रकरणाची आम्हीं योजना केली. त्या सबंध चर्चेत आमचा मुख्य उद्देश असा होता कीं, सुप्रजा निर्माण व्हावी अशी कळकळ ज्या ज्या माणसास वाटत असेल त्याच्या त्याच्या मनावर वंशसंस्काराचें महत्त्व उत्तम प्रकारें बिंबावें. सुप्रजा-जननासंबंधीं सर्व विद्वानांचें असें मत आहे कीं, निर्माण झालेल्या प्रजेस उत्तम प्रकारें वाढवून शरीरानें व मनानें बलिष्ठ करण्याच्या प्रयत्नापेक्षां जी प्रजा निर्माण व्हावयाची तिचें बीजच मुळीं शुद्ध, सात्त्विक आणि गुणविभूषित असेल अशी खबरदारी घेणें अधिक महत्त्वाचें आणि परिणामकारक आहे. हेंच मत पुढें मांडतांना ज्या एका उपमेचें यथार्थत्व आम्हांस विशेष वाटतें व जी आम्हीं पूर्वी एक दोन वेळां वापरली आहे तिचाच पुन्हा उपयोग करावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, प्रवाहांतील पाणी दूषित आहे असें आढळून आल्यावर तें शुद्ध करीत बसण्यापेक्षां त्याच्या मूळ उगमापाशीं जाऊन तेथील जिवंत झऱ्यां-तून बाहेर पडण्याच्या वेळींच पाणी शुद्ध असेल अशी तजवीज करणें अधिक दूरदर्शीपणाचें आणि परिणामकारक होईल. सुप्रजालालनानें जें कार्य होईल त्या-पेक्षां शंभरपटींनीं अधिक कार्य सुप्रजाजननामुळें होईल. प्रजेचें बीजच उत्तम असेल अशी खबरदारी घेणें हा एक मार्ग आणि प्रजेची परिस्थिति उत्तम प्रकार-ची करून तिचें शारीरिक व मानसिक बल वाढविण्यासाठीं झटणें हा दुसरा मार्ग. या दोहोंपैकीं पहिल्या मार्गानें फलप्राप्ति अधिक त्वरेनें होते याविषयीं किंचित्‌ही शंका नाहीं. म्हणूनच त्या मार्गाची विस्तृत चर्चा करण्यांत आम्हीं सबंध पहिला भाग खर्चीं घातला.

पण परिस्थितीपेक्षां वंशसंस्काराचें महत्त्व शतपटींनीं अधिक असलें तरी परि-स्थितीचें महत्त्व कांहींच नाहीं असें म्हणणें शक्य नाहीं. दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभीं वंशसंस्कार व परिस्थिति यांची तुलनात्मक चर्चा करतांना आम्हीं दिलेलीं उदाहरणें वाचकांस आठवतच असतील. व्याधिग्रस्त वंशांत जन्मलेल्या मुलाला अगदीं उत्तम प्रतीच्या हवेंत आणि उत्कृष्ट परिस्थितींत ठेविलें आणि वाढविलें तरी तें शरीरानें आणि बुद्धीनें सणसणीत होणें शक्य नाहीं हें खरें, व त्यावरून वंश-

संस्काराचें आत्यंतिक महत्त्व सिद्ध होतें हेंही खरें. परंतु या उदाहरणाप्रमाणेंच, अगदीं उत्कृष्ट वंशांत जन्मलेल्या मुलाला सर्वस्वीं दोषपूर्ण अशा परिस्थितींत वाढविल्यास त्याच्या अंगच्या गुणांचें कांहींही चीज न होतां तें कुप्रजेच्या वर्गांतच शेवटीं जाऊन बसेल, हें उलट उदाहरणही लक्षांत ठेवण्यासारखें आहे; आणि या उदाहरणावरून सुप्रजाजननाच्या बाबतींत परिस्थितीचें महत्त्व बरेंच असल्याचें उघड व्हावयास हरकत नाहीं. प्रजा ज्यांच्याकडून निर्माण व्हावयाची ते वधूवर निर्दोष, बुद्धिमान आणि गुणसंपन्न असतील अशी खबरदारी घेतल्यानें सुप्रजाजननाचें अर्धेंअधिक कार्य होण्यासारखें आहे असें म्हणणें केव्हांही समर्थनीयच ठरेल. परंतु अशा प्रकारें जी सुप्रजा निर्माण होईल तिचें पालनपोषण उत्तम प्रकारें करण्याची जबाबदारी कांहीं कमी महत्त्वाची नाहीं. मनुष्य शरीरानें आणि मनानें तेजःपुंज निपजणें हें दोन गोष्टींवर अवलंबून असतें. एक त्याच्या पूर्वजांच्या आणि विशेषतः आईबापांच्या द्वारें त्याच्या रक्तांत जे गुणावगुण आले असतील ते; आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्या एका विशिष्ट प्रकारची हवा, पाणी, अन्न इत्यादि जीवनास आवश्यक आणि पोषक द्रव्यें त्यास मिळतील तीं. उत्कृष्ट मातापितरांच्या पोटीं जन्मलेल्या मुलांस जर उत्तम हवा, उत्तम पाणी, उत्तम अन्न आणि उत्तम शिक्षण यांचा लाभ झाला तर त्यांची मूळची उत्कृष्टता अनेक पटींनीं वाढेल यांत किमपि शंका नाहीं. समाजाची परिस्थिति सर्व बाजूंनीं सुधारून समाजांतील सर्व स्त्री-पुरुषांस सुंदर हवा, पाणी व अन्न मिळेल अशी तजवीज केल्यानें स्वभावतः चांगली असलेली प्रजा अधिक चांगली होईल; आणि शिवाय, स्वभावतः सदोष असलेल्या कुप्रजेच्या अंगचे अवगुणही बऱ्याच अंशांनीं कमी होतील. सुप्रजालालनामुळें गुणविशिष्ट प्रजेचे गुण दृढ होतात, कुप्रजेंतील दोष नाहींसे नाहीं तरी निदान कमी होतात आणि मातापितरें अधिक गुणसंपन्न बनत जाऊन व त्यामुळें भावी प्रजेसाठीं चांगलें बीज तयार होऊन कुप्रजाजननास प्रतिबंध होतो. म्हणूनच सुप्रजालालनाच्या कार्यास प्रतिबंधक ( Preventive ) अशी संज्ञा देण्यांत येते. हें कार्य कशा स्वरूपाचें असलें पाहिजे तें आतां आपण पाहूं.

सुप्रजालालनास इंग्रजींत Euthenics अशी संज्ञा आहे. या प्रतिबंधक कार्यांत कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो त्याची कल्पना करावयाची असल्यास एक मुख्य भेद ध्यानांत ठेवला म्हणजे पुरे. तो हा कीं प्रत्येक मनुष्याच्या अंगचे

एकंदर गुणावगुण निश्चित करणाऱ्या दोन गोष्टी असतात. एक त्याच्या मातापितरांच्याद्वारें त्याच्या पिंडावर घडलेले वंशसंस्कार आणि त्याखेरीज, तो जन्मास येऊन या जगांत नांदूं लागला म्हणजे त्याच्या मनावर व शरीरावर घडणारे बाह्य संस्कार. यांपैकीं वंशसंस्कारांविषयीं दक्षता ठेवण्याच्या कार्यास विधायक कार्य म्हणतां येईल, व बाह्य संस्कार उत्तम प्रकारचे व्हावेत अशी काळजी घेणें म्हणजेच प्रतिबंधक कार्य समजलें पाहिजे. तेव्हां सुप्रजालालनाची अगदीं ढोबळ रूपरेखा द्यावयाची झाल्यास असें म्हटलें असतां चालेल, कीं प्रजेवर होणारे बाह्य संस्कार चांगल्या प्रकारचे असतील अशा हेतूनें जे जे प्रयत्न करण्यासारखे असतील त्या सर्वांचा अंतर्भाव सुप्रजालालन या सदरांत होतो.

समाजाची एकंदर राहणी सुधारणें हा सुप्रजालालनाचा मुख्य उद्देश होय. राहणी हा शब्द या ठिकाणीं आम्ही अत्यंत व्यापक अर्थानें योजीत आहोंत. लोकांना मिळणारें अन्न व पाणी, ते ज्या हवेंत वावरतात ती हवा, ते ज्या घरांत व वस्तींत राहतात तीं घरें आणि वस्ती वगैरे सर्व गोष्टींचा निर्देश राहणी या शब्दानें आम्ही करूं इच्छितों. इंग्रजींत Environments या शब्दानें ज्या गोष्टींचा बोध होतो त्या सर्वांचा अंतर्भाव राहणी या शब्दांत आम्ही करतों असें वाचकांनीं समजावें. प्रजेच्या राहणीची सुधारणा केल्यानें स्त्रीपुरुष शरीरानें व मनानें अधिकाधिक सुदृढ होऊन भावी पिढीसाठीं चांगलें बीज तयार होत जाईल ही गोष्ट वाचकांस सहज समजेल. परंतु वाचकांच्या ध्यानांत सहजासहजीं कदाचित् येणार नाहीं असा एक सुपरिणाम राहणीच्या सुधारणेमुळें घडून येईल. तो हा कीं, स्त्रीपुरुषांच्या प्रसवितेचें प्रमाण कमी कमी होत जाईल, आणि हल्लींची बहुप्रसविता हळुहळू नाहींशी होईल. बहुप्रसविता नाहींशी झाली कीं, सध्यांचें भयंकर मृत्युबाहुल्यही आपोआपच नष्ट होईल. प्राणिशास्त्राचें ज्यांनीं विशेष अध्ययन केलें आहे, व मानवी समाजांतच नव्हे तर एकंदर जीवसृष्टींतच जन्मसंख्या व मृत्युसंख्या हीं दोन्ही एकमेकांवर कितपत आणि कां अवलंबून आहेत हें विशेष सूक्ष्म दृष्टीनें पाहण्यासाठीं ज्यांनीं वर्षानुवर्षें परिश्रम केले आहेत अशा शास्त्रज्ञांनीं असा एक सिद्धान्त बसविला आहे कीं, कोणत्याही मानवी समाजांत **राहणी जितकी निकृष्ट दर्जाची तितकें जननाचें प्रमाण अधिक व त्यामुळें मृत्यूचें प्रमाणही अधिक, आणि राहणी जसजशी**

**उच्च दर्जाची तसतसें जननाचें प्रमाण कमी आणि त्याबरोबरच मृत्यूचें प्रमाणही कमी.**

या सिद्धान्तासंबंधीं शास्त्रज्ञांत एकमत आहे, आणि त्याचें विवेचन करणारे अनेक ग्रंथ इंग्रजी व इतर पाश्चात्य भाषांतून प्रसिद्ध होत आहेत. सुप्रजाजनना-च्या कार्यांत या सिद्धान्ताचें महत्त्व फार असल्यामुळें त्याची स्थूल कल्पना वाचकां-स या ठिकाणीं करून देणें आवश्यक आहे.

राहणीचा दर्जा आणि प्रसविता यांचें व्यस्त प्रमाण असतें हें प्रथम अनेक अनुभवसिद्ध गोष्टींवरून उघड दिसूं लागलें, आणि नंतर शास्त्रज्ञांनी त्यासंबंधीं विचार करून त्याच्या कारणांची मीमांसा बसविली. राहणी जितकी गरिबीची आणि गलिच्छ तितकी प्रसविता अधिक हा नित्यांतलि अनुभव आहे. तीस चाळीस रुपयांवर कारकुनी करून झावबाच्या वाडीसारख्या गलिच्छ भागांत संसार करणाऱ्या लोकांना दरवर्षी अपत्य व्हावयाचें हें जवळ जवळ ठरलेलें. त्या वाडींतल्या चाळींत जाऊन प्रत्येक खोलींत डोकावून पाहिलें तर दर दोन खोल्यांपैकीं एकींत पाळणा बांधलेला हटकून दिसतो. पंधरा वीस रुपयांवर पट्टे-वाल्याची नोकरी करून राहणाऱ्या लोकांत तर मुलाबाळांचा लबेदा याहूनही अधिक दिसतो. गिरणीकामगारांच्या घाण, अंधाऱ्या, कोंदट खुराड्यांत जाऊन पाहणी करण्याचें धाडस केलें तर बहुतेक प्रत्येक बिऱ्हाडांत (!) बाइल बाळंत तरी, नाहीं तर गर्भार तरी असल्याचें आढळेल. आणि दारोदार हिंडून लोकांच्या उष्ट्या-खरकट्यावर जगणाऱ्या आणि उकिरड्यावर किंवा गटारांत झोंपणाऱ्या भिकाऱ्यांच्या बायकांकडे व त्यांच्या पोरांकडे पाहिलें, कीं वर्षांतून चार वेळां विणाऱ्या कुत्रीची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं ! उलट, साधारण श्रीमंत लोकांना मुलेंबाळें कमी असावयाचीं हें ठरलेलें. ताटावरून पाटावर व पाटा-वरून पलंगाच्या काठावर अशा ऐषआरामांत राहणाऱ्या, स्वतः व्यायाम घेण्या-ऐवजीं गाडीच्या घोड्यांना किंवा मोटारला व्यायाम देण्यासाठींच जणुं कांहीं संध्याकाळीं घटकाभर बॅंकबेवर जाणाऱ्या आणि गुडघाभर उंच परांच्या गाद्या-गिरद्यांत लोळणाऱ्या लक्षाधीशांच्या पोटीं संतान होणें म्हणजे मुसळाला अंकुर फुटण्याइतकें कठीण असावयाचें, आणि राजेरजवाड्यांच्या टोलेजंग राजवाड्यांत बारशाचा समारंभ कधीं व्हावयाचा नाहीं, आणि राजा मेला कीं त्याच्या गादीला

औरस वारस नसल्यामुळें दत्तकाच्या प्रश्नानें हजार भानगडी उत्पन्न व्हावयाच्या, या साऱ्या गोष्टी ठरलेल्या !

मागें एका प्रकरणांत आम्हीं असें म्हटल्याचें वाचकांस आठवत असेल कीं, पतिपत्नींचें मुलांचा सांभाळ करण्याचें सामर्थ्य आणि त्यांची संतति यांचें नेहमीं व्यस्त प्रमाण असावयाचें. म्हणजे ज्यांना एकाही मुलाचा धड सांभाळ करण्याची ऐपत नाहीं त्यांच्या पोटीं डझनवारी मुलें यावयाचीं, आणि ज्यांच्या घरांत मोरींत फेंकल्या जाणाऱ्या खरकट्यावर चार गरीब कुटुंबांचे संसार सहज चालतील अशा कोट्याधीशांना पांच-पंचवीस मुलांना राजपुत्रांसारखें वाढविण्याची ऐपत असून ते सदा निसंतान राहावयाचे हा निसर्गाचा निष्ठुर नियमच आहे. निकृष्ट स्थितींत राहणाऱ्या लोकांमधील जन्मसंख्येचें प्रमाण आणि श्रीमंतींत राहणाऱ्या लोकांमधील प्रमाण हीं दोन्ही पाहिलीं कीं, या नियमाविषयीं पुरती खात्री पटते. आपल्या देशांत अशा प्रमाणांचे खात्रीलायक आंकडे अजून घेतले गेले नाहींत; पण पाश्चात्य देशांत असले आंकडे मुद्दाम गोळा करण्यांत आले आहेत. डॉक्टर बर्टिलन नांवाच्या गृहस्थांनीं पॅरिस व बर्लिन् या शहरांतील निरनिराळ्या वस्तींत हिंडून जे आंकडे तयार केले ते खालीं दिले आहेत.

| राहणीचा दर्जा | १५ ते ५० वयाच्या दर १०० स्त्रियांमागें संतति | |
|---|---|---|
| | पॅरिस शहरीं | बर्लिन शहरीं |
| अतिशय दरिद्री लोक | १४३ | २०४ |
| गरीब लोक | १२८ | १९८ |
| साधारण स्थितींतील लोक | १०९ | १९२ |
| मध्यम स्थितींतील लोक | ९६ | १७२ |
| श्रीमंत लोक | ९४ | १४५ |
| अतिशय श्रीमंत लोक | ८५ | १२१ |

आपल्याकडील शहरांत राहणाऱ्या लोकांविषयीं माहिती गोळा केली तर ती-देखील अशीच असेल याविषयीं आम्हांस शंका वाटत नाहीं.

या अनुभवावरून साहजिकच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, अस्वच्छ राहणींतील व गरीब स्थितींतील लोकांस अधिक संतति आणि श्रीमंत व सुशिक्षित लोकांस संतति कमी असें का असावें ? या प्रश्नावर विचार करून शास्त्रज्ञांनीं असें ठरविलें आहे कीं, हवा, पाणी व अन्न यांचा जो प्रसवितेवर परिणाम घडतो तो कांहीं प्रत्यक्ष घडत नाहीं, तर तो पर्यायानें घडतो. माणसाच्या प्रसवितेचा प्रत्यक्ष संबंध कशाशीं असेल तर तो त्याच्या अंगच्या तेजाशीं (Nervous energy) आहे. किंवा असें म्हटलें असतां चालेल कीं, प्रसविता ज्या योगानें कमी अधिक होते त्या सर्व गोष्टींत त्या त्या व्यक्तींच्या अंगचें तेज सर्वांत अधिक महत्त्वाचें होय. एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं तेज कमी असेल तर त्यास अधिक संतति होईल, आणि तें अधिक असेल तर त्यास संतति कमी होईल. हेंच निराळ्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास, **माणसाच्या अंगचें तेज ( Nervous energy ) आणि प्रजोत्पादनसामर्थ्य हीं नेहमीं व्यस्त प्रमाणांत असतात.**

हा सिद्धान्त समजण्यास **तेज** म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना आली पाहिजे प्रथम हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे कीं, आपण नेहमीं ज्याला बळ म्हणून म्हणतों तें शारीरिक बळ आणि तेज हीं अगदीं भिन्न होत. एखाद्या माणसाच्या अंगीं बळ पुष्कळ असेल, पण तेज मुळींच नसेल; आणि उलट शरिरानें बलवान् नसलेल्या माणसांत विलक्षण तेजदारपणा सांठलेला दिसेल. तसेंच कांहीं कामें अशीं असतात कीं, तीं करावयास शारीरिक बळ किंवा ताकद लागते, आणि कांहीं कामें अशीं असतात कीं, त्यांसाठीं ताकदीपेक्षां तेजाचीच गरज अधिक असते. या फरकाचें उदाहरण पाहावयाचें असल्यास शर्यतीचा घोडा आणि नांगराला जुंपलेला बैल यांची तुलना करावी. स्नायूंची ताकद पाहिली तर नांगराचा बैलच सरस ठरेल; पण शर्यतीचा घोडा म्हणजे तेजदारपणाचा मूर्तिमंत पुतळा होय.

किंवा, दुसरें उदाहरण पाहिजे असेल तर एक खानदेशी खेडवळ आणि एक मुंबईचा रहिवाशी यांच्यांतील फरक पहावा. मुंबईच्या माणसाची राहणी आणि भोंवतालची परिस्थितिच अशा कांहीं विशिष्ट स्वरूपाची असते कीं, शारीरिक

बळापेक्षा शारीरिक चलाखी आणि बुद्धीची तीव्रता यांचीच त्याला नेहमीं अधिक जरुरी भासते. उलट खानदेशांत कापूस पिकविणाऱ्या खेडवळाची राहणीच अशी असते कीं, शारीरिक किंवा बौद्धिक चलाखीची त्याला कधींच गरज लागत नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं, शहरांतील माणूस साधारणपणें अंगानें पातळच असतो; पण त्याच्या अंगीं तेज फार असतें, पण खानदेशांतील खेडवळ किंवा वऱ्हाडांतील शेतकरी अंगापिंडानें भरभक्कम, उंच, मजबूत आणि ताकदवान, असला तरी तेजाच्या नांवानें त्याच्या ठायीं वऱ्हाडांतील पाण्या-इतकाच शुकशुकाट असतो. त्याच्या एकंदर वागणुकींत ढिलेपणा दिसेल, चार-चौघांशीं बोलतांना तो आचरटपणा दाखवील, जेवण्याखाण्याच्या बाबतींतही त्याच्या मनाची तीव्र आवड नावड असणार नाहीं, आणि आगगाडीच्या एका डब्यांत चारच माणसांनीं हातपाय पसरून झोंपा घेत जागा अडविली असली तरी त्यांना दरडावून उठवून स्वतःसाठीं जागा करून घेण्यापेक्षां मुकाट्यानें उभें राहण्याचेंच तो पतकरील. यामुळेंच "खानदेशी भाऊ" किंवा "वऱ्हाडी" हे शब्दप्रयोग साधारणपणें निंदाव्यंजकच समजले जातात.

शरिराच्या कोणत्याही स्नायूचें असें आहे कीं, त्याला जर रोज काम दिलें तर त्याची शक्ति रोजच्या रोज वाढत जाते, आणि त्याला जर क्रियाहीन व सुस्त स्थितींत दिवसानुदिवस ठेविलें तर अखेर त्याच्या ठिकाणची क्रियाशक्ति पार लोपून जाते. तेजासंबधीं देखील हाच नियम आहे. माणसाच्या अंगच्या तेजाचा जर वारंवार उपयोग झाला तर तें तयार राहतें, नाहींतर हळुहळू त्याची तीव्रता कमी होत जाऊन शेवटीं तें नष्ट होतें. ज्या लोकांचा धंदा असा आहे कीं, त्यांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत शारीरिक कष्ट करावे लागतात, त्यांच्या स्नायूंनाच सारखी मेहनत पडते आणि त्यामुळें त्यांच्या अंगच्या तेजाचा उपयोग करण्याची पाळी त्यांच्यावर दिवसाकांठीं येतच नाहीं म्हटलें तरी चालेल. तेंच शारीरिक कष्टांपेक्षां बौद्धिक परिश्रम ज्यांत करावे लागतात अशा धंद्यांतील लोकांचें तेज नेहमीं वापरलें जातें व त्यामुळें त्याची सारखी वाढच होते. याचा परिणाम असा होतो कीं, पहिल्या प्रकारच्या लोकांत तेज (Nervous energy) कमी, आणि दुसऱ्या प्रकारच्या लोकांत तें अधिक असतें. आणि मनुष्याच्या अंगचें तेज व त्याचें प्रजोत्पादक सामर्थ्य हीं व्यस्त प्रमाणांत असावयाचीं असा निसर्गाचा नियम असल्यामुळें काबाडकष्ट करणाऱ्या गरीब स्त्रीपुरुषांच्या पोटीं संतति अधिक येते,

व शारीरिक श्रमांऐवजीं मेंदूनें काम करणाऱ्या श्रीमंत लोकांकडे जसजसें चढत जावें तसतसें प्रसवितेचें मान कमी कमी होत गेल्याचें आपण पाहतों. माणसाला शारीरिक कष्ट जितके अधिक पडतील तितका त्याच्याकडून मेंदूचा व्यय कमीच होत असतो, आणि मेंदूचा व्यय करणाऱ्या माणसाकडून शारीरिक श्रम कमी होत असतात.

माणसाच्या अंगीं कमीअधिक तेज असणें हें त्यास कराव्या लागणाऱ्या शारीरिक कष्टांवर अवलंबून आहे हें यावरून वाचकांस उघड झालें असेलच. या तेजाचा आणखीही इतर गोष्टींशीं संबंध पोंचतो, आणि त्या गोष्टी म्हणजेच अन्न, पाणी व हवा या होत. माणसानें खावयास योग्य असे जे पदार्थ असतात त्यांत (१) प्रोटीड्स, (२) चरबी, आणि (३) कार्बोहायड्रेट्स हीं असलीं पाहिजेत. यांपैकीं प्रोटीड्सपासून तेजाची उत्पत्ति होते असें शास्त्रज्ञांचें मत आहे. ज्यांत प्रोटीड्स नाहींत अशा अन्नावर राहणाऱ्या लोकांच्या अंगीं तेजाचा अंश अगदीं कमी असतो, आणि त्याच्या प्रसवितेचें मान फार असतें असा त्यांचा अनुभव आहे. शाकाहारापेक्षां मांसाहारामुळें मनुष्याच्या अंगीं तेज अधिक येतें अशीही बऱ्याच शास्त्रज्ञांची समजूत आहे. त्यांच्या मतें शाकाहारावर राहणारा माणूस आणि मांसाहारावर राहणारा माणूस यांच्यांतील फरक म्हणजे निम्या वेगानें आणि पुऱ्या वेगानें चालणाऱ्या वाफेच्या एंजिनांतील फरकासारखाच होय. अन्नाच्या जातीप्रमाणेंच अन्नाच्या प्रमाणाचाही तेजावर परिणाम होतो. अर्धपोटीं राहणारा माणूस आणि ताकदीबाहेर कष्ट करणारा माणूस सारखेच. दोघांतही तेजाची कमतरता असावयाची आणि प्रसविता अधिक असावयाची.

माणसाच्या अंगचें तेजाचें मान हवेवर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. थंड कोरड्या हवेनें तेजाची वृद्धि होते. मात्र अशा हवेंत अंगांतील उष्णता कायम ठेवण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या व्यायामांत त्याचा बराच व्यय होतो. थंड आणि दमट हवा तेजाच्या वृद्धीस अगदीं प्रतिकूल समजावी; आणि उष्ण आणि सरद अशा प्रकारची हवा तर अगदीं वाईट. समशीतोष्ण आणि कोरडी हवा सगळ्यांत चांगली.

सारांश, माणसाच्या अंगीं तेज चांगल्या प्रकारें असावें यासाठीं खालील गोष्टींची जरुरी आहेः—

१. बुद्धीचा उपयोग सारखा करावा लागेल अशा प्रकारची परिस्थिति.

२. परिमित शारीरिक श्रम.

३. प्रोटीड्स ज्यांत पुष्कळ आहेत अशा प्रकारचें विपुल अन्न.

४. कोरडी, समधात, लख्ख हवा.

५. प्रसन्न परिस्थिति.

माणसाच्या प्रसवितेचें त्याच्या अंगच्या तेजाशीं व्यस्त प्रमाण असतें हा मूळ नियम आहे. आणि हें तेज वर सांगितलेल्या गोष्टींवर अवलंबून असल्यामुळें त्यांचा प्रसवितेवर परिणाम होतो. म्हणूनच आम्हीं कांहीं वेळापूर्वी म्हटलें कीं, अन्न, पाणी, हवा आणि परिस्थिति हीं सुधारून समाजाची एकंदर राहणीच उच्च दर्जाची करण्याचे जर आपण प्रयत्न केले तर भावी पिढीसाठीं अधिकाधिक चांगलें बीज तयार होत जाईल; येवढेंच नव्हे तर निसर्गाच्या नियमानुसार समाजांतील स्त्री-पुरुषांची प्रसविता हलके हलके कमी होत जाईल. सुप्रजाजनन साध्य करण्यासाठीं संततिनियमनाचें फार महत्त्व आहे. तेव्हां अन्नपाणी, हवा, परिस्थिति, शिक्षण इत्यादि सर्व गोष्टींची सुधारणा केल्यानें अप्रत्यक्षपणें संततिनियमन होऊन चांगल्या प्रजाबीजाचीही तयारी होत असल्यास या प्रतिबंधक कार्याकडेही बरेंच लक्ष पुरावणें अतिशय अगत्याचें आहे.

देशांतील प्रत्येक शहरांतील आणि खेड्यांतील लोकांस निर्दोष अन्न व पाणी मिळेल यासाठीं कोणत्या उपायांची योजना केली पाहिजे तें येथें विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. पाश्चात्य देशांत कांहीं ठिकाणीं अन्नपुरवठ्याचें सरकारी खातें सुरू करण्यांत आलें असून त्यामुळें पुष्कळ फायदा होतो असा अनुभव आहे. तसें खातें आपल्याकडे सुरू करण्याचा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. हवेच्या व आरोग्याच्या बाबतींतही विस्तृत विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. प्रत्येक शहरांतील म्युनिसिपालिटी लोकांच्या आरोग्यरक्षणासाठीं झटतच आहे, आणि इस्पितळासारख्या संस्था चालवून सरकारही आपलें यासंबंधाचें कर्तव्य थोडेंफार बजावीत आहे. तसेंच शहरोशहरीं आरोग्यमंडळें स्थापण्याची आवश्यकता लोकांस आतां पटूं लागली आहे. मात्र आरोग्यसंरक्षणाचें काम शहराइतकेंच खेड्यापाड्यांतही व्हावयास पाहिजे व त्यासाठीं पाश्चात्य देशांतल्याप्रमाणें ठिकठिकाणीं आरोग्यशाखा (Welfare centres) स्थापन झाल्या पाहिजेत. शिवाय या हवेच्या व आरोग्याच्यासंबंधानें एक अतिशय महत्त्वाची कल्पना लोकांपुढें

मांडण्यासारखी आहे. ती ही कीं, खेडीं सोडून शहरांत रहावयास जाण्याची प्रवृत्ति लोकांनीं हळुहळू टाकली पाहिजे.

मोठमोठया शहरांची कितीही सुधारणा झाली तरी गरीब लोकांस तेथें उत्तम हवापाणी मिळण्याचा संभव कमीच राहणार. शहरांतील सुखसोयींचा लाभ बहुतांशीं श्रीमंतांनाच होतो. त्या सुखसोयींसाठीं लागणारे पैसे गरिबांच्या घरांतून कराच्या रूपानें घेतले जातात येवढाच त्यांना त्याचा लाभ ! मुंबईंतले उत्तमोत्तम रस्ते कोणत्या भागांत आहेत, उत्तम पाणी पुरवठा कोणत्या लोकांना होतो, किंवा हँगिंग गार्डनसारख्या बागबगीचांचें सुख मुख्यतः कोणाला उपभोगतां येतें, हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां आमचें म्हणणें वाचकांस सहज समजेल. या स्थितीबद्दल अमुक एका वर्गाला दोष द्यावयासाठीं आम्ही हें लिहितों असें नव्हे; तर अशी स्थिति उत्पन्न होणें अपरिहार्यच असतें असें आम्हांस वाटतें. शहराचा कारभार ज्यांच्या हातीं असतो ते कितीही सुशिक्षित आणि उदार बुद्धीचे असले तरी श्रीमंत लोकांच्या बरोबरीनें गोरगरिबांस हवापाण्याचें सुख प्राप्त करून देणें त्यांस कठीण आहे असें म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे. म्हणूनच आम्ही म्हणतों कीं, शहरांत आपल्या आरोग्याची उत्तम तरतूद होईल अशी अपेक्षा करण्यापेक्षां जेथें ती तरतूद निसर्गानें बऱ्याच अंशानें केलेलीच असते अशा खेडेगांवांतच पोटाचा धंदा करण्यास लोकांनीं शिकलें पाहिजे. या बाबतींत महात्मा गांधी आज कित्येक वर्षे जनतेस जो उपदेश सतत उच्च रवानें करीत आहेत तो आम्ही अत्यंत मोलाचा समजतों. शहरांतील यांत्रिक कारखान्यांत मजुरी करून मिळकतीच्या भ्रामक कल्पनेपायीं आपल्या शरिराची आणि संसाराची नासाडी करून घेण्यापेक्षां खेड्यांत शेतीभाती करून आणि खादीची पैदास करून राहण्यास लोक शिकतील तर गांधींच्या समजुतीप्रमाणें स्वराज्य जवळ येईल, आणि आमच्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें बोलावयाचें झाल्यास सुप्रजाजनन सहजसाध्य होईल.

यांत्रिक शोधांमुळें गिरण्या व कारखाने अस्तित्वांत येऊनच बहुतेक मोठमोठ्या शहरांची वसाहत झालेली आहे. गिरण्या व कारखाने उभे राहिले कीं त्यांच्या मागोमाग कामकरी लोकांचा वर्ग अस्तित्वांत येतोच, आणि मग त्याच्या मागोमाग अपुरे पगार, धांदलीचे संसार, व्यसनांचा बुजबुजाट, गलिच्छ वस्ती या साऱ्या गोष्टी यावयाच्याच. अशा परिस्थितींत जन्मसंख्येचें प्रमाणही भराभर वाढत

जातें आणि त्यामुळें मृत्युसंख्येचे आंकडेही फुगत जातात. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं इंग्लंडमध्यें कारखाने निघावयास लागले आणि घरबसल्या होणारे धंदे बुडाले. कामकरीवर्गावर याचा फार वाईट परिणाम झाला, आणि त्यांची राहणी अधिकाधिक कष्टमय व्हावयास लागली. बायका गिरण्या कारखान्यांतून मजुरी करावयास लागल्या. या सर्व प्रकाराचा इंग्लंडच्या जन्मसंख्येच्या प्रमाणावर जो परिणाम झाला त्याचें वर्णन करतांना **निटी** नांवाचा लेखक म्हणतो, "इतर देशांप्रमाणें इंग्लंडांतही पुरुषाच्या अपुऱ्या मजुरींत भर टाकण्यासाठीं बायका आणि मुलें काम करून मजुरी मिळवावयास लागलीं. त्यामुळें एखाद्या माणसाला जितकीं मुलें अधिक तितका त्याच्या घरांत मजुरीचा पैसा अधिक येणार असा हिशेब व्हावयास लागला, आणि कामकरी वर्गाकडून प्रजोत्पत्ति बेसुमार व्हावयास लागली." इंग्लंडमधील या प्रकारासारखाच प्रकार आज जपानमध्यें होत आहे. युरोपिअन व अमेरिकन यंत्रांचा प्रसार या देशांत अतिशय झपाट्यानें होत असून त्यामुळें घरगुती धंदे नामशेष होत चालले आहेत, आणि असंख्य स्त्रीपुरुषांची व लहान पोरासोरांची गिरणीकामगार म्हणून शहरांत भरती होत आहे. यासंबंधीं **लॅफकॅडिओ हर्न** नांवाचा लेखक म्हणतो कीं, "कामगारांच्या हिताचें रक्षण करणारे कायदे जपानांत नसल्यामुळें कारखानदारींचे सर्व भयंकर दुष्परिणाम तेथें दिसूं लागले आहेत." आपल्या विषयाच्या दृष्टीनें महत्त्वाचा जो परिणाम तो हा, कीं जपानमध्यें जन्मसंख्येचें प्रमाण वाढत आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं तें प्रमाण दर हजारीं २५·८ होतें आज ३१·९ आहे. इंग्लंडसारख्या पाश्चिमात्य देशांत आणि जपानसारख्या पौर्वात्य देशांत यांत्रिक सुधारणेचे जे परिणाम झाले व होत आहेत ते आपल्या देशांतही घडणें अगदीं साहजिक आहे. यासाठीं शहरांतील पैशाच्या मायावी मोहाला न भुलतां खेड्याच्या निर्मळ हवेंतच राहण्याची आवड लोकांच्या मनांत अधिकाधिक उत्पन्न झाली पाहिजे; म्हणजे प्रसवितेच्या प्रमाणावर पर्यायानें दाब बसून सुप्रजाजननाच्या दृष्टीनें एक महत्त्वाचें प्रतिबंधक कार्य आपोआप होईल.

प्रत्येक शहरांत आणि खेड्यांत अन्नपाणी व हवा यांसंबंधीं विशेष काळजी घेतली जाऊन आरोग्याची सुधारणा झाली पाहिजे हें जितकें आवश्यक आहे तितकेंच प्रत्येक कुटुंबांत आरोग्याविषयीं विशेष दक्षता राखली गेली पाहिजे हेंही अगत्याचें आहे. किंबहुना ही दुसरी गोष्ट घडल्यानें पहिली घडणें अधिक सुलभ होईल. प्रत्येक कुटुंबांतील पतिपत्नींनीं आपला संसार अत्यंत टापटिपीचा आणि

स्वच्छ ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे व सर्व भौतिक सुखांत आरोग्याचें सौख्य उत्कृष्ट समजलें पाहिजे. सर्वसाधारण आरोग्यापेक्षां एका विशिष्ट विषयांतील आरोग्याचें महत्त्व सर्व पतिपत्नींच्या मनावर पूर्ण बिंबलेलें असलें पाहिजे. तो विषय म्हणजे संभोग होय. संभोगविषयक स्वच्छता किती अगत्याची आहे त्याची परिपूर्ण कल्पना प्रत्येक स्त्री-पुरुषास असेल तर त्यापासून समाजाचें अपरिमित कल्याण होईल. पहिल्या भागाच्या शेवटच्या प्रकरणांत आम्हीं म्हटलेंच आहे कीं, संभोग ही एक अंधारांत कशीबशी झटकन् चोरटेपणानें उरकण्याची गोष्ट अशी जी समजूत आपल्या बहुजनसमाजांत सर्वत्र दिसून येते ती अत्यंत हानिकारक होय. या समजुतीच्या दुष्परिणामांपैकीं एक दुष्परिणाम हा आहे कीं, संभोगविषयक स्वच्छता कशी राखावी याची कल्पना पतिपत्नींस क्वचितच असते. संभोगविषयाची चर्चाच मुळीं ज्या ठिकाणीं सर्वथैव निषिद्ध त्या ठिकाणीं संभोगाच्या वेळीं कोणत्या प्रकारची स्वच्छता बाळगणें विशेष जरुरीचें आहे याचा विचार कोणीच करीत नसल्यास नवल नाहीं. त्यामुळें अनेक प्रकारच्या व्याधींना स्त्रीपुरुष बळी पडतात. हा प्रकार टाळणें अतिशय जरुरीचें आहे व त्यासाठींच संभोगविषयक स्वच्छतेचें शिक्षण सर्व पतिपत्नींस मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

संभोगविषयक स्वच्छतेच्या सदराखालीं येणाऱ्या गोष्टींपैकीं एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरुषांकडून एकपत्नीव्रताचें आणि स्त्रियांकडून एकपतिव्रताचें परिपालन होय. पुरुषानें एकापेक्षां अधिक स्त्रियांशीं संबंध ठेवणें हें नीतीच्या व धर्माच्या दृष्टीनें पापाचरण ठरतें यांत शंकाच नाहीं; पण ज्यांना धर्मनीतीचीं बंधनें बुद्धीला पटल्याशिवाय ग्राह्य मानावींशीं वाटत नसतील त्यांनीं हें लक्षांत घ्यावें कीं, अशा संबंधामुळें इंद्रियविषयक आरोग्य बिघडल्यावांचून रहात नाहीं, आणि हें आरोग्य स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या बाबतींत एकदां बिघडलें, कीं त्याचे दुष्परिणाम केवळ त्यांचे त्यांसच नव्हे तर त्यांच्या मुलांबाळांसही भोगावे लागतात.

सुप्रजाजनन साध्य करण्यासाठीं आवश्यक असलेलें प्रतिबंधक कार्य कशा स्वरूपाचें असावें याचा विचार करतांना हवा, अन्नपाणी व आरोग्य यांविषयीं आम्हीं येथवर चर्चा केली. पण प्रकरणाच्या प्रारंभीं आम्हीं सुचविल्याप्रमाणें लोकांची परिस्थिति सुधारण्याच्या या प्रतिबंधक कार्यांत त्यांना द्यावयाच्या शिक्षणाचा देखील अंतर्भाव होतो. अर्थात् या ठिकाणीं 'शिक्षण' या शब्दानें नेहमींच्या शाळा कॉलेजांतील पुस्तकी शिक्षणाचा निर्देश आम्ही करीत आहोंत असें वाचकांनीं

समजूं नये. 'शिक्षण' हा शब्द या ठिकाणीं आम्ही अत्यंत व्यापक अर्थानें, स्त्री-पुरुषांच्या मनाला लागणारें वळण या अर्थीं, योजीत आहोंत. याविषयीं थोडीशी चर्चा मागें चवदाव्या प्रकरणांत आलीच आहे; पण त्या ठिकाणीं सुप्रजा-जननाच्या विधायक अंगाविषयीं आम्ही विचार करीत होतों त्यामुळें ज्या कांहीं गोष्टींचें प्रतिपादन किंचित् असंबद्ध वाटेल या भीतीनें आम्हीं केलें नाहीं, त्यांचा उल्लेख या प्रतिबंधक कार्याविषयींच्या विवेचनांत करतां येईल असें वाटतें.

कुप्रजाजननाचा संभवच कमी करण्याचें प्रतिबंधक कार्य करण्याच्या बाबतींत आम्हांस एक महत्त्वाची सूचना करावीशी वाटते ती ही कीं, लोकांना आपण हळुहळू अशा प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे कीं, त्या योगानें आज स्त्री-पुरुषांच्या मनांत परस्परांविषयीं ज्या भावना आहेत, त्या अजीबात नाहींशा होऊन त्यांच्या जागीं अधिक उदात्त व पवित्र भावना उत्पन्न होतील. आजची स्थिति अशी आहे कीं, पुरुष व स्त्री एकत्र आलीं कीं, त्यांच्या मनांत एका विशिष्ट प्रकारची लालसा चट्दिशीं उत्पन्न होते. परमेश्वरानें स्त्रीपुरुषास निर्माण करतांनाच अशी कांहीं विलक्षण योजना केली आहे, कीं परस्परांस परस्परांविषयीं आकर्षण वाटावें. परंतु हें आकर्षण एका विशिष्ट संकुचित स्वरूपाचें असावें असा त्याचा मूळ हेतु खाचित नाहीं. या गोष्टीविषयीं थोडा सूक्ष्म विचार केला तर असें दिसतें कीं, स्त्रीपुरुषांस परस्परांच्या दर्शनानें जें सौख्य निसर्गतः होतें तें अत्यंत शुद्ध स्वरूपाचें असतें. स्त्रीस पुरुषाच्या सान्निध्यानें किंवा पुरुषास स्त्रीच्या सहवासांत जें सुख व्हावें अशी निसर्गाची योजना आहे तें एका विशिष्ट इंद्रियाच्या द्वारेंच होण्यासारखें क्षणिक स्वरूपाचें नसतें. दृष्टि, शब्द, स्पर्श, गंध या सर्व प्रकारांनीं स्त्री-पुरुषांस परस्परांपासून आनंदाचा उपभोग घेतां येईल, आणि हा आनंद अत्यंत शुद्ध स्वरूपाचा असूं शकेल. दोन सुंदर पुरुष एकमेकांस भेटले असतां ते एकमेकांच्या सहवासाचा उपभोग कसा घेतात? परस्परांच्या स्वरूपाकडे पाहून दृष्टिसुख अनुभवणें, एकमेकांचे मधुर शब्द ऐकून श्रवणसुख अनुभवणें, हस्तसंमीलनानें किंवा इतर प्रकारें स्पर्शसुखाचा अनुभव घेणें अशा रीतीनेंच ते सहवासाच्या आनंदाचा आस्वाद घेत नाहींत काय? मग हीच गोष्ट स्त्री पुरुषांच्या भेटींत घडावयास कोणती हरकत असावी? स्त्री व पुरुष एकत्र आलीं असतां त्यांच्या मनांत एकदम कुविचारच उत्पन्न व्हावेत असा

निसर्गाचा मूळ हेतु मुळींच नाहीं. लिंगभेदामुळें जें आकर्षण वाटावयाचें तें अत्यंत विस्तृत स्वरूपाचें असतें. एक लहान मुलगा आणि एक लहान मुलगी एकटीं एकत्र राहिलीं तर तीं एकमेकांच्या सहवासापासून सुखाचा अनुभव कसा घेतात तें आमच्या वाचकांनीं कधीं मुद्दाम लक्ष लावून पाहिलें असल्यास आमचें म्हणणें त्यांस चटकन् पटेल. अशा प्रकारें मुलगा व मुलगी एकत्र आलीं तर तीं दोघें एकमेकांविषयीं कोणत्याही तऱ्हेची कामुक वृत्ति न ठेवतां सहवासाच्या आनंदांत रममाण होतात. अशी कामुकताशून्य वृत्ति मोठ्या स्त्री-पुरुषांच्या मनांतही असावयास कोणती हरकत आहे! निसर्गतः ती असावयाची; पण आपण आपल्या सामाजिक चालीरीतीच अशा कांहीं विलक्षण प्रकारच्या बनवून टाकल्या आहेत कीं, त्यांच्या योगानें ती जवळ जवळ समूळ नष्ट झाली आहे. स्त्रीपासून पुरुषास एका विशिष्ट तऱ्हेचाच सुखानुभव घेतां येणें शक्य आहे अशी एक गलिच्छ समजूत आपल्या समाजांत इतकी दृढमूल होऊन बसली आहे, कीं एखादी स्त्री व एखादा पुरुष एकत्र दिसलीं, कीं लोक चट्कन् घाणेरडा संशय घेतात, इतकेंच नव्हे तर स्वतः त्या स्त्री-पुरुषांच्या मनांतही एकांत मिळाल्याबरोबर भलत्या कल्पना सहजासहजीं येतात. याचें कारण आपल्या समाजांतील सदोष चालीरीति आणि स्त्रीजातीविषयींच्या गलिच्छ कल्पना. आपल्या समाजांत पांच सहा वर्षांपर्यंत मुली मुलांमध्यें स्वच्छंदानें मिसळूं शकतात; पण मुलगी दहा बारा वर्षांची झाली, कीं लगेच तिचीं वडील माणसें तिला मुलांची संगति टाळण्याची सक्त ताकीद देतात. ज्या मुलांच्या घोळक्यांत ती बालपणापासून खेळली बागडली असेल त्यां मुलांतदेखील मिसळण्याची तिला मनाई होते. मोठ्यांदा बोलण्याची तिला परवानगी उरत नाहीं, मोठ्यांदा हांसण्याची तिला सोय रहात नाहीं, मोठ्यांदा चालण्याचा परवानादेखील तिच्या बाबतींत रद्द होतो. 'स्‌ ! मुलींनीं असं करूं नये !' हा मंत्र तिच्या कानीं कपाळीं सारखा पडतअसतो. या प्रकाराचे दोन दुष्परिणाम होतात.

पहिला दुष्परिणाम हा कीं, तरुण स्त्रीपुरुषांच्या संमेलनावर एक प्रकारचा बहिष्कारच पडल्यामुळें त्यांस परस्परांचा सहवास ही एक सामान्य गोष्ट वाटण्याऐवजीं त्या गोष्टीस एक प्रकारची असामान्यता प्राप्त होते. ज्या समाजांत तरुण स्त्री-पुरुष एकमेकांशीं मनमोकळेपणानें वाटेल तितकीं मिसळूं शकतात तेथें एखाद्या पुरुषाची व स्त्रीची एकांतीं गांठ पडली तरी कामुकताशून्य वृत्तीनें तीं एकमेकांशीं

तासचे तास विनोदपरिहास करूं शकतात आणि एकमेकांच्या सहवासापासून उद्भवणाऱ्या निर्मल आनंदाचा नेत्रश्रवणादि इंद्रियांच्या द्वारें मनसोक्त उपभोग घेऊं शकतात. परंतु तेंच आपल्या समाजांत तरुण स्त्री-पुरुषांचा स्नेह व समागम उंबराच्या फुलाहूनही दुर्मिळ असल्यामुळें एखाद्या तरुण पुरुषाच्या अनुभवास एखाद्या तरुणीच्या अंगाचा स्पर्श किंवा मनमोकळा नेत्रकटाक्ष तर दूरच राहिला; पण नुसत्या पदराचा जवळचा वाराही आला तरी त्याची वृत्ति एकदम बावरून जाते. स्त्री-पुरुषांना एकमेकांच्या संभाषणापासून, एकमेकांच्या मुग्ध सान्निध्यापासून, अगर एकमेकांच्या स्पर्शापासून शुद्ध आनंदाचा उपभोग घेता येतो ही कल्पनाच मुळीं आमच्या समाजानें चार हात लांब राखलेली ! स्त्रीसहवास हा एका विशिष्ट स्वरूपाचाच असतो आणि स्त्रीपासून पुरुषास जें सुख मिळावयाचें तें एका विशिष्ट रीतीनेंच घेतां येतें, असल्या सर्वथैव भ्रामक कल्पनेला आमच्या समाजानें घट्ट मिठी मारलेली ! त्यामुळें स्त्री मोकळेपणानें वागूं लागली, कीं आमच्या समाजाच्या वातावरणांत राहिलेला तरुण लगेच भ्रमतो. याचें एक मोठें लक्षांत ठेवण्यासारखें उदाहरण आमच्या ऐकण्यांत आहे. एक हिंदु विद्यार्थी इंग्लंडमध्यें अभ्यासासाठीं गेला असतां तेथें एका घरंदाज कुटुंबांत राहूं लागला. त्या कुटुंबांत एकवीस वर्षांची एक तरुण सुंदर व अविवाहित मुलगी होती. थोड्या दिवसांनीं त्या विद्यार्थ्याची व त्या मुलीची बरीच ओळख झाल्यावर एके दिवशीं रात्रींच्या भोजनानंतर हा विद्यार्थी एका कोचावर आरामानें पडला असतांना ती मुलगी एकदम धांवत धांवत त्याच्याजवळ आली आणि त्याच्या पुढें हातवारे करीत म्हणाली, "अरे लुच्चा ! थांब तुला दोन ठोंसे देऊन तुझी अशी गठडी वळून तुला फेंकून देते ! चल ये असा पुढें ! कर दोन हात !"

असें म्हणत त्या मुलीनें आपल्या लुसलुशीत गोंडस हातांनीं त्या विद्यार्थ्याच्या अंगाभोंवतीं विळखा घातला. त्याबरोबर हिंदु समाजाच्या वातावरणांत लहानाचा मोठा झालेल्या त्या विद्यार्थ्यानें त्या मुलीच्या वर्तनाचा विपरीत अर्थ करून हलक्या आवाजांत म्हटलें, "स ! स ! इथें आतां नको ! मग ! मग !

हे अनपेक्षित उद्गार ऐकतांच ती मुलगी आश्चर्यानें व रागानं थक्क झाली, आणि रागाच्या भरांत तिनें त्या विद्यार्थ्याच्या खाड्दिशीं श्रीमुखांत दिली.

हें उदाहरण या ठिकाणीं आम्हीं दिलें याचा योग्य तोच अर्थ वाचक करतील

अशी आमची खात्री आहे. स्त्री-पुरुषांचा मनमोकळा व्यवहार म्हणजे एक असामान्य कोटींतील गोष्ट होऊन बसल्याकारणानें त्यास वाजवीपेक्षां भलताच अर्थ आमच्या समाजांत कसा प्राप्त झाला आहे तें दाखविण्यासाठींच केवळ ही वरील हकीगत आम्हीं वाचकांच्या नजरेस आणली.

आपल्या सामाजिक चालीरीतींचा दुसरा दुष्परिणाम असा कीं, स्त्री ही पुरुषापेक्षां कमी दर्जाची, पुरुषाची नोकरी चाकरी करण्याकरितांच केवळ जन्मास आलेली, आणि पुरुषाच्या उपभोगासाठींच केवळ परमेश्वरानें निर्माण केलेली होय ही कल्पना पुरुषांच्याच नव्हे तर स्वतः स्त्रियांच्याही मनामध्यें पुरी रुजलेली असते. अगदीं लहानपणापासून मुलींच्या मनावर असे कांहीं संस्कार घडत असतात कीं, आपण पुरुषांच्या बरोबरीच्या नसून केवळ हरप्रकारें त्यांच्या उपयोगी पडण्यासाठीं आपला जन्म आहे असें त्यांना पदोपदीं वाटावें. एकाद्या घरांत मुलगा व मुलगी असलीं म्हणजे त्या मुलाचा सारा दंगा व हट्ट सहन करण्यांत येतो; एवढेंच नव्हे तर त्याची प्रशंसाही अनेक वेळां होते; पण उलट मुलीनें जरा गडबड केली कीं, तिला गप्प बसविण्यांत येतें, आणि त्यावर कधीं तिनें उलट प्रश्न करून आपल्या भावाचें उदाहरण दिलें तर त्या उद्दामपणाबद्दल तिची निर्भर्त्सना होऊन "तो मुलगा आहे. त्याची गोष्ट निराळी !" असें ठरीव उत्तर तिला मिळतें. अशा प्रकारें अगदीं बालपणापासून स्त्रीपुरुषांच्या दर्ज्यांतील भेद मुलांच्या मनावर ठसत जातो; आणि पुरुषांची समजूत अशी होत जाते, कीं, स्त्रियांपासून फक्त एका विशिष्ट सुखाचाच लाभ घेणें शक्य आहे. स्त्रियांविषयीं कामुकतेखेरीज दुसरी कोणती वृत्ति असणें शक्यच नाहीं असें पुरुषांस वाटतें.

ही स्थिति पार बदलली पाहिजे. लहान मुलांना वाढविण्याची सध्यांची पद्धति अत्यंत अनिष्ट असून तिच्यांत मूलतः सुधारणा झाली पाहिजे. मुलगे व मुली समान दर्ज्यानें परस्परांशीं बोलतील-चालतील आणि खेळतील-उनाडतील असें केलें पाहिजे. स्त्री-पुरुषांचे व्यवहार अधिक मोकळेपणानें झाले पाहिजेत. कामुकतेखेरीज दुसरी अत्यंत शुद्ध व निर्मल अशी स्नेहाची वृत्ति मनांत वागवून पुरुषांनीं स्त्रियांशीं वागावयास शिकलें पाहिजे. गुलाबाचें फूल दृष्टीस पडलें तर तें खुडून घ्यावयाची इच्छा न करतां त्याच्या सौंदर्याचा उपभोग घ्यावयास पुरुषांनीं शिकलं पाहिजे. अशा प्रकारचें वळण स्त्री-पुरुषांच्या मनास मिळत गेलें म्हणजे स्त्री पुरुषांचे

परस्पर व्यवहार कितीही मनमोकळे झाले तरी त्यांच्या मनांत कुविचार येणार नाहींत. परस्परांच्या सहवासापासून घ्यावयाचा आनंद एका विशिष्ट मार्गानेंच नव्हे तर नेत्रश्रोत्रादि अनेक मार्गांनीं घ्यावयाची सुंदर कला स्त्री-पुरुषांस अवगत होईल. आणि कुमार्गाची मूळ प्रवृत्तिच अशा प्रकारें बोथट होऊन स्त्री-पुरुषांच्या मनमोकळ्या संमीलनापासून प्राप्त होणारे सर्व फायदे समाजास मिळतील, आणि यामुळें सुप्रजाजननविषयक प्रतिबंधक कार्यास पर्यायानें मदत झाल्यावांचून राहणार नाहीं.

# प्रकरण नववें

सुप्रजाजनन साध्य करण्यासाठीं कनिष्ठ व सदोष बीजाच्या स्त्रीपुरुषांच्या संततीस प्रतिबंध करणें कां आवश्यक आहे व कसें शक्य आहे तें आपण पाहिलें. निरनिराळ्या प्रकारच्या रोगांनीं ग्रासलेल्या पतिपत्नींस संततिहीन ठेवण्याचें कार्य किती महत्त्वाचें आहे हें वाचकांच्या ध्यानांत आतां आलेंच असेल; परंतु रोग-पीडितांची **प्रसविता** नाहींशी करणें जितकें जरुरीचें आहे तितकेंच अशा रोग-पीडितांस शक्य असल्यास रोगविमुक्त करणेंही अगत्याचें समजलें पाहिजे. सुप्रजा-जननांत तीन गोष्टींचा समावेश होतो. [१] समाजांत जेवढें उत्तम प्रजाबीज असेल त्याची जोपासना आणि वाढ करणें, [२] समाजांतील दूषित प्रजाबीजाच्या परंपरेस आळा घालणें, आणि [३] शक्य तितकें असलें दूषित प्रजाबीज शुद्ध करून घेणें. यांपैकीं पहिल्या दोन्ही कार्यांचा विचार आपण येथपर्यंत यथावकाश केला. आतां उरलेल्या तिसऱ्या कार्याचा या प्रकरणांत विचार करूं.

रोग आणि व्यसनें यांचा उल्लेख प्रकरणाच्या मथळ्यांत आम्हीं समुच्चयानें केला आहे; त्याचें कारण चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत ताबडतोब येईल. रोग-पीडितांस रोगविमुक्त करण्याच्या कार्याचा आपण विचार करूं लागलों कीं, रोग उद्भवतात तरी कां असा प्रश्न साहजिकपणेंच आपल्यापुढें उभा राहतो; आणि नाना प्रकारचीं व्यसनेंच नाना प्रकारच्या रोगांस कारणीभूत होतात असेंच त्या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागतें. इतर रोगांची गोष्ट बाजूला ठेवून ज्या रोगांस गुह्य रोग (Venereal diseases) अशी संज्ञा आहे त्यांचा तरी उद्भव व्यसनां-पासूनच होतो याविषयीं बिलकुल संशय नाहीं. इंद्रियविषयक गुह्य रोग जालीम प्रकारचे असतात. त्यांचा प्रसारही संसर्गानें झपाट्यानें होतो, आणि प्रजाबीज ज्या स्थलीं असावयाचें किंवा रुजावयाचें त्या स्थलाशींच त्यांचा संबंध असल्या-मुळें त्यांपासून भावी प्रजेवर “मूले कुठारः” या न्यायाचा प्रहार होण्यासारखा असतो. अर्थात् सुप्रजाजननाच्या दृष्टीनें या रोगांचें निर्मूलन करणें हें एक अत्यंत महत्त्वाचें प्रतिबंधक (Preventive) कार्य ठरतें; आणि या रोगांची उत्पत्ति व प्रसार व्यसनांच्या द्वारेंच होत असल्यामुळें त्या व्यसनांचा नायनाट करण्याचें कार्य हातीं घेणेंच सर्वांत अगत्याचें होय.

सुप्रजेचा घात करणाऱ्या व्यसनांत वेश्यागमन व मदिरापान हींच सर्वांत अग्रगण्य होत. या दोन व्यसनांनीं आपल्या देशाला किती ग्रासलेलें आहे त्याची कल्पना वाचकांस करून द्यावयासाठीं आम्हीं त्याचें येथें विस्तारानें वर्णन केलें पाहिजे असें नाहीं. कोनाकोंपऱ्यांतील खेड्यापाड्यांपर्यंत या दोन्ही व्यसनवृश्चिकांनीं आपल्या नांग्यांचे फटकारे मारलेले आहेत आणि मुंबई, कलकत्ता अशा शहरांत तर यांचें विष कल्पनातीत भिनलेलें आहे. उदाहरणार्थ, मुंबई शहराची स्थिति कशी आहे तें क्षणभर पाहूं. या शहरांत दारूबाजी किती भयंकर प्रमाणावर चालते तें वाचकांस स्थूल मानानें माहीत असेल. वेश्यांचा भरणा या शहरांत केवढा आहे तें खालील आंकड्यांवरून कळेल. कांहीं वर्षांपूर्वीं मुंबई शहरांत वेश्यांची संख्या अतिशय वाढली आणि प्रतिष्ठित लोकांच्या ऐन वस्तींत त्यांचीं बिऱ्हाडें शिरूं लागलीं; तेव्हां त्यांच्याविरुद्ध लोकांनीं खूप ओरडा केला. त्याचा परिणाम होऊन या प्रश्नाची सांगोपांग चवकशी करण्याकरितां जी कमिटी (Prostitution Committee) बसली तिच्या रिपोर्टांतून पुढील आंकडे घेतले आहेत.

## मुंबईतील वेश्यांची संख्या

| वेश्यांची जात | कुंटणखाने | वेश्यांची संख्या |
|---|---|---|
| जपानी | ३४ | ८० |
| युरोपियन | २० (युरोपियन, युरेशियन, मॉरिशियन, बगदादी ज्यू मिळून) | २८ |
| युरेशियन | | २३ |
| मॉरिशियन | | ५ |
| बगदादी ज्यू | | ३३ |
| हिंदी | ८३१ | ५००० |

एकंदर ५१६९

मुंबईच्या पोलिस कमिशनरनीं प्रसिद्ध केलेले हे आंकडे आहेत. मुंबई शहरांतील वेश्यांच्या वस्तीला खुल्या असलेल्या भागांत फिरून ही माहिती मिळविलेली आहे, पण ज्या वस्तींत वेश्यांस प्रतिबंध आहे अशा ठिकाणीं देखील त्यांचे धंदे चोरून मारून चाललेच असतात. असल्याही ठिकाणची माहिती मिळवून ते आंकडे हिशोबांत घेतले तर वेश्यागमनाचें जें प्रमाण दिसून येईल तें पाहतांच छाती दडपल्याखेरीज राहणार नाहीं.

ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे यांत संशय नाहीं, आणि या व्यसनाचा पाश सुटल्याखेरीज सुप्रजाजननाच्या मार्गांतील एक मोठी धोंड नाहींशी होणार नाहीं यांतही संशय नाहीं. वर दिलेल्या आंकड्यासारखे आंकडे पाहिले म्हणजे उत्पन्न होणाऱ्या विषादाच्या पहिल्या आवेगांत असा विचार मनांत येतो, कीं एका जबर कायद्याच्या तडाक्यानें वेश्यावृत्ति व वेश्यागमन हे गुन्हे ठरवून त्यांस भयंकर शिक्षा ठरवून टाकाव्यात म्हणजे या सुप्रजाघातक प्रकाराचा एकदम नायनाट होईल. परंतु या विषयासंबंधीं अशी जहाल वृत्ति धारण करून चालेलसें वाटत नाहीं. वेश्यागमन सर्वस्वीं नष्ट झालें तर राष्ट्राचा अपरिमित फायदा होईल व सुप्रजाजनन अधिक साध्य होईल याविषयीं संदेह नाहीं. परंतु "झालें तर" ही ही अट फार मोठी आणि अनुल्लंघनीय आहे. कारण, मनुष्यस्वभाव जोंपर्यंत आहे तसा आहे तोंपर्यंत वेश्यावृत्ति अजीबात नाहींशी करणें अशक्य आहे. ज्या ज्या विद्वानांनीं या गोष्टीचा सांथपणें विचार केला आहे, व आतांपर्यंत निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या प्रसंगीं या गोष्टीवर अभिप्राय देण्यासाठीं तज्ज्ञ मंडळींच्या ज्या ज्या कमिट्या बसल्या आहेत त्या सर्वांचें मत असेंच पडलें आहे, कीं कायद्याच्या सक्तीनें वेश्यांची संस्था एकदम नाहींशी करणें अशक्य आणि असमंजसपणाचें होय. ज्यांचीं लग्नें झालेलीं नाहींत, ज्यांना घरदार नाहीं, ज्यांना कांहीं विशिष्ट कारणानें विवाह अशक्य आहे,-सारांश, मनुष्याला आवश्यक असणारें संभोगसौख्य कायदेशीर व शास्त्रोक्त मार्गांनीं घेतां येणें ज्या लोकांस अशक्य आहे त्यांस सारा जन्म संभोगरहित घालवावयास सांगणें सुज्ञपणाचें व न्यायाचें होणार नाहीं; आणि तें तसें आहे असें वादासाठीं गृहीत धरलें तरी असल्या उपदेशाचीं बंधनें तोडल्याखेरीज मनुष्यस्वभाव राहणार नाहीं.

मात्र वेश्यागमनाचा नायनाट करणें अशक्य असलें तरी त्याचें प्रमाण सपाटून

कमी करणें शक्यही आहे आणि अतिशय अगत्याचेंही आहे. म्हणून या दृष्टीनें आपल्याला कोणकोणते उपाय योजितां येतील तें थोडक्यांत पाहूं.

या बाबतींत कायद्याची सक्ति करूं पाहणें सुज्ञपणाचें होणार नाहीं असें आम्हीं वर म्हटलेंच आहे. सुप्रजाजननासाठीं झटणाऱ्या लोकांनीं या बाबतींत लोक-शिक्षणावरच भर दिला पाहिजे. वर्तमानपत्रें, मासिकें, ग्रंथ, व्याख्यानें वगैरे लोक-जागृतीच्या सर्व साधनांचा उपयोग करून वेश्यागमनाच्या भयंकर परिणामाविषयीं लोकांच्या मनाची इतकी खात्री केली पाहिजे, कीं त्या व्यसनाविषयींची प्रवृत्तिच त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न होणार नाहीं किंवा उत्पन्न झाल्याबरोबर मारली जाईल. व्यसनविषयाचे दुष्परिणाम लोकांच्या मनावर ठसविल्यानें ते त्यापासून परावृत्त होतील अशी आशा करणें वेडेपणाचें होय असें आमचे वाचक या ठिकाणीं कदाचित् म्हणतील, आणि दारूच्या भयंकरपणाविषयीं शेंकडों व्याख्यानें, कादंबऱ्या आणि नाटकें झालीं तरी दारूबाजी कमी झाली नाहीं हें उदाहरणा-दाखल सांगतील; पण ही विचारसरणी वर वर दिसावयास ग्राह्य दिसली तरी तर्कदृष्ट्या ती सर्वस्वीं निर्दोष समजतां येणार नाहीं. व्याख्यानें आणि लेख या साधनांनीं व्यसनाच्या दास्यांत सर्वस्वी रुतलेल्या लोकांचा उद्धार होणार नाहीं हें आम्हांसही कबूल आहे; परंतु कोणत्याही व्यसनाची गोष्ट अशी असतें, कीं कांहीं लोकांनीं त्या व्यसनकूपांत आधींच उडी घेतलेली असते व त्यांस वर काढणें सर्वस्वीं अशक्य असतें, पण बरेचसे लोक असे असतात, कीं ते कूपाच्या कांठा-पाशीं उभे असतात आणि तेथून परतण्याचा सुविचार आणि आंत उडी टाकण्या-चा व्यामोह यांचें तुंबळ युद्ध त्यांच्या मनांत चाललेलें असतें. अशा अनिश्चित मनःस्थितीच्या लोकांवर लेख आणि व्याख्यानें यांच्याद्वारें सुविचारांचा संस्कार तीव्रतेनें झाल्यास त्यांचीं मनें व्यसनापासून परावृत्त झाल्याखेरीज राहणार नाहींत. निदान तीं परावृत्त करण्याचा प्रयत्न वेडेपणाचा किंवा हास्यास्पद खचित ठरणार नाहीं. म्हणूनच आमच्या मतें सुप्रजाघातक वेश्याव्यसनाविषयीं लोकांच्या अंतःकरणांत तिरस्कार उत्पन्न करण्याचे प्रयत्न करणें आवश्यक आहे.

वेश्यागमनाविषयीं साहजिक तिरस्कार लोकांच्या मनांत उत्पन्न करावयाचा असल्यास त्या कृत्याचे भयंकर आणि चिरकाल टिकणारे परिणाम समाजांतील प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या मनावर ठसविले पाहिजेत. एकंदर इंद्रियविषयक बाबतींतच सध्यां जी मुग्धता धारण करण्यांत येते ती आपण सोडली पाहिजे हें आम्हीं पूर्वी


सांगितलेंच आहे. या मुग्धतेपेक्षां स्पष्ट आणि शास्त्रशुद्ध चर्चाच या बाबतींत अधिक हितकारक होईल यांत संशय नाहीं; आणि इतर इंद्रियविषयक गोष्टीं बरोबरच वेश्यागमनाच्या दारुण परिणामाचेंही सरळ, स्पष्ट, आणि खरेंखुरें विवेचन स्त्री-पुरुषांस तरुणपणाच्या प्रारंभींच वाचावयास किंवा ऐकावयास मिळालें तर त्यापासून अतिशय फायदा होईल याविषयीं आम्हांस संशय वाटत नाहीं. या विषयासंबंधीं जें वाङ्मय प्रसिद्ध होईल तें अशा स्वरूपाचें असलें पाहिजे, कीं त्यांतील चर्चा आणि वर्णन वाचल्याबरोबर वाचणाराच्या मनांत वेश्यागमना-विषयीं विलक्षण भीति उत्पन्न झाली पाहिजे. पुरुषानें परस्त्रीशीं संबंध करणें किंवा स्त्रीचा परपुरुषाशीं संबंध होणें ही वाटते तितकी साधी गोष्ट नसून तिचे वाईट परिणाम अतिशय दूरवर पोंचण्यासारखे असतात. रोगपीडित स्त्रीशीं संबंध झाल्यास पुरुषास नाना प्रकारच्या व्याधी जडतात हें तर सर्वांस माहीतच आहे; परंतु त्या व्याधि केवळ त्या पुरुषासच भोगाव्या लागतात असें नव्हे तर त्याच्या बायकामुलांस आणि नातवापणतवांसही त्यांस बळी पडावें लागतें. व्याधिग्रस्त वेश्येचा संबंध झाल्यामुळें जो रोग पुरुषास जडतो त्याविषयीं सर्व भिषग्वर्यांचें असें एकमत आहे कीं, त्या पुरुषाच्या शरीरांतून त्या रोगाची पुरी हकालपट्टी करणें अशक्य आहे. भोंदू वैद्य आणि डॉक्टर त्या रोगावर अनेक औषधें देतात आणि पोकळ जाहिरातींतून तर त्या रोगावर अचुक गुणकारी रामबाण औषधें देण्याची हमी घेतलेली असते. कुमार्गास लागून रोगाच्या आधीन झालेले गरज-वंत लोक या भपकेदार खोट्या जाहिरातींना आणि भोंदू वैद्य डॉक्टरांच्या गोड थापांना बळी पडतात, आणि त्यांच्या थैल्यांची भर करतात. पण वास्तविक पाहतां कोणतेही उपाय या रोगापुढें पुरे पडत नाहींत. एकदां या रोगाच्या मिठींत सांपडलेल्या माणसाच्या शरीराभोंवतींची ती मिठी तो रोग एकदांच सोडतो; आणि ती ज्या वेळीं त्या माणसाच्या गळ्याभोंवतीं मृत्युपाशांची मिठी बसते तेव्हांच. एखाद्या औषधानें हा रोग कांहीं काळ नाहींसा होतो; पण तो गेल्यासारखा वाटतो न वाटतो इतक्यांत त्याचा पुनरुद्भव होतो, आणि ही त्याची लहरीपणाची जा ये त्या माणसाच्या मृत्युकालापर्यंत सारखी चालू असते. वेश्यागमन करूनही निरोगी राहिलेलीं माणसें क्वचित् आढळतात. पण त्यांचें प्रमाण दहा हजारांत एक तरी असेल किंवा नाहीं याची शंका आहे. शिवाय, दहा वेळां वेश्यागमन सुरक्षित-पणें झालें तरी अकराव्या वेळींच नेमकी त्याची धग माणसाला लागावयाची

संभव नेहमीं असावयाचा, इतकेंच नव्हे तर आजन्मांत एकदांच संमूढ होऊन वांकड्या मार्गाला पाऊल टाकणाराही मनुष्य दुर्दैवानें रोगस्पृष्ट होऊन एका क्षणाच्या पापाचीं फळें जन्मभर भोगीत राहतो. सारांश, वेश्यागमनाचें विष जालिम आहे आणि तें कोणाच्या अंगांत केव्हां भिनेल त्याचा यत्किंचितही नियम नाहीं. आणि तें एकदां एखाद्याच्या अंगांत भिनलें, कीं त्यामुळें केवळ त्याच्या एकट्याच्याच नव्हे, तर त्याच्या निरपराधी सच्छील पत्नीच्या आणि सुंदर सुंदर बालकांच्याही आरोग्याची राखरांगोळी झाल्यावांचून रहात नाहीं. या सर्व गोष्टी तरुणांच्या मनावर इतक्या तीव्रतेनें पटलेल्या असल्या पाहिजेत, कीं कधीं काळीं दुर्दैवानें संभ्रमाचा क्षण प्राप्त झाला तर आपल्या क्षणिक सुखोपभोगानें आपल्या स्वतःच्याच केवळ नव्हे तर आपल्या प्रियपत्नीच्या आणि मुलांच्याही आरोग्यावर जळते निखारे ठेविले जातील हा विचार त्यांच्या मनांत तावडतोब उभा राहिला पाहिजे. हा उद्देश साध्य करणारे लेख, कादंबऱ्या, व्याख्यानें व नाटकें जितकीं होतील तितकीं पाहिजे आहेत. या बाबतींत कांहीं वर्षांपूर्वीं आमच्या वाचण्यांत आलेल्या "खराबलेला माल" (Damaged goods) या नांवाच्या पुस्तकाची आम्हांस या ठिकाणीं आठवण होते. वेश्यागमनाचा भयंकरपणा या पुस्तकांत अतिशय भडक आणि भीतिप्रद रंगांत रंगविला आहे व आयुष्यांतील एका चुकीचें प्रायश्चित्त भोगतां भोगतां नायकाची जी दुर्दशा झाली आणि त्याला जे मानसिक क्लेश भोगावे लागले त्यांचीं वर्णनें वाचलीं, कीं वाचणाराचें मन भयानें व्याकुळ झाल्यावांचून रहात नाहीं. या पुस्तकाविषयीं अभिप्राय देतांना इंग्लंड-मधील एका प्रसिद्ध धर्माधिकाऱ्यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, "वेश्या-गमनाविषयीं भयंकर भीति उत्पन्न करणाऱ्या असल्या वाङ्मयानें समाजाचा उद्धार बऱ्याच अंशांनीं होईल यांत संदेह नाहीं." हे उद्गार आम्हांस अतिशय मार्मिक वाटतात व या उद्गारांत सूचित होणाऱ्या दिशेनें वेश्यागमनादि व्यसनांची गळचेपी केली तर सुप्रजाजननविषयक प्रतिबंधक कार्य साध्य होईल अशी आमची खात्री आहे.

# प्रकरण दहावें

सुप्रजाजननकार्याच्या विविध अंगांचें जें विवेचन आम्हीं येथपर्यंत यथामति केलें त्यांतील मुख्य मुख्य मुद्द्यांचा समारोपात्मक उल्लेख करण्यासाठीं या शेवटच्या प्रकरणाची योजना केली आहे. आपल्या देशांतील सध्यांची प्रजा अत्यंत कनिष्ठ दर्ज्याची आहे, आपला समाज शरिरानें व मनानें दुबळा झालेला आहे, अनेकविध रोगांनीं आपल्या समाजांतील स्त्री-पुरुषांस ग्रासलेलें आहे, आपल्या स्त्रीपुरुषांची साधारण आयुर्मर्यादा २४ व्या वर्षापर्यंत खालीं उतरली आहे, आणि इतर सर्व देशांपेक्षां आपल्या देशांतील मृत्युसंख्येचें प्रमाण अधिक आहे. या सर्व गोष्टी उघड उघड दिसण्यासारख्या आहेत; आणि या गोष्टींचा विचार केला म्हणजे हिंदुस्थानची प्रजा अशीच उत्तरोत्तर अधिकाधिक निकृष्ट होत जावयाची, किंवा हिंदुस्थानांत सुप्रजा निर्माण होईल एतदर्थ कांहीं उपाय योजिता येण्यासारखे आहेत, असा प्रश्न साहाजिकपणेंच पुढें उभा राहतो. सुप्रजाजननासाठीं कोणत्या उपायांची योजना करावी तें पाहूं लागलें म्हणजे प्रजेचा चांगलेपणा किंवा वाईटपणा कशावर अवलंबून असतो त्याचा विचार करावा लागतो. मनानें आणि शरिरानें ओजस्वी अशी प्रजा निर्माण व्हावी अशी इच्छा असल्यास ज्यांच्या द्वारें ती निर्माण व्हावयाची ते वधूवर गुणसंपन्न असणें अगत्याचें आहे. अर्थात् सुप्रजाजननाच्या दृष्टीनें विवाहसंस्थेची सुधारणा करणें, आणि विवाहोद्युक्त स्त्रीपुरुषांची निवड उत्तम प्रकारें करणें या गोष्टी सर्वांत महत्त्वाच्या ठरतात. म्हणून प्रौढविवाह आणि प्रीतिविवाह आपल्या समाजांत रूढ होण्याची किती आवश्यकता आहे त्याविषयीं आम्हीं बऱ्याच विस्तारानें विवेचन केलें. परंतु विवाहतत्पर स्त्रीपुरुष गुणसंपन्न असतील अशी व्यवस्था केली म्हणजे सुप्रजाजननाचें सर्व कार्य संपलें असें नाहीं. कारण, गुणसंपन्न वधूवरांचे विवाह होणें ज्याप्रमाणें अगत्याचें आहे त्याचप्रमाणें विवाह झाल्यानंतर पतिपत्नींनीं आपल्या संततीचें नियमन करणेंही जरूरीचें आहे. अमर्याद प्रजोत्पत्तीमुळें देशाचें फार

नुकसान होतें; आणि जन्मसंख्या जितकी अधिक तितकी मृत्युसंख्या अधिक व्हावयाची असा निसर्गाचाच नियम आहे. या गोष्टींवरून जर कांहीं उघड होत असेल तर तें हेंच कीं, पतिपत्नींनीं आपल्या पोटीं आपल्याला उत्तम रीतीनें पोसता येईल इतकीच संतति निर्माण होईल अशी खबरदारी घेतली पाहिजे. शिवाय, प्रजेची उत्कृष्टता किंवा निकृष्टता ती ज्या बीजापासून निर्माण होईल त्यावर तर अवलंबून आहेच; पण ती प्रजा ज्या परिस्थितींत वाढावयाची तिच्यावरही ती पुष्कळ अंशांनीं अवलंबून आहे. हेंच निराळ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, वंशसंस्कार आणि परिस्थिति हे दोन प्रजेच्या चांगलेवाईट-पणाचे उगम होत. या दोन उगमांपैकीं अधिक महत्त्व कशास द्यावयाचें याविषयीं मोठमोठ्या विद्वानांत अनेक प्रसंगीं कलह माजलेले आहेत व त्या कलहांच्या वेळचे त्यांचे वादविवादही मोठे बोधप्रद आणि मनोरंजक आहेत. परंतु या स्थळीं त्या वादविवादाशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. कोणत्याच पक्षाशीं तादात्म्य न पावतां आपण असेंच म्हणणें बरें कीं, वंशसंस्कार व परिस्थिति या दोहोंचेंही महत्त्व फार असून सुप्रजाजननासाठीं झटणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें या दोन्ही बाजूंनीं समाजाची सुधारणा करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. यासाठींच आपल्या विवाह-संस्थेची सुधारणा कोणत्या दिशेनें करावयास पाहिजे, वधूवरांच्या अंगीं कोण-कोणते गुण असावयास पाहिजेत, संततिनियमनार्थ पतिपत्नींनीं कसे प्रयत्न केले पाहिजेत वगैरे मुद्द्यांची चर्चा केल्यानंतर, सुप्रजाजनन व्हावयासाठीं आपल्या समाजाची परिस्थिति किंवा राहणी (Environments) कोणकोणत्या बाबतींत सुधारली पाहिजे याविषयींचें विवेचन आम्हीं या ग्रंथांत केलें. सुप्रजा-जनन साध्य करावयाचें झाल्यास कार्याच्या ज्या दिशा सुचतात त्या वर्गीकरणानें दर्शवावयाच्या झाल्यास खालीं दिल्याप्रमाणें दाखवितां येतील:—


सुप्रजाजनन
१
२
३
भावी पिढीचें बीज सुधारणें
प्रस्तुत पिढीचें उत्तम पोषण करणें
चालू पिढींतील वाईट बीजाचा नाश
प्रौढ व प्रीतिविवाह
इंद्रियविषयक शिक्षण
संततिनियमन
घरांची सुधारणा
उत्तम अन्नपाण्याचा पुरवठा
खेडेगांवांचें पुनरुज्जीवन
आरोग्य-मंडळें
कुपात्र पति-पत्नींस संततिहीन ठेवणें
व्यसनांचें निर्मूलन
कुपात्र स्त्री-पुरुषांचे विवाह बंद करणें

सुप्रजाजननाच्या कार्याचें क्षेत्र किती व्यापक आहे तें वरील वर्गीकरणावरून स्पष्ट दिसून येईल. विधायक, निवारक व प्रतिबंधक अशा सुप्रजाजननाच्या तीन मुख्य शाखा असल्याचा उल्लेख आमच्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं आलेला आहे, आणि त्या शाखांमध्यें कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो तेंही आमच्या ठिकठिकाणच्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. हिंदुस्थानची प्रजा सुदृढ आणि तेजस्वी व्हावी यासाठीं प्रयत्न करावयाचे असल्यास वर दर्शविलेल्या सर्व दिशांनीं कार्यास प्रारंभ झाला पाहिजे. कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक आहे या सबबीवर कार्य आजिबात सोडून देणें किंवा आळसानें पुढें ढकलणें सुज्ञपणाचें होणार नाहीं. आजपर्यंत समाज कुजत गेला तो गेला, त्याबद्दल शोक करण्यांत अर्थ नाहीं हें जितकें खरें, तितकेंच यापुढें त्याला लागलेल्या किडीचा आपण उच्छेद करूं अशा दृढ निश्चयानें कार्याला लागण्यांतच खरा पुरुषार्थ आहे हेंही खरें. सुप्रजाजननाच्या चळवळीची लाट साऱ्या जगभर उसळली असतांना आधींच निकृष्टावस्थेस पोंचलेल्या आपल्या देशानें तिच्याविषयीं तटस्थ राहण्यांत कोणतेंच हित नाहीं. पाश्चात्य देशांची या विषयासंबंधींची कृति पाहिली तर अवघ्या पन्नास वर्षांत त्यांनीं या विषयाचा केवढा अभ्यास व केवढा प्रसार केलेला दिसतो. सन १८८४ च्या पूर्वी Eugenics (सुप्रजाजनन) हा शब्दही प्रचारांत नव्हता. तो शब्द प्रचारांत आणणारा जो फ्रॅन्सिस गाल्टन त्याच्या म्हणण्याकडे सन १८९८ पर्यंत कोणीं धड लक्षही दिलें नव्हतें; पण त्या सालीं Sociological Society पुढें गाल्टननें सुप्रजाजननशास्त्रावर जें व्याख्यान दिलें त्यामुळें समाजांत एकदम जागृति झाल्यासारखें झालें. सर्वांचें लक्ष त्या विषयाकडे लागलें, त्या विषयाच्या अंगोपांगांची चर्चा व्हावयास लागली, त्या विषयांत अंतर्भूत होणाऱ्या विविध शास्त्रीय प्रश्नांची छाननी शास्त्रज्ञ करूं लागले, आणि सुप्रजाजननाची साध्यता करण्यासाठीं कोणकोणत्या मार्गांचा अवलंब समाजास बिनधोकपणें करतां येईल याविषयीं समाजाचे पुढारी विचार करूं लागले. या विषयास एका विवक्षित देशापुरतें किंवा राष्ट्रापुरतेंच मर्यादित महत्त्व नसून सर्व जगानें ज्याचा विचार केला पाहिजे इतक्या महत्त्वाचा हा प्रश्न आहे ही कल्पना दहाबारा वर्षांत लोकांना पटली आणि इ० सन १९१२ सालीं लंडन येथें पहिली आंतरराष्ट्रीय सुप्रजाजननपरिषद् भरली. कोणत्याही देशाची प्रजा सुदृढ व तेजस्वी व्हावी यासाठीं प्रयत्न करावयाचे झाल्यास त्या देशांतील पतिपत्नींनीं आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या मानानें

आपल्या संततीचें नियमन केलें पाहिजे या कल्पनेविषयीं कोणत्याही विचारी लोकांत मतभेद असणें शक्य नाहीं; आणि एकंदर सुप्रजाजननाच्या व्यापक प्रश्नांत हा उपप्रश्न फारच महत्त्वाचा गणला गेल्यामुळें गेल्या तीस चाळीस वर्षांत मुख्य व्यापक प्रश्नापेक्षांही या प्रश्नाची चर्चा अधिक चालली असल्याचें आपणास दिसून येतें. सुप्रजा निर्माण व्हावी याविषयीं वाद उपस्थित होणें शक्यच नाहीं. त्याचप्रमाणें कोणत्याही देशांत स्त्री-पुरुषांनीं आपल्या संततीचें नियमन केल्या-खेरीज त्या देशांत सुप्रजा निर्माण होणार नाहीं, या विधानासही जे लोक थोडें फार अर्थशास्त्र व प्राणिशास्त्र जाणतात त्यांच्याकडून विरोध होणें शक्य नाहीं. मात्र पतिपत्नींनीं संततिनियमनासाठीं कोणत्या उपायांची योजना करावी हा प्रश्न निघाला, कीं मतांची भिन्नता उत्पन्न होते. गेल्या पन्नास वर्षांत या विषयावर जें इंग्रजी वाङ्मय प्रसिद्ध झालें तें वाङ्मय म्हणजे या मतभिन्नतेचा एक मोठा इतिहासच होय. संततिनियमनाच्या साधनाच्या चर्चेला याप्रमाणें विलक्षण महत्त्व प्राप्त झाल्यामुळें त्या चर्चेंत उडणाऱ्या धुळींत मुख्य सुप्रजाजननाचा प्रश्न कित्येक-दां दृष्टीआडही झाल्यासारखा वाटतो. १९२३ मध्यें न्यू यॉर्क येथें या विषयासंबंधीं जी आंतरराष्ट्रीय परिषद् झाली तिला सुप्रजाजननपरिषद् असें नांव देण्याऐवजीं सहावी संततिनियमन परिषद् (Sixth Birth Control Conference) असें नांव देण्यांत आलें होतें हें आमच्या म्हणण्याचें एक प्रत्यंतरच होय; पण तें कसेंही असलें, आणि संततिनियमनसाधनाच्या उप-प्रश्नाला अवास्तव मोठेपणा प्राप्त झाल्यासारखें आपल्याला कधीं कधीं वाटलें, तरी येवढें खचित, कीं पाश्चात्य देशांतलि विचारवंत लोक सुप्रजाजननाच्या व्यापक प्रश्नाचाही अवश्य तेवढा समाचार घेत आहेत. या प्रश्नाची शास्त्रीय व निर्विकार चर्चा आणि फोड करण्याच्या उद्देशानें Eugenics Record Office सारख्या संस्था तिकडे स्थापन झालेल्या आहेत; सुप्रजाजनन साध्य करण्यासाठीं अवश्य तें कार्य समाजाच्या हातून घडावें म्हणून जारीनें प्रचार करणाऱ्या व्यक्ति व संस्था तिकडे आहेत; आणि या विषयाकडे एका विवक्षित समाजाचें किंवा देशाचें नव्हे तर सबंध जगाचें व मानवजातीचें लक्ष वेधावें एतदर्थ परिश्रम करणारीं मासिकें व नियतकालिकें तिकडे आहेत.

सर्व जगाला पटलेलें हें सत्कार्य आपण केव्हां हातीं घेणार ? हा प्रश्न लोकां-च्या मनांत उत्पन्न करावा आणि तसा तो ज्यांच्या मनांत उत्पन्न होईल व

ज्यांस आपण स्वतः कांहीं तरी करावें व लोकांकडून कांहीं तरी करवावें अशी सबळ इच्छा होईल त्यांस यथामति कार्याची दिशा दाखवावी हाच प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश आहे. वास्तविक पहातां सुप्रजा निर्माण करणें किती महत्त्वाचें आहे याविषयीं ग्रंथलेखन किंवा वक्तृत्व करण्याची गरजच असतां कामा नये. आपण आपल्या घरीं जीं जनावरें बाळगतों तींसुद्धां चांगल्या जातीचीं असावींत अशी आपली इच्छा असते. आपल्याला कुत्रा पाळावयाचा झाला तर तो चांगल्या जातीचाच असावा अशी आपण खटपट करतों. आपल्या गोठ्यांतील गाईला बैल दाखवावयाचा असला तर सरकारी फार्मवरून किंवा दुसऱ्या कोठून उत्तम जातीचा खोंड आपण मिळवितों. शर्यती खेळणारे लोक उत्तम अवलादीचे घोडे पैदा करण्यासाठीं लाखों रुपयांचा खर्च करावयास तयार असतात. फार कशाला, आपल्या लहानशा शेतांत मका पेरणारा शेतकरीदेखील शक्य तितकें उत्तम बीं आणून त्याची पेरणी करतो. असें असतांना उत्तम जातीचीं माणसें निर्माण होणें अगत्याचें आहे हा विचार जगाला इतक्या उशिरां पटावा आणि हिंदुस्थान देशाच्या तर तो अजूनही डोक्यांत येऊं नये ही किती विस्मयाची व खेदाची गोष्ट आहे ? दारच्या जनावरांच्या किंवा परसांतल्या भाजीपाल्याच्या चांगुलपणाविषयीं जी दक्षता आपण ठेवतों तेवढी दक्षता आपण आपल्या स्वतः-च्या चांगुलपणाविषयीं ठेवूं नये काय ? ती न ठेवल्यानें आपल्या देशाचा केवढा नाश झाला आहे ! आणि यापुढेंही आपण ती न ठेविली तर केवढा नाश होईल ! राजकीय गुलामगिरी हें तर एक असामान्य संकट आपल्यावर आहेच; पण आपल्या देशाच्या सुदैवानें हें संकट कधींकाळीं नाहींसें झालें अशी कल्पना केली तरी कुप्रजेनें भरलेल्या राष्ट्राच्या हातून स्वातंत्र्याचा सांभाळ दीर्घकाल होईल अशी आशा करतां येईल काय ? आणि हें जर खरें तर आपल्या देशांत सुप्रजा-जनन अधिकाधिक प्रमाणांत होईल यासाठीं प्रयत्नांची शिकस्त व्हावयास नको काय ?

सुप्रजाजननासाठीं आपल्या देशांत कोणकोणत्या गोष्टी करावयास पाहिजेत त्यांची चर्चा ग्रंथाच्या निरनिराळ्या प्रकरणांत आम्हीं केलीच आहे. या सर्व गोष्टींविषयीं सर्वां-चें एकमत झालें पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं. विवाहासंबंधीं ज्या सुधारणा झाल्या पाहिजेत असें आम्ही म्हणतों त्या कांहीं वाचकांस अत्याग्रहाच्या वाटतील. त्याच-प्रमाणें आमच्या विवेचनाच्या ओघांत आलेल्या इतरही कित्येक बाबींसंबंधानें

आमच्याशीं वाचकांचा प्रामाणिक मतभेद होण्याचा संभव आहे. हा संभव आम्ही ओळखून आहोंत, व अशा मतभेदाबद्दल आम्हांस कधीं विषादही वाटणार नाहीं. हिंदुस्थानांत कुप्रजा निर्माण होण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत होत आहेत याविषयीं आम्ही आपल्या मनाशीं जें निदान करूं तेंच सर्व लोकांस पटलें पाहिजे अशी आग्रहबुद्धि आमच्याजवळ लेशभरही नाहीं. इतर लोकांच्या मनाला दुसरें एखादें निदान अधिक बुद्धिग्राह्य वाटलें तर त्यांनीं तें खुशाल स्वीकारावें. एक गोष्ट मात्र खास, कीं आमचा देश राजकीय दृष्ट्या परतंत्र आहे म्हणूनच आमच्या देशांत कुप्रजाजनन होत आहे, व म्हणून सुप्रजाजनन साध्य करावयाचें असल्यास इतर कोणत्याही सुधारणा करण्याऐवजीं हें पारतंत्र्य नष्ट करण्याचीच खटपट केली पाहिजे, ही विचारसरणी आम्हांस पटत नाहीं. आमचा देश पारतंत्र्यांत असल्याकारणानें आमची आधींच सदोष असलेली प्रजा अधिक किडकी बनत जात असेल; परंतु राजकीय गुलामगिरी हें कुप्रजेचें एकच एक कारण होय असें म्हणणें, आणि सुप्रजाजननाचें राजकीय स्वातंत्र्य हें एकच एक साधन होय असें ठरविणें या दोन्ही गोष्टी सारख्याच वेडेपणाच्या होत. हिंदुस्थान स्वतंत्र झाला कीं देशांत आपोआप सुप्रजा निर्माण होईल अशी आशा करणें म्हणजे शेतांत कोणत्याही पिकाची पेरणी न करतां पावसाळा झाला, कीं पीक उभें राहील अशा आशेनें हात जोडून बसण्यासारखेंच आहे. म्हणूनच सुप्रजाजननाचे प्रयत्न स्वतंत्रपणानें व विस्तृत प्रमाणावर झाले पाहिजेत. ते अमक्याच स्वरूपाचे असले पाहिजेत असा आमचा अट्टाहास नाहीं हें वर सांगितलेंच आहे. या विषयाचा विचार करूं लागल्यावर आम्हांस ज्या सुधारणा आवश्यक वाटल्या त्या आम्हीं वाचकांपुढें मांडल्या आहेत. इतरांस आणखी कांहीं सुधारणा सुचतील किंवा यांतील कांहीं अनावश्यक किंवा अनिष्ट वाटतील. तसें झालें तरी हरकत नाहीं. लोकांवर आमचीं मतें लादण्याचा आमचा हेतु नसून या जिव्हाळ्याच्या विषयासंबंधीं लोकांच्या ठिकाणीं विचारजागृति करण्याचा आमचा उद्देश आहे.

मात्र एका गोष्टीविषयीं पुन्हा उल्लेख करावासा वाटतो ती ही कीं, सुप्रजाजननशास्त्र हें विसाव्या शतकांत पाश्चात्य लोकांनीं उभारलेलें कांहीं तरी नवें सोंग आहे अशी कोणींही आपल्या मनाची समजूत करून घेऊं नये. प्राचीन आर्य लोकांनीं या शास्त्राविषयीं बराचसा विचार केला होता आणि सुप्रजेची सिद्धता समाजांत व्हावी एतदर्थ त्यांनीं अनेक सामाजिक संस्थांना विशिष्ट प्रकारचें वळण

दिलें होतें. प्राचीन आर्यांचा दाखला वास्तविक द्यावयास पाहिजे असें नाहीं. " उत्तम दर्जाची प्रजा निर्माण करण्याची खटपट " अशी सुप्रजाजननाची साधी व्याख्या केली तर त्या अर्थी सुप्रजाजनन मनुष्यजातीइतकें प्राचीन आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. शास्त्र व कला या स्वरूपांत मात्र सुप्रजाजननाचा अवतार या विसाव्या शतकांत होत आहे येवढेंच. प्राचीन आर्यांच्या विचारांचा व प्रयत्नांचा आधार आम्ही येवढ्याचसाठीं देतों, कीं सुप्रजाजननविषयक चळवळ करतांना प्राचीन परंपरेविरुद्ध अशी एखादी भयंकर क्रान्ति आपण करीत आहोंत अशा शंकेनें कोणाच्या मनाची तळमळ व्हावयाचें कारण नाहीं. याच हेतूनें प्रौढ व प्रीतिविवाहाच्या सुधारणेविषयीं लिहितांना ती सुधारणा शास्त्रपूत आणि पूर्वजसंमत असल्याचें आम्हीं वाचकांस दाखविलें. पण, या बाबतींत एक पायरी पुढें जाऊन वाचकांस असाही विचार करण्याची आम्ही विनंति करतों कीं, सुप्रजाजननाच्या साध्यतेसाठीं कांहीं गोष्टी करणें अगत्याचें वाटत असलें तर केवळ आपल्या पूर्वजांनीं त्या गोष्टी शास्त्रांत लिहून ठेवल्या नाहींत किंवा स्वतः आचरिल्या नाहींत येवढया एका सबबीवर त्यांचा अव्हेर काय म्हणून करावयाचा ! आपल्या पूर्वजांच्या आचरणांत आलेल्या गोष्टीच तेवढया विहित व बाकीच्या निषिद्ध मानावयाच्या झाल्या तर आधुनिक शास्त्रीय शोधांवर सरसकट बहिष्कार घालावा लागेल, नव्या कला शिकणें सोडावें लागेल, एवढेंच काय, मोठमोठ्या रुंद रस्त्यांचीं किंवा उंच उंच हवेल्यांची बांधणीही अप्रशस्त मानण्याचा अनवस्था-प्रसंग येईल. कालाचा ओघ सारखा वाहतो आहे, आणि त्या ओघाबरोबर न जाणाऱ्या व्यक्तीचा किंवा राष्ट्राचा उत्कर्ष कधींही होणार नाहीं. केवळ नवाई-ला भुलून जाऊन नव्या गोष्टी पत्करणें जितकें घातुक तितकेंच केवळ नाविन्या-च्या सबबीवर नव्या त वांचा अव्हेर करणें हानिकारक होय. म्हणून आपल्या देशाच्या आजच्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. देशांतील कुप्रजेची सुधारणा कशी होईल, आणि भावी प्रजा मनानें व शरीरानें बुद्धिमान, धाडसी व पराक्रमी कशी निपजेल याचें चिंतन केलें पाहिजे; आणि या सुप्रजाजननाच्या कार्यासाठीं जे उपाय आवश्यक वाटतील त्यांचा पुरस्कार निर्भयपणें केला पाहिजे. कोणत्याही नव्या सुधारणेस प्रथम लोकमताचा विरोध सोसावा लागतोच; पण हिंदुस्थानची भावी पिढी जोमदार निपजावी अशी ज्यांच्या मनाला तळमळ लागली असेल ते लोकमताच्या विरोधाला भिणार नाहींत. विचार-

वंत लोक लोकछंदानुवर्ती नसतात, ते लोकमताला वळण लावीत असतात. सुप्रजाजननासाठीं जे हिंदी स्त्रीपुरुष या घटकेपासून झटूं लागतील त्यांना " अपमान-उपहासा " दि संकटें प्रथम सहन करावीं लागलीं, तरी देशाच्या भावी उत्कर्षास साहाय्य केल्याचें श्रेय चित्रगुप्ताच्या हिशेबांत त्यांच्या नांवें लिहिलें जाईल याविषयीं संदेह नाहीं.

REFBK-0004347




ग्रंथ संग्रहालय
क्र. 4386